
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
सं. क्र. २४६



# आशियाचे धर्मदीप

[ चरित्रात्मक रमणीय धर्मपुस्तक ]



लेखक—**गोपीनाथ गणेश तळवलकर**

संपादक 'आनंद,' पुणें.

[ साहित्यसम्राट् रा. तात्यासाहेब केळकर, प्रो. पोतदार, श्री. माटे, श्री. दा. ना. आपटे, श्री. बा. मा. आंबेकर यांचे उत्कृष्ट अभिप्राय. रियासतकार सरदेसायांचें प्रस्तावपत्र. ]

REFBK-0004835

आनंदकार्यालय, पुणें.

किंमत १ रुपया.

क्र. 4834

REFBK-0004835

# सन्मान्य साहित्यसेवकांचे प्रशंसोद्गार.

**साहित्यसम्राट् श्री. नरसिंह चिंतामण केळकर म्हणतातः**—" रा. गोपीनाथपंत तळवलकर, संपादक " आनंद " यांनीं '**आशियाचे धर्म-दीप**' या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे. त्याचे छापील सुटे कागद मीं वाचले. पुस्तक थोडक्यांत पण मोठें मनोरंजक व चटकदार झालें आहे. भाषा अल्पवयी विद्यार्थ्यांनाहि सोपी वाटेल अशी योजिली आहे. आणि खरोखरच धर्मविषयासंबंधानें असें विवेचक व बोधप्रद पुस्तक अल्पवयी विद्यार्थ्यांच्या हातीं पडेल तर त्यांना फार उपयोगी होईल. तरुण पिढीला धार्मिक शिक्षण हवें हें खरें; पण त्याजबरोबर तें एकांगी नसावें हें चांगलें. अर्थात् जगांतील सर्वमान्य प्रचलित धर्मासंबंधानें थोडथोडी माहिती त्यांना एकत्रच वाचावयास मिळावी. तसें झाल्यास ते आपल्याच मनानें तुलना करितात व प्रत्येकांत ग्राह्यांश काय आहे हें उमजतात. अमुक अमक्या-पेक्षां अधिक चांगलें असें त्यांना कोणीं सांगण्याचें कारण नाहीं व तसें तें कोणीं त्यांना मुद्दाम सांगूंहि नये. त्याचें त्यांना तारतम्य नाहीं असें कोणीं काय म्हणून घेऊन चालावें ? अर्थात् त्यांच्या हितचिंतकांनीं करण्याचें उरतें तें इतकेंच कीं, त्यांना सहसा आपोआप उपलब्ध न होणारी अशी माहिती एकत्र करून त्यांच्या हातीं द्यावी. आणि नक्की तेंच कार्य प्रस्तुत पुस्तकांत रा. तळवलकर यांनीं केलें आहे. प्रथम विभागांत पूर्णावतार श्रीकृष्ण, महात्मा गौतमबुद्ध, ईश्वरपुत्र येशू ख्रिस्त, बलवत्तर धर्मसंस्थापक महंमद पैगंबर, व सत्यधर्माचा उद्धारक झरतुष्ट्र यांचीं चरित्रें दिलीं आहेत. अखेर निरनिराळ्या धर्मांतील प्रार्थनागीतें दिलीं आहेत हा या पुस्तकाचा सर्वांत अधिक मनोरंजक भाग वाटतो. प्रार्थनेंत भक्तिरहस्य असलें तरी त्याला संगीताचें स्वरूप मिळणें म्हणजे दुधांत साखर पडण्यासारखें आहे. लहान मुलांच्या तोंडीं अशीं गीतें सहज बसतात व तीं त्यांना पाठ म्हणतां आलीं तर प्रस्तुत पुस्तकाचें कार्य विशेष रीतीनें सफल होईल.

तात्पर्य, सर्वच दृष्टींनीं प्रस्तुत पुस्तकाबद्दल रा. तळवलकर यांचें अभिनंदन करणें योग्य होईल असें मला वाटतें."

**सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रो. दत्तो वामन पोतदार म्हणतात:—**

"'आनंदा'चे तरुण संपादक कवि रा. गोपीनाथ गणेश तळवलकर यांनीं लिहिलेला 'आशियाचे धर्मदीप' हा छोटासा ग्रंथ मीं समग्र (१४४ पृष्ठें) वाचून पाहिला. ग्रंथांत जगांतील पांच प्रसिद्ध धर्मसंस्थापकांचीं चरित्रें व तत्त्वज्ञान यांची दोन निरनिराळ्या भागांत माहिती दिली आहे. श्रीकृष्ण, बुद्ध, येशू, मुहम्मद व झरथोस्त्र या पांच अवतारी पुरुषांचीं नांवें निवडून जुन्या दशावतारांऐवजीं हें नवें **अवतारपंचक** रा. तळवलकर यांनीं निवडलें हें प्रस्तुत काळाला अनुरूपच केलें. रा. गोपीनाथ यांचीं चरितें चांगलीं व चटकदार उतरलीं आहेत. सुमारें १५ ते १८ वर्षें वयाच्या तरुणांच्या हातांत देण्यास तीं लायक आहेत. हीं चरित्रें चिकित्सक बुद्धीनें किंवा पद्धतीनें लिहिलीं नसून प्रेमळ पद्धतीनें भावयुक्त होऊन लिहिलीं आहेत. त्यांतील वर्णनें उठावदार साधलीं आहेत. प्रारंभीं जो पहिला तात्त्विक विवेचनाचा भाग आहे तो अर्थात् चरित्रांपेक्षां कठिण पडणार, तथापि त्यांतील दृष्टि उदार व व्यापक ठेविली आहे. सर्व धर्मांविषयीं व धर्मस्थापकांविषयीं आदर व भक्ति असतांहि आर्यधर्माविषयीं विशेष प्रेमा रा. तळवलकर यांनीं राखिला आहे. या विवेचनाचे धोरणावर थिऑसफी पंथाच्या विवेचनाचा परिणाम झालेला स्पष्ट दिसून येतो. दुसऱ्यास दूषणें देण्यापेक्षां रहस्यग्रहण करण्याची थोर दृष्टि या लहानशा पुस्तकांत रा. गो. ग. तळवलकर यांनीं स्वीकारली आहे आणि चिकित्सकपणें व डोळसपणें सर्व पाहण्याला व परीक्षण्याला येण्याचें सामर्थ्य अंगीं येण्यापूर्वीं असें आदरयुक्त व श्रद्धापूर्वक विवेचन वाचावयास मिळाल्यानें सांप्रतकाळीं जें अत्यंत अज्ञान व जी अनास्था दिसून येते तीस प्रतिबंध होईल व धर्म हें एक थोतांड न समजतां मानवांच्या उन्नतीचें तें प्रमुख व प्रथम साधन आहे असें झालें व पुढेंहि राहूं शकेल याची कल्पना येऊन उच्छृंखलपणास आळा बसेल."

**मार्मिक विद्वान् श्री. श्रीपाद महादेव माटे म्हणतात:—**" आशियाचे धर्मदीप ' हें पुस्तक वाचलें. याची भाषा मोठी गोड आहे. ती वाचतांना आल्हाद वाटतो. तथापि ती फारच रसभरित करून सांगावयाच्या गोष्टीवरून वाचकांचें लक्ष उडावें व भाषेकडेच लागावें असें मात्र रा. तळवलकर यांनीं केलेलें नाहीं. धर्मासारखा अवघड विषय असतांहि त्यांनीं आपली भाषा अगदीं सोपी ठेविली आहे. पुस्तकाची कल्पना फार रमणीय आहे, इतकेंच नव्हे तर ती अगदीं नवी आहे. पुस्तक वाचल्यावर तें तोटकें आहे असें वाटूं लागतें इतकी ती कल्पना आपल्याला आवडते. विशेषत: पौगंडदशेंतील मुलांची जिज्ञासा जागृत होण्याला या पुस्तकाचा उपयोग चांगला होईल. दीपरूप पुरुषांच्या चरित्रांतील सखल भाग मुद्दामच वगळण्यांत आले आहेत असें दिसतें. त्या त्या धर्माचें विस्तृत वाचन झालें म्हणजे वाचकांना त्यांचा परिचय आपोआपच होईल. ' धर्माचें अंतर्राष्ट्रीय स्वरूप ' ही कल्पना थोडी जास्त खुलाशानें द्यावयास हवी. किंबहुना सर्व विवेचन-विभागासंबंधानें हेंच म्हणावयास हवें. ' आशियाचे धर्मदीप ' असें म्हणावयाचे ऐवजीं नुसतेंच ' धर्मदीप ' म्हटलें असतें तरीही चाललें असतें. कारण आशियाच्या बाहेर असले दीप लागलेच नाहींत. पण माणसांची जात आशियांतच प्रथम फैलावली व धर्मकल्पना फार जुनी आहे या दोन गोष्टी एकत्र केल्या म्हणजे आशिया धर्मदीपांचें स्थान आहे हा गर्वही गळून जातो."

**व्यासंगी साहित्य-सेवक श्री. दाजी नागेश आपटे म्हणतात:—**
" 'आशियाचे धर्मदीप' या नांवाचें पुस्तक लिहून रा. तळवलकर यांनीं मराठी भाषेंत एका सुंदर व उपयुक्त ग्रंथाची भर टाकिली आहे. धर्मतत्त्वांचें विवेचन म्हणजे गहन प्रतिपादन व कठिण भाषा यांनीं युक्त असावयाचें अशी सार्वत्रिक समजूत असल्यानें त्याच विषयाच्या अभ्यासकांशिवाय इतर लोक त्याच्याकडे सहसा वळत नाहींत. परंतु रा. तळवलकर यांनीं तें विवेचन बालबोध, सुलभ पण सुंदर अशा भाषेंत केलेलें असल्यामुळें तें मनोरंजक

झालें आहे. धर्मसंस्थापकांचीं चरित्रेंहि गोड व सरळ भाषेंत व त्या त्या धर्मग्रंथांना धरून लिहिलीं असल्यामुळें तीं फार रसाळ झालीं आहेत. बाल॰ वाङ्मयाच्या प्रमुख नियतकालिकाच्या संपादकाचें काम करण्याच्या संवयीनें तशा बालसुलभ भाषेचा सुंदर ठसा पुस्तकावर पडल्यानें पुस्तक बालांनाहि वाचनीय झालें आहे. एकंदरींत पुस्तक वाचनीय व संग्राह्य आहे.''

**बहुश्रुत वृत्तपत्रकार श्री. बापूजी मार्तंड आंबेकर म्हणतातः—**
'' रा. गोपीनाथ गणेश तळवलकर यांचें '' आशियाचे धर्मदीप '' हें पुस्तक वाचनीय झालें आहे. समाजास संघटित करून त्यास एकरूपता लाभवून देण्याचे कामीं साहाय्यक होणाऱ्या इतर अनेक बंधनांपेक्षां धर्मबंधन हें अर्थातच सामर्थ्यवान् असतें. अर्थात् धर्माचें खरें स्वरूप काय आहे व निरनिराळे धर्म हे दिसण्यांत जरी विसदृश दिसले तरी त्यांची मूलभूत भूमिका लोकोपकारक व समाजोन्नतिकारक कशी असते हें दाखविण्याचा प्रयत्न, विशेषतः आजच्या परिस्थितींत केव्हांहि श्रेयस्करच ठरण्यासारखा आहे. आणि प्रस्तुत पुस्तकांत हाच प्रयत्न व्यवस्थित रीतीनें करण्यांत आला असल्याचें दिसून येतें. देशांत सर्व समाजांना आपापल्या धर्माप्रमाणें निर्वेध रीतीनें रहातां यावें यासाठीं, कोणताही वर्ग घेतला तरी त्याची शिकवण सर्वांच्या स्वास्थ्यास व उन्नतीस उपकारकच कशी असते ही जाणीव बहुजन-समाजांत उत्पन्न होणें जरूर असतें. ही जाणीव उत्पन्न करण्याचें कार्य रा. तळवलकर यांच्या प्रस्तुत प्रयत्नांच्या योगानें चांगल्या रीतीनें होण्यासारखें आहे. त्यांनीं आपल्या पुस्तकाचे दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत हिंदुधर्म, बौद्धधर्म, खिस्तीधर्म, इस्लामीधर्म, व झरतुष्ट्रधर्म या जगांतील पांच प्रमुख धर्मांचें वैशिष्टय वर्णन करण्यांत आलें आहे. हे धर्म मनुष्यास सन्मार्ग दाखविणारे दीपच कसे आहेत हें यांत निदर्शित करण्यांत आलें आहे. दुसऱ्या भागांत श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, येशूखिस्त, महंमद पैगंबर व झरतुष्ट्र् या पांच अवतारी किंवा लोकोत्तर पुरुषांचीं चरित्रें देण्यांत आलीं

आहेत. दोन्ही भाग अर्थातच परस्परपूरक असे आहेत. जगांतील पांच प्रमुख धर्म आणि त्यांचे संस्थापक किंवा प्रवर्तक यांचें यांत थोडक्यांत पण सुसंगत आणि समर्पक रीतीनें वर्णन करण्यांत आलें आहे. पुस्तकाची भाषा सहजप्रवाही, भारदस्त आणि विषयानुकूल अशी आहे. निरनिराळ्या धर्मांची यथार्थ कल्पना आणण्याच्या दृष्टीनें पुस्तक संग्राह्य आहेच. पण ज्यांच्या ठिकाणीं धर्मबुद्धीचा ओलावा किंवा आस्तिक्यबुद्धीचा तादृश जिव्हाळा असेल त्यांनाही ह्या पुस्तकाच्या योगानें लोकोत्तर माणसांच्या संगतींत कांहीं काळ घालविल्याचा आनंद लाभल्याशिवाय निःसंशय राहणार नाहीं. शाळांतून धर्मशिक्षण देण्यासंबंधांत कितीही मतभेद असला तरी अशीं केवळ समतोल बुद्धीनें व समावेशक भावनेनें लिहिलेलीं पुस्तकें मुलांकडून वाचून घेण्याचे बाबतींत एकमत होण्यास अडचण पडेल असें वाटत नाहीं."

मराठी ग्रंथ संग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें

# रियासतकारांचें प्रस्तावपत्र.

॥ श्री ॥

श्रीयुत **गोपीनाथ गणेश तळवलकर** वाङ्मयसेवक, पुणें यांस—

सप्रेम नमस्कार, वि० वि०—

'आशियाचे धर्मदीप' या नांवाचें एक उपयुक्त पुस्तक तुम्हीं लिहून छापलेलें मजकडे पाठविलें आणि प्रस्तावलेखानें तें वाचकांपुढें ठेवण्याची विनंति केली याबद्दल मी तुमचा आभारी आहें. माझ्या प्रस्तावानें तुमच्या कृतीचें मोल वाढतें असें मी मानीत नाहीं; तथापि माझा शब्द तुमच्या पुस्तकाची प्रसिद्धि करण्यास थोडाबहुत उपयोगीं पडेल तर त्यांत मलाही आनंद आहे, असें समजून हें पत्र मी लिहीत आहें. ज्या सुहृद्भावानें तुम्हीं मला या कामीं विनंति केली तीच भावना तुमच्या संबंधानें मींही व्यक्त करून विषयाकडे वळतों.

हल्लींचा मनु प्रचंड परिवर्तनाचा आहे. हें परिवर्तन केवळ राजकीय विषयांतच घडत नसून धर्म, समाज, वगैरे इतर बाबतींतही तितक्याच तीव्रतेनें व्यक्त होत असलेलें आपण पाहतों. आपल्या हल्लींच्या राष्ट्रीय आकांक्षा सफल होण्यास धर्माची व समाजाची नवीन घडी बसविणें किती आवश्यक आहे, हें प्रत्येक विचारी मनुष्यास चांगलें कळून येत आहे. आपल्यांतील नवे–जुने पक्ष आपापल्यापरी विचार व कृति करून इष्ट सुधारणा घडवून आणण्याच्या उद्योगांत गढलेले आहेत. अशा या खळबळीच्या कालांत पृथ्वीवरील प्रमुख धर्मांचे उगम, विस्तार व तत्त्वें थोडक्यांत स्पष्टपणें सांगणाऱ्या पुस्तकाची जरूर भासते, ती तुमच्या या प्रयत्नानें कांहीं अंशीं तरी भागेल असें मला वाटतें. भगवान् श्रीकृष्ण, गौतमबुद्ध, येशू ख्रिस्त, महंमद व झरतुष्ट्र या पांच थोर महात्म्यांचीं चरित्रें व त्यांच्या उपदेशाचें सार तुम्हीं दिलें आहे तें सर्व प्रकारच्या वाचकांस व विशेषतः तरुण मुलांमुलींस उपयोगीं पडेल, अशी माझी समजूत आहे. त्या चरित्रांत ऐतिहासिक काल-

निर्देश जे स्पष्टपणें उपलब्ध आहेत ते योग्य स्थळीं दिले असते तर वाचकांना त्या कालाची तुलनात्मक कल्पना स्पष्ट आली असती. उदाहरणार्थ, येशू ख्रिस्ताचा जन्म इसवी सनापूर्वीं चार वर्षे झाला म्हणजे आज पावेतों त्यास १९३७ वर्षें झालीं असें संशोधक समजतात. तसेंच आशियांतील धर्मदीप वर्णन करणाऱ्या पुस्तकांत प्राचीन चिनी धर्माचे प्रवर्तक ला ओत्स व कन्फ्यु-शस यांचा निर्देश अवश्य असावयास पाहिजे. कारण पृथ्वीवरील इतर प्रमुख धर्मांप्रमाणेंच चीनचा प्राचीन धर्मदेखील मोठ्या योग्यतेचा आहे.

तुम्हीं हें पुस्तक कोणत्या उद्देशानें लिहिलें तें प्रारंभीं दाखल करालच. मला असें वाटतें कीं, माझे सन्मान्य मित्र कै. वासुदेवराव आपटे यांचें सहकार्य तुम्ही करूं लागल्यावर गहन विषय सोप्या भाषेंत व थोडक्यांत लहानांस समजावून देण्याची जी स्तुत्य प्रथा त्यांनीं पाडिली तीच तुम्हीं अशा पुस्तकांचे द्वारें पुढें चालविली असावी. हा सदुद्योग असाच सतत नेटानें केल्यास नानाविध कृतींच्या निर्मितीनें सामान्य जनांच्या उपयोगाचे कठिण विषय सुगम करून सांगितल्याचें श्रेय तुम्हांस मिळणार आहे.

विवेचनविभाग, चरित्रविभाग व प्रार्थनाविभाग असे या पुस्तकाचे तीन विभाग तुम्हीं पाडिले आहेत. पैकीं चरित्रविभाग जो पुढें दिला आहे तो आरंभीं देऊन नंतर विवेचनात्मक सार दिलें असतें तर तें समजण्यास जास्त सुलभ झालें असतें. निरनिराळ्या धर्मांतील मूलभूततत्वें जरी एकच असलीं तरी प्रत्येक धर्मप्रवर्तकाचें जीवनवृत्त व तत्कालीन परिस्थिति यांतू-नच त्या त्या पुरुषांचे उपदेश कसे निर्माण झाले हें सहज दिसून येणारें आहे. प्रार्थनाविभागांत स्वीकारलेलीं पद्यें नमुनेदार असून तीं सर्वांनीं पाठ करण्याजोगींच आहेत. पुस्तकांतील सर्वांत चांगला व आजच्या परिस्थितींत मार्ग दाखविणारा भाग माझ्या मतें '**धर्माचें अंतर्राष्ट्रीय स्वरूप**' हा होय. त्यांतील विवेचन मुद्देसूद व विचारप्रवर्तनास मदत करणारें आहे. तें याहीपेक्षां जास्त विस्तृत करून प्रस्तुत कालच्या प्रश्नांस लागू करून दाखविलें

असतें तर जास्त परिणामकारक झालें असतें. अवकाश मिळाल्यास धर्मांचा हा विषय विशिष्ट अभ्यासानें तुम्ही सुस्पष्ट करालच. अशा विशिष्ट अभ्यासकांची आज आपणांस मोठी जरूर भासत आहे. हल्लीं निरनिराळ्या धर्मांचे व जातींचे अनुयायी आपलाच हेका चालवून एकमेकांशीं झगडण्यास प्रवृत्त झालेले पाहून विचारवंतांस त्यांची कींव आल्यावांचून राहात नाहीं. ज्या थोर महात्म्यांनीं धर्मांचें आद्य प्रवर्तन केलें त्यांची उदार व परोपकारी बुद्धि, पवित्र आचरण व निष्पाप रहाणी हे गुण सर्वकाळीं व सर्वांसच अनुकरणीय आहेत. याच्या उलट आज आपण आकुंचित दृष्टि धारण करून एकमेकांचा द्वेष करूं लागल्यास त्या थोर विभूतींचा आपण अपमान केल्यासारखेंच होत नाहीं काय ? त्या सर्वांचीं चरित्रें एकत्र वाचिलीं म्हणजे हा प्रकार उघड दिसूं लागतो. एकानें दुसऱ्याशीं विरोध करण्याची बिलकूल जरूर नाहीं आणि प्रत्येकाला आपापल्या धर्माप्रमाणें वागून समस्त राष्ट्राचें हित साधणें सर्वथैव शक्य आहे ही गोष्ट मनास पटूं लागते. यासाठीं प्रत्येकानें आपल्या मगदुराप्रमाणें अशा प्रकारचीं वाङ्मयकार्यें अंगावर घेऊन ज्ञानवर्धन व सन्मार्गदर्शन करणें विहित आहे. तशा प्रकारची स्फूर्ति तुमच्या या पुस्तकानें वाचकांचे ठिकाणीं उत्पन्न होईल असा मला भरंवसा आहे. याहून जास्त तें काय कळवूं ? तुमचा हा प्रयत्न सफल होवो असें चिंतून वाचकांनीं त्याचा आदर करावा अशी त्यांस शिफारस करितों.

कळावें, लोभ निरंतर असावा, ही विनंति.

कामशेत, ता. १९-५-१९३३ **गोविंद सखाराम सरदेसाई.**

६८८८

न. ४६० 21/10/33

# आत्मनिवेदन.

सहा वर्षांपूर्वीं Imitation of Christ हें रमणीय धर्मपुस्तक माझे सन्मान्य स्नेही श्री. गणेश विष्णु तुळपुळे, एम्. ए. [ पोस्टल सुपरिंटेंडंट ] यांनीं मला वाचायला दिलें. तेव्हांपासून इतर धर्मविचारांची श्रद्धापूर्वक ओळख करून घेण्याची तीव्र इच्छा होऊन मीं त्या दृष्टीनें वाचन सुरू ठेविलें. याच वेळीं मित्रवर्य श्री. दामोदर पंढरीनाथ शिखरे यांच्या मधुर संगतींत थिऑसफीनें नवीन ज्ञानाचा उजळा दिलेलीं प्राचीन धर्मतत्त्वें तोंडओळखीचीं झालीं. संशयवाद आणि निराशा यांनीं म्लान झालेल्या जीवकुसुमाचा विकास मित्रवर्य शिखरे यांच्या स्फूर्तिप्रद सहवासानें झाला. या काळांत झालेलें वाचन आणि मनन यांचें सुबोध लहानसें टिपण म्हणजेच प्रस्तुत पुस्तक होय.

हें पुस्तक प्रौढ विद्यार्थी आणि सामान्य जिज्ञासु वाचक यांच्याकरितां आहे. सर्व प्रमुख धर्मांतील आस्तिकवादाच्या कल्पना आणि नीतितत्त्वें हीं किती सारख्या तोंडावळ्याचीं असतात हें प्रस्तुत पुस्तकांतील पांच महानुभावांच्या लोकोत्तर चरित्रांवरून कळून येण्यासारखें आहे. अवतारपद, धर्मग्रंथाचें कर्तृत्व, आणि संस्कृतीचें प्रातिनिधित्व या तीन गुणांच्या कसोटीवर पारखून चरित्रांची निवड केली आहे. आदर्शभूत प्राचीन वाङ्मयांतील काव्यसौंदर्य कळावें म्हणून या चरित्रांतील अद्भुताची रोषनाई तशीच कायम ठेवली आहे. शेवटीं प्रमुख धर्मांतील प्रार्थना व स्तोत्रें दिलीं आहेत. दाविद, झरतुष्ट्र यांनीं रचलेलीं स्तोत्रें, सुफीगीत व Lead, Kindly Light सारखें लोकप्रिय भक्तिगीत यांची मुळांतील माधुरी थोडीफार तरी चाखायला मिळावी म्हणून त्यांचीं पद्यमय भाषांतरें केलीं आहेत. विवेचन, कथाभाग, आणि गीतमाला असें या पुस्तकाचें त्रिविध रूप आहे. पुस्तक निवळ मराठी वाचकांनाहि सुबोध व्हावें म्हणून परकी भाषेंतील उल्लेख रूपांतर करून दिले आहेत.

पुस्तकाविषयीं सांगावयाचें तें एवढेंच. आतां ह्या पुस्तकाची रचना करतांना ज्या माझ्या अनेक मित्रांनीं व सद्‌गृहस्थांनीं साह्य केलें त्यांचे हार्दिक आभार मानले पाहिजेत. माझे बालमित्र श्री. भय्यासाहेब उमराणी, यांनीं झरतुष्ट्री वाङ्मयावरील जुने, दुर्मिळ व महत्त्वाचे लेख मिळवून दिले. श्री. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर यांनीं सर्व पुस्तकांचें हस्तलिखित काळजीपूर्वक वाचून महत्त्वाच्या सूचना केल्या, तसेंच इस्लामी धर्मासंबंधींचीं पुस्तकें त्यांनीं दिलीं. प्रो. न. ग. दामले, प्रो. माधवराव पटवर्धन, प्रो. ज. नी. कर्वे, प्रो. दबडघाव, रा. गं. दे. खानोलकर इ० विद्वान् मित्रांनीं पुस्तकें मिळवून देण्यांत आणि सूचना देण्याचे कामीं बरीच मेहनत घेतली. गीतावाचस्पति सदाशिवशास्त्री भिडे आणि श्री. दा. न. शिखरे ( उपसंपादक केसरी ) यांचीहि मला मदत झाली.

मुंबईचे झरतुष्ट्री पंडित मि. इराणी व प्रसिद्ध थिऑसफिस्ट प्रो. रा. स. भागवत यांची व माझी तर तोंडओळखही नव्हती. पण माझ्या एका निव्वळ कार्डावर त्यांनीं आपापल्या विषयांची माहिती आस्थेनें पाठविली. मि. इराणी यांनीं तर आपलीं पुस्तकेंहि पाठविलीं. मि. इराणी यांच्या लिखाणाची मदत मला फारच झाली. एका इस्लामी पंडितांनीं महंमद पैगंबरचें चरित्र तपासून दिलें. पण त्यांच्या विनम्र विनंतीस अनुसरून त्यांचा उल्लेख करतां येत नाहीं याचें वाईट वाटतें.

साहित्यसम्राट् रा. तात्यासाहेब केळकर, प्रो. पोतदार, श्री. माटे, श्री. दा. ना. आपटे, श्री. आंबेकर या प्रख्यात साहित्यसेवकांनीं माझें पुस्तक वाचून आपले आशीर्वादपर अभिप्राय दिले व रियासतकार नानासाहेब सरदेसाई यांनीं प्रस्तावपत्र लिहिलें, यायोगें मला कितीतरी उत्साह वाटत आहे. आनंद तर अलोटच झाला आहे.

मुखपृष्ठावरील आकर्षकतेस रा. देशपांडे व रा. चिकुर्डेकर या कोहिनूर फोटोझिंकोच्या संचालकाचे परिश्रम कारण झाले.

माझे हितचिंतक व 'आनंद' मुद्रणालयाचे मालक श्री. गोपाळराव जोशी यांनीं छपाईच्या बाबतींतली माझी हरएक हौस प्रेमभावानें पुरविली.

या साऱ्या स्नेह्यांचें व सद्गृहस्थांचें सहकार्य लाभलें म्हणनच हें पुस्तक या स्वरूपांत प्रकट होत आहे. यांचे आभार मानावे तितके थोडेच. असो. हें पुस्तक जनताजनार्दन गोड करून घेवो हीच इच्छा.

आनंदकार्यालय, पुणें.<br>
जून १९३३

सर्वांचा नम्र<br>
**गोपीनाथ गणेश तळवलकर.**

# अनुक्रमणिका.

विषय. | पृष्ठ.


[ विवेचन–विभाग ]

१ धर्म आणि संस्कृति .... .... .... ३
२ अवतार .... .... .... .... ९
३ पूर्णावतार .... .... .... .... १९
४ दोन धार्मिक समाजसत्तावादी .... .... ... २७
५ महंमदाचें अलौकिक जीवन .... .... .... ३४
६ एक रमणीय तत्त्वज्ञान ... ... ... ४०
७ धर्माचें अंतर्राष्ट्रीय स्वरूप ... ... ... ४७

[ चरित्र–विभाग ]

१ श्रीकृष्ण .... ... ... .... ६१
२ गौतमबुद्ध ... ... ... .... ८२
३ येशू ख्रिस्त .... ... ... ... ९८
४ महंमद पैगंबर ... ... ... ... १११
५ झरतुष्ट्र ... ... ... ... १२४
परिशिष्ट ... ... ... .... १३४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ...... नं. ......
ता. ......

# अर्पणपत्रिका.

थोरले मामा

ती. रा. भगवान सदाशिव भडकमकर,

व

सौ. सावित्री मामी

या उभयतांस प्रेमपूर्वक समर्पण.

**गोपीनाथ.**

# आशियाचे धर्मदीप.

[ विवेचन-विभाग ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. नं. ६५८६
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. च - नं. ७६०
ता. २१/५/३३
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४८३५
ठाणे

# १. धर्म आणि संस्कृति.

आशिया खंड हा जगांतील अत्यंत प्राचीन, संपन्न आणि विशाल भूमिभाग आहे. अनेक थोर धर्म आणि कला येथें प्रथम जन्म पावल्या आणि नंतर त्यांचा जगावर विस्तार झाला. अनेक मातबर राजवंशांचे उदयास्त आशियाखंडानें पाहिले आहेत. उत्तरध्रुवाजवळील आपलें बर्फमय वसतिस्थान सोडून पराक्रमी व प्रतिभाशाली आर्यलोक प्रथम उतरले ते आशियाखंडांत. भोवतालचीं रमणीय सरोवरें, गगनचुंबी पर्वत, सुंदर वनश्री, अफाट मैदानें आणि या सर्वांवर वितानाप्रमाणें शोभणारें स्वच्छ नीलाकाश असें निसर्गसौंदर्य पाहून आर्यांचें काव्यात्म मन उचंबळून आलें. स्फूर्तीच्या उद्रेकासरशीं त्यांच्या तोंडून अप्रतिम काव्य उमटलें. तेंच जगाचें आदिकाव्य होय.

"प्रथम प्रभात उदित तव गगने
प्रथम सामरव तव तपोवने
प्रथम प्रचारित तव वनभवने
देशधर्म कविदैविकवाणी ॥"

हे कविसम्राट् रवीन्द्रनाथ टागोरांचे उद्गार केवळ भारतालाच नव्हे, तर सर्व आशियाखंडालाच यथार्थतेनें लावतां येतील.

हिमप्रदेशांतून अवतरलेल्या आर्यांचाच एक संघ युरोपकडे वळला आणि आशिया-युरोपच्या सरहद्दीवर संचार करूं लागला. कोणी आशियांत राहिले तर कोणी थोडेसे युरोपच्या अंतरंगांत शिरूं लागले. अशा रीतीनें एका ठिकाणीं साठलेल्या प्रतिभेच्या प्रज्वलित अग्नींतून अनेक स्फुलिंग जगभर पसरले आणि त्यांतून निरनिराळे पुरुषोत्तम ( Super Men ) युगायुगाचे ठायीं जन्मास आले.

परमेश्वराकडून पृथ्वीला मिळालेला प्रतिभेचा ठेवा प्रथम आशियाच्या भूमीवरच उघडला गेला आणि नंतर त्याची जगभर वाटणी झाली. मनुष्यजात सुधारणेचा मार्ग आक्रमूं लागल्याला उणींपुरीं पांच हजार वर्षें झालीं असें आपण मानतों. एवढ्या काळांत जगदुद्धारासाठीं झटणारे अनेक महर्षी येथें होऊन गेले हें तर खरेंच. पण आज जे प्रमुख धर्म रूढ आहेत आणि जवळ जवळ सर्व सुधारलेलें जग ज्या धर्मांच्या संजीवनीनें आजवर उन्नत होत आलें आहे, त्या धर्मांचे उद्धारक व संस्थापक आशियाखंडांतच जन्मले आणि आशियाखंडांतच त्यांनीं आपलें अवतारकार्य केलें. श्रीकृष्ण, बुद्ध, ख्रिस्त, महंमद आणि झरतुष्ट्र हे ते अखिल जगाच्या धार्मिक संस्कृतीचे 'पंचप्राण' होत. म्हणूनच 'आशियाचे धर्मदीप' म्हणजे पर्यायानें सर्व जगावर ज्ञानतेज वितरणारे 'जगाचे धर्मदीप' होत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हे पांच धर्मदीप भूतदयेच्या स्नेहानें तेवत आहेत. तथापि या एका साम्याखेरीजहि परस्परांतील त्यांचे संबंध अधिक दृढ आहेत.

सर्वांच्या तत्त्वज्ञानाचीं मूलतत्त्वें एक आणि त्यांचें अंतिम उद्दिष्टहि एकच असल्यानें त्यांच्यांत मूलतः फारसा भेद आढळून येत नाहीं. श्रीकृष्ण आणि बुद्ध यांचीं स्वरूपें बाह्यात्कारीं अगदीं भिन्न वाटतात खरीं; पण त्यांच्यांतहि एकरूपता आहे. बुद्ध हा जन्मानें आणि संस्कारांनीं हिंदु होता. बुद्धाचें तत्त्वज्ञान बरेंचसें सांख्य मतावर आधारलेलें आणि 'सांख्यमताचा जनक कपिलमुनि तो मी स्वतःच आहें' असें श्रीकृष्ण म्हणतो. * बुद्धानें यज्ञयाग, पशुवध इ० ब्राह्मणी विधींचा निषेध केला आणि परमेश्वराच्या अस्तित्वावरील विश्वास स्पष्टपणें कोठेंहि प्रकट केला नाहीं, तरी परमेश्वराच्या दशावतारांत त्याची गणना करण्यास हिंदूंना संकोच वाटत नाहीं आणि त्यावर स्तोत्रेंहि रचिलीं जातात. ‡

येशू ख्रिस्त आणि महंमद यांच्याहि परस्परसंबंधांत ही नवलपूर्ण आत्मीयता दिसून येते. येशू आणि महंमद यांचे मार्ग बाह्यतः किती परस्परभिन्न ! "जे तलवार चालवितील ते तलवारीनेंच मरतील" असें म्हणून येशू आत्मसंरक्षणासाठीं सुद्धां प्रतिकार करीत नाहीं. तर "तलवारीच्या छायेखालींच नंदनवन वसलेलें आहे," असें प्रतिपादन करून महंमद धर्मप्रसाराकरितां समशेर चालवितांना आढळतो. पण दोघांच्या वृत्तींत हा फरक असला तरी येशूनेंच महंमदाच्या आगमनाचें भविष्य वर्तवून ठेविलें होतें असें मानण्यांत येतें. महंमदी धर्माच्या मूळ पुरुषांत येशूला स्थान आहे. स्वर्गाच्या सफरीला महंमदाला नेत असतां वाटेंत येशूचें निवासस्थान लागतांच देवदूत जेब्राइलनें महंमदाला क्षणभर थांबायला

---

* "सिद्धानां कपिलो मुनिः"—भ. गीता.

‡ "निंदसि यज्ञविधेरहह श्रुतिजातम् ।
सदयहृदय दर्शितपशुघातम्
केशवधृतबुद्धशरीर । जय जगदीश हरे"—
गीतगोविंद [ जयदेव ]

सांगितलें आणि म्हटलें, " हें पहा, येशूचें ठिकाण. येथें वंदन करून पुढें जाऊं" महंमदानेंहि भक्तिभावानें वंदन केलें. आदम (ॲडॅम्), इब्राहीम (एब्राहम), दाविद (डेव्हिड), मूसा (मोझेस्) इ० इस्लामी पुराणपुरुष मूळ खिस्ती पुराणांत आहेत हें प्रसिद्धच आहे.

इतकेंच काय, पण नवीन धर्माच्या संस्थापनेची पूर्व तयारी करतांना महंमदानें साधकावस्थेंत जो काळ घालविला त्यांत देखील खिस्ती धर्मज्ञानाचें त्याला बरेंच साह्य झालें. एकतर व्यापाराच्या निमित्तानें दूर दूर हिंडत असतां त्याचा अनेक खिस्ती पंडितांशीं परिचय झाला होता. दुसरें, खिस्ती धर्माचा तज्ज्ञ जो वराका तो त्याच्या प्रथम पत्नीचा नातेवाईक असल्यानें त्याच्याशीं सहविचार करण्यांत महंमदाला खिस्ती धर्मज्ञानाची माहिती मिळाली. महंमदाच्या उपदेशाकडे सूक्ष्मपणें पाहिल्यास कित्येक ठिकाणीं येशूच्या व त्याच्या तत्त्वांत एकवाक्यता असलेली आढळून येते ती यामुळेंच.

झरतुष्ट्री धर्माला प्राचीन आर्यधर्म जवळचा आहे. आर्यांपैकींच कांहीं लोक इराणांत गेले आणि त्यांनीं तेथें वसाहत करून आपला धर्म व संस्कृति प्रस्थापित केली. प्राचीन आर्यलोक सूर्य, चंद्र, आकाश, अग्नि इ० ना परमेश्वरी विभूति मानीत, तसेंच झरतुष्ट्री धर्मांतहि मानतात. विशेषतः अग्निपूजा आणि यज्ञोपवीत हीं आर्यहिंदुधर्माप्रमाणेंच झतुरष्ट्री लोकांतहि रूढ आहेत. इंद्रादि अमरांना विलोभनीय वाटणारा आर्ययज्ञांतील सोमरस आणि झरतुष्ट्री धर्मांतील 'हओम' नांवाचें पवित्र पेय या दोघांत साम्य आढळतें. आतां तर भाषाशास्त्रज्ञांनीं फार्सी व वैदिक शब्दांचा तौलनिक अभ्यास करून झरतुष्ट्री व आर्य या दोन संस्कृतींतील सादृश्य ठळकपणें दाखविलें आहे.

खिस्ती धर्माशींहि झरतुष्ट्राचा परिचय जुना आहे. झरतुष्ट्री धर्माच्या पूर्वींपासूनच फार्सी लोकांचा खिस्ती लोकांशीं संबंध आलेला दिसतो. जेरुसलेमचें पवित्र देऊळ इराणच्या कायरस बादशहानें बांधलें असें खिस्ती

समजत. यहुद्यांच्या कांहीं प्रेषितांना प्राचीन इराणी बरेच मान देत. पुढें झरतुष्ट्रानें आपला धर्म प्रतिपादन केल्यानंतर त्यांतील उदात्त तत्त्वें ग्रीक व रोमन तत्त्ववेत्त्यांना अभ्यासावींशीं वाटलीं आणि झरतुष्ट्राला ते एक महान् विचारवंत म्हणून मान देऊं लागले. या गोष्टी पाहतां ख्रिस्ती व झरतुष्ट्री धर्म अन्योन्यांना चांगलेच परिचित असावेत हें स्पष्ट होतें.

यावरून प्रस्तुत पांच धर्मसंस्थापकांचे व त्यांच्या धर्मांचे अन्योन्य संबंध कळून येतील. या मुख्य धर्ममतांतून अनेक शाखोपशाखा निघाल्या. खुद्द आशियाखंडांतच आज शेकडों पंथ व दर्शनें प्रचलित आहेत. तथापि प्रस्तुत पांच मुख्य धर्म अन्योन्यसंबंधी असून त्यांपैकीं प्रत्येकाला स्वतंत्र संस्कृति आहे.

धर्मसंस्थापनेस कारण होणारी स्फूर्ति निव्वळ वेदान्त व नीति यांनाच जन्म देते असें नाहीं; तर ती संस्कृतीच्या इतरहि अंगांचा विकास करते. वाङ्मय, संगीत, शिल्प, इत्यादिकांवर धर्मांतील विशिष्ट तेजाची छटा बिंबते आणि त्या त्या मानववंशांतील गुणांचा आविष्कार त्यांच्या त्यांच्या धर्मांतील विशिष्ट मूलतत्त्वांस अनुसरून होऊं लागतो. कारण समाजाचें धारणच मुळीं धर्माच्या पायावर होतें. अगोदर उभारलेल्या कमानीच्या आधारानें वेल ज्याप्रमाणें पसरूं लागावी आणि तीवर ठायीं ठायीं फुलें उमलावीं, त्याप्रमाणें धर्मतत्त्वांचा आधार घेत संस्कृति विकास पावते आणि विविध कलांगांचे सुंदर प्रसव तींत निर्माण होतात.

धर्म आणि संस्कृति यांचें असें अभेद्य नातें आहे. 'अग्निमीळे पुरोहितम्' हे स्वर विद्वान् ब्राह्मणांच्या तोंडून ऐकूं आले, कीं श्रोत्याला हविर्द्रव्याचा वास येऊं लागतो, धूमाकुलित दृष्टि झालेल्या पुरोहितांचा वर्ग दिसूं लागतो आणि उदात्त वातावरणांत मन संचरूं लागतें. सह्याद्रीच्या दुर्गम उदरांत शिल्पकलेचा आदर्शच असा सुंदर व प्रशांत बौद्ध-विहार पाहिला म्हणजे एकतऱ्हेचें निर्वेदाचें व गांभीर्याचें आवरण मनावर पसरतें; तेंच रविवारीं सकाळीं ख्रिस्ती चर्चवरून जातांना जी शांत,

प्रेमळ, सुरेल सामुदायिक प्रार्थना ऐकूं येते ती ऐकून कोणत्या श्रद्धाळु मनावर विश्वबंधुत्वाच्या व ईश्वरभक्तीच्या संदेशाचा ठसा उमटणार नाहीं ? तसेंच अन्य उदाहरण घ्यावयाचें झाल्यास इस्लामी धर्माचें व संस्कृतीचें. पिरामिडला वळसा घालून उंटावरून चाललेल्या एकाद्या काफिल्याचें चित्र पहा. ' अल्ला हो अकबर ' ही आर्तगंभीर प्रार्थना ऐका अथवा दिल्ली येथील बादशाही शिल्पाच्या नमुन्याकडे नजर फेका; इस्लामी धर्मांत आढळून येणारी उत्कटता, कडवेपणा आणि विलास-प्रीति हीं त्यांत आढळून येतील. सारांश, संस्कृतींतील आदर्श हे त्या त्या धर्माचें तेज घेऊन अवतीर्ण होतात. एकाद्या संस्कृतींत तिच्या धर्माच्या तेजाचें प्रतिबिंब दिसतें तें यामुळेंच.

तथापि कालांतरानें संस्कृति आपल्या उच्चतेपासून ढळूं लागते; तिचा शुद्धप्रवाह गढूळ होतो; धर्मतत्त्वाच्याविरुद्ध तिची वागणूक होऊं लागते; अशा वेळीं कोणीतरी पुरुषोत्तम जन्मास येऊन पुनः धर्मसंस्थापनेचें कार्य करतो. त्यालाच अवतार किंवा प्रेषित असें म्हणतात. ह्या पुरुषश्रेष्ठाच्या उदयाबद्दल थोड्याफार फरकानें सर्व धर्मांत साधारण सारखींच श्रद्धाळु मतें प्रचलित आहेत. तेव्हां त्यांचें विवरण करणें अवश्य आहे.

# २. अवतार.

पर्वतशिखरावरून धों धों फेसाळत येऊन खालीं खोल दरींत घुसणाऱ्या एकाद्या जलप्रपाताप्रमाणें अवतारी पुरुषाचें जीवन आहे. प्रपाताला काळ्याकभिन्न पहाडांतून आपला मार्ग काढावा लागतो, अवतारी पुरुषाच्या कार्यांत अडचणींचे असेच डोंगर असतात. प्रपाताचें जीवन शुभ्र, स्फूर्तिदायक आणि वेगवान् असतें, तसेंच अवतारी पुरुषाचें; आणि प्रपातापासून सामर्थ्यवान् विद्युत् तयार होते, तद्वत् अवतारी पुरुषाच्या चरित्रापासून सर्व जनतेंत नवचैतन्य देणारें तेज जन्मास येतें. म्हणूनच दोघांच्या तेजस्वी जीवनौघाकडे पाहतांना आपण मूढ होऊन सभय, सविस्मय आणि सादर दृष्टीनें पाहत असतों.

कोठेंहि विभूतिमत्त्व दिसलें कीं भक्तीनें शिर विनम्र करावयाचें हा माणसांचा स्वभावधर्मच आहे. जेव्हां आपण असें पाहतों कीं, अचाट

कर्तृत्वाचा कोणी एक महापुरुष आपल्या शीलानें व प्रतिभेनें सर्व जनतेंत क्रांति घडवून आणीत आहे, आणि मानवी सामर्थ्यानें ज्या संकटांचें निवारण होणें केवळ अशक्य आहे अशा संकटांतून सुखरूप बाहेर पडून आपलें कार्य अबाधित चालवीत आहे, तेव्हां आपणास साहाजिकच असें वाटतें कीं, 'हा कांहीं मानवी कोटींतला पुरुष नव्हे; मानवालाहि अतर्क्य असणाऱ्या महाशक्तीचें याला साह्य आहे; याच्या बोलण्यांत पहावा तों दुर्दम्य आत्मविश्वास, दूरदृष्टीची पोच तर अशी विलक्षण कीं प्रतिकूल परिस्थितींतून त्याला नेहमींच अचूक वाट सापडते; भौतिक कारणांवरहि नियंत्रण ठेवून आपलें उद्दिष्ट पार पाडावयाची याची विलक्षण तयारी, आणि व्यक्तिमत्तेचा प्रभाव असा अजब कीं याचे शब्द म्हणजे लोकांना परमेश्वराचीं निःश्वसितेंच वाटतात. खास कांहीं तरी अदृश्य शक्तिच या ठिकाणीं वास करते आहे!'

आपला एकजिनसीपणा टाकून विविध रूपें धारण करावीं अशी इच्छा परमेश्वराला झाल्यानंतर ही अनंत सृष्टि निर्माण झाली. अर्थात् सर्व चराचर हें त्याचेंच रूप आहे. तथापि प्रत्येक माणसाला कांहीं आपण अवतार मानीत नाहीं; अलौकिक प्रतिभेच्या पुरुषालाच ही संज्ञा आपण देतों. निरनिराळ्या ठिकाणचीं लहानमोठीं जलाशयें आणि महासागर यांत जें अंतर तेंच लहानमोठीं माणसें आणि अवतारी पुरुष यांत आहे. प्रत्येक माणसांत ईश्वराचा अंश असतो, परंतु अवतारी पुरुष हा पूर्णांशानें निदान बव्हंशानें ईश्वरच आहे अशी आपली श्रद्धा असते.

प्रस्थापित धर्म हा कालांतरानें गढूळ होत जातो. धर्मतत्त्वाची ओळख बुजली जाऊन बाह्यविधींचें व तंत्रांचें स्तोम माजतें, स्वार्थाचा अंमल धर्मावर चालू होतो आणि आपल्या ठिकाणीं असलेल्या ईश्वरी तत्त्वाची जाणीव मनुष्यजातीला न राहून पाप आणि अनाचार यांचा धिंगाणा सुरू होतो. आपणांला उन्नत व्हावयाचें आहे, ऐहिक उपभोगाच्याहि वर शाश्वत असें निःश्रेयस आपणांस मिळवावयाचें आहे याचा मनुष्य-

मात्राला विसर पडतो. तेव्हां 'दुष्कृतांचा विनाश' करून 'साधूंचें परित्राण' करण्याकरितां परमेश्वर अवतार घेतो. बाबू अरविंद घोष यांनीं अवताराची सुंदर मीमांसा केली आहे. त्यांच्या विवेचनाचें सार असें कीं, मानवी रूप धारण करण्यांत परमेश्वराचे दोन संकल्प असतात. १. अवतार—म्हणजे ईश्वरी सिंहासनावरून उतरून स्वतः मनुष्यप्रकृति व रूप धारण करणें, आणि २. उद्धार—म्हणजे आत्मतेजाचा साक्षात्कार करून देऊन मनुष्याला देवकोटीला नेणें. मनुष्याला हा नवीन जन्म देणें हाच अवताराचा आणि धर्माचा हेतु आहे. परमेश्वर जेथें उतरला तेथपर्यंत चढून जाणें हें आपणां मर्त्य मानवांचें कर्तव्य आहे.*

बहुतेक धर्मांतील अवतारांसंबंधींची कल्पना याच वळणाची आहे. फरक इतकाच कीं, हिंदुधर्म अवतार म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच मानवरूप घेऊन आला आहे असें मानतो, तर इतर धर्मांत परमेश्वर आपल्या पुत्राला वा प्रेषिताला भूमीवर पाठवितो अशी समजूत आहे. झरतुष्ट्राच्या मातेच्या दुधांत दैवी तेज मिसळलें होतें, तर महंमद लहान असतांना देवदूतांनीं त्याचें हृदय शुद्ध करून त्यांत तेज भरलें अशा कथा आहेत. श्रीकृष्ण व बुद्ध यांना परमेश्वराचे अवतार समजतात, तर येशू हा देवाचा पुत्र गणला जातो. सारांश, अवतार अथवा प्रेषित म्हणजे पर-

* "For there are two aspects of the divine birth; one is a descent, the birth of God in Humanity, the Godhead manifesting itself in the Human form and nature, the eternal Avtar; the other is an ascent, the birth of man into the Godhead, man rising into the divine nature and consciousness, madbhâvam âgatah; it is the being born anew in a second birth of the soul.........It is the manifestation from above of that which we have to develop from below; it is the decsent of God into that divine birth of the human being into which we mortal creatures must climb;" —Arbind Ghose.

मेश्वर किंवा त्याच्या तेजानें संपन्न असलेला पुरुष लोकाभ्युदयासाठीं जन्मास येणें हीच कल्पना सर्व धर्मांत दृढमूल झालेली दिसेल.

अवतारासंबंधींची थिऑसफींतली विचारसरणी मननीय आहे. सर्व जगावर नियंत्रण चालविणारा पुण्यवान् व सामर्थ्यवान् महात्म्यांचा एक मोठा संघ आहे. हे मानवांचे साह्यकर्ते होत. आगामी संकटाची सूचना मिळणें, सुरक्षित स्थळीं जाण्याची प्रेरणा होणें, ऐन आपत्तीच्या तोंडीं पडत असतां तेथें अचानक सहाय्यक येऊन उभा राहणें इ० ज्या गोष्टी मनुष्याच्या प्रत्ययाला येतात त्या सर्व हे पुण्यात्मेच घडवून आणीत असतात. परमेश्वरानें हें सर्व चराचर व्यापलें आहे. “ फुलांतील सौंदर्य, वृक्षांतील सामर्थ्य, जनांवरांतील चपळपणा व ऐट, तसेंच मनुष्याचें हृदय व आत्मा हें त्याचेंच रूप होय. त्याची इच्छा सर्वांचा विकास व्हावा ही आहे; म्हणूनच सर्व जीवमात्र पुढें पुढें जात आहेत. ” जीव-सृष्टीच्या या विकासाला सर्वतोपरि साह्य करून परमेश्वरी इच्छा फलद्रूप करण्यांत हे पुण्यात्मे तत्पर असतात. त्यांतलाच एकादा पुण्यात्मा धर्म-ग्लानीच्या काळांत प्रत्यक्ष सृष्टींत अवतरून पुनः धर्मस्थापना करतो.* अगदीं लहान जीव देखील जन्मोजन्मीं प्रगत होत जातात ही कल्पना, बुद्धानें अनेक जन्म घेऊन निरनिराळ्या अनुभवांचा संचय करीत करीत श्रेष्ठपद कसें मिळविलें ही कथा वाचून स्पष्ट होईल. जैनांचे अनेक तीर्थं-कर आणि थिऑसफीचा ऋषिसंघ यांतील साम्य विचारणीय आहे. तात्पर्य, बाबू अरविंद घोष यांच्या मीमांसेप्रमाणें परमपदाकडे जाणें हें प्राणिमात्राचें श्रेष्ठ कर्तव्य होय आणि त्या कर्तव्याची जाणीव करून देण्याकरितांच परमेश्वर किंवा त्याच्या तेजानें संपन्न असलेले प्रेषित हे

* यासंबंधीं “ Invisible Helpers ” आणि “ The Masters and the Path ” हीं रेव्ह० सी. डब्ल्यू लेडबीटर यांचीं सुंदर पुस्तकें जिज्ञासूंनीं अवश्य वाचावीं.

वेळोवेळीं भूतलावर अवतीर्ण होत असतात. याच कल्पनेला थिऑसफीनें पुष्टि दिली आहे.

"आदम हा स्वतः परमेश्वर नसला तरी तो परमेश्वराहून कांहीं वेगळा नाहीं"* हें वचन सुप्रसिद्ध आहे. या दृष्टीनें अवतार आणि प्रेषित हे एकरूपच होत हें कळून येईल. म्हणून विवेचनाच्या सोयीकरितां सर्वांना अवतार संबोधणेंच योग्य होईल.

सर्व अवतारांच्या चरित्रांवर काल्पनिक आणि अद्भुत गोष्टींचा साज चढविलेला असतो याचें कारण सहजच कळून येईल. अवताराच्या हातून सहज लीलेनें घडणाऱ्या गोष्टी मानवी सामर्थ्याच्या बाहेरच्या आहेत, असें जेव्हां मनुष्यांना वाटतें तेव्हां जगांतील अदृश्य शक्तीकडे साहजिकच त्यांचें कर्तृत्व जोडण्यांत येतें, आणि मनुष्याची भाविक प्रतिभा त्या गोष्टींची संगति लावण्यांत व अवतारांचें संकीर्तन करण्यांत गुंग होऊन मनोहर कल्पनांचें जाळें विणूं लागते. अवताराच्या जन्मकालीं होणारा सृष्टीचा मंगल महोत्सव, त्यांच्या निर्वाणसमयीं घडून येणारे उत्पात, त्यांना ईश्वरी संदेश पोचविण्याकरितां वेळोवेळीं प्रकटणारे देवदूत, प्रबळ पंचमहाभूतांची त्यांच्या ठिकाणीं आढळून येणारी आज्ञाधारकता इ० गोष्टी म्हणजे कल्पकतेनें या अवतारांवर चढविलेलीं अनुपम लेणीं होत. हा कल्पकतेचा अत्यंत हृदयंगम विलास जगांतील अभिजात काव्यांत पहावयास मिळतो. या काव्यांतील प्रसाद, रसाळपणा, आणि शाश्वत सौंदर्य ढळूं न देतां अवतारांच्या चरित्राकडे श्रद्धायुक्त पण विवेचक बुद्धीनें पाहणें अगदीं शक्य आहे. अवतारांच्या चरित्रांतील अद्भुत व काल्पनिक कथांचा खरा अर्थ समजून घेऊन त्यांत दडलेलीं नैतिक तत्त्वांचीं अमूल्य रत्नें हुडकून काढणें हाच खऱ्या धर्मसंशोधकाचा हेतु होय.

---

* "आदम् खुदा नही लेकिन् खुदाके नूरसे आदम् जुदा नही।"

प्रत्येक अवतार त्या त्या काळांतला श्रेष्ठ सुधारक असतो असें म्हटलें तर गैर होणार नाहीं. धर्मांत माजलेली वतनदारी, स्वार्थपरायणता व भोंदूपणा हीं त्याला नाहींशीं करावयाचीं असतात. कालाच्या ओघांत धार्मिक तत्त्वांचीं सुवर्ण नाणीं झिजून झिजून गुळगुळीत झाल्यामुळें त्यांची खरी किंमत लोकांस कळेनाशी होते. म्हणून तीं सर्वच विवेकाग्नीनें वितळून टाकून नवीं नाणीं पाडण्याचा उद्योग अवतारी पुरुष आरंभितो. या उद्योगाचें यथार्थ स्वरूप आकलन करण्याची शक्ति नसल्यामुळें स्वतःला धार्मिक म्हणविणारे तत्कालीन लोक अवताराविरुद्ध एकच हाकाटी सुरू करतात. 'हा पाखंडी, सनातन धर्माचा द्वेष्टा, सत्ताभिलाषी, आणि भोंदू आहे' असा गिल्ला करून हे धर्ममार्तंड सामान्य जनतेला अवतारी पुरुषाविरुद्ध फितवूं पाहतात आणि राजसत्ताहि कित्येकदां त्यांची साह्यकर्ती होते. भारतवर्षांतील क्षत्रियांनीं श्रीकृष्णाला नेस्तनाबूद करण्याचा चंग बांधला, महंमदाला अरबी कुरेशांनीं धोंडे मारून रक्तबंबाळ केलें, बुद्धाचें चारित्र्य निंद्य आहे असें दाखविण्याचे अधम प्रयत्न भिक्षुकांनीं केले, पारशी भटांनीं झरतुष्ट्राच्या वाटेंत अडथळे आणिले आणि संतशिरोमणि येशूला तर भिक्षुकशाहीच्या क्रोधापायीं देहसमर्पण करणें भाग पडलें! यावरून अवतारी पुरुषाच्या कार्याबद्दल धर्माचे रखवालदार म्हणविणाऱ्या परंपरावाद्यांना किती द्वेष असतो तें स्पष्ट दिसून येईल.

तथापि परंपरावाद्यांच्या जहरी फूत्कारांनीं अवतारी पुरुषाचें कार्य नाश पावत नाहीं; तर तें वर्धिष्णुच राहतें. कारण अवतार जन्माला येण्यापूर्वीं सर्व जनतेंत एक तऱ्हेचा असंतोष व क्रांतीविषयींची उत्सुकता पसरलेली असते. जुलमी व विकृत धर्माखालीं चिरडल्या जाणाऱ्या जीवांना खऱ्या धर्माची व शांतीची भूक लागलेली असते. त्यांच्यांतील सद्भावना परमेश्वरास आळवून अवतार घेण्याची विनंति करीत असतात. दुष्टांच्या छळानें गांजलेली पृथ्वी जगन्नियंत्यास शरण गेली असें जें वर्णन

आपण वाचतों त्याचा हाच अर्थ आहे. श्रीकृष्णाच्या जन्मापूर्वीं नंद, वसुदेव, विदुर, भीष्म इ० किती तरी सत्त्वस्थ लोक होते. जुलमी क्षत्रियांच्या छळानें चाललेली समाजाची विटंबना त्यांनाहि पाहवत नव्हती. पण दुष्टांचें निर्दालन करून स्वधर्माची स्थापना करण्याइतकें दैवी तेज त्यांपैकीं कोणांत नव्हतें. तथापि श्रीकृष्णानें आपलें जीवनकार्य आरंभतांच हा ईश्वरी अवतार भूतलावर आला आहे असें त्यांनीं तत्काळ ओळखलें आणि मोठ्या आनंदानें तशी घोषणा केली. सारांश, अवतार जन्माला येण्याचे सुमारास विकृत धर्माविरुद्ध जी चीड आणि खऱ्या धर्माबद्दलची जी सद्भावना समाजांत असते तिला अवतारी पुरुषाच्या कार्यामुळें तोंड फुटतें आणि हळू हळू त्याची ओळख सर्वांना पटत जाऊन भक्तिमान् अंतःकरणें त्या पुरुषाच्या पायापाशीं अवनम्र होतात.

वर जो सुवर्णनाण्यांचा दृष्टांत सांगितला तोच पुनः घेऊन सांगावयाचें म्हणजे नवीन पाडल्या जाणाऱ्या नाण्यांत सुवर्ण जसें पूर्वींचेंच असतें तसें अवतारी पुरुष जो नवा धर्म स्थापतो त्याचें मूळ प्रचालित धर्मांतच असतें. तो अगदींच नवीन असा धर्म कांहीं भूतलावर आणीत नाहीं. पृथ्वीवरील संगमरवरी दगड व इतर सामुग्री घेऊन आपल्या प्रतिभाबलानें एकादा शिल्पकार जशी ताजमहालसारखी अनन्यसुंदर इमारत उभवितो किंवा भाषेंतील रूढ शब्द घेऊन एकादा रससिद्ध कवि जसें मेघदूतासारखें रम्य काव्य निर्माण करतो तसेंच अवतारी पुरुष रूढ धर्मांतूनच निवडक सामुग्री घेऊन नवा धर्म प्रस्थापित करतो. या दृष्टीनें अवतारी पुरुषाला दैवी कलावंत म्हणतां येईल. पूर्वींच्या उपनिषदांची गाय पिळून गोपालनंदनानें गीतामृताचें दुग्ध काढलें, प्राचीन हिंदुधर्मांतल्या यज्ञविधींना फांटा देऊन त्यांतील त्यागाची कल्पना तेवढी बुद्धानें नव्या स्वरूपांत जगापुढें मांडली आणि ख्रिस्ती धर्मांतील निर्गुणोपासनेची शिकवण घेऊन महंमदानें आपला एकेश्वरी धर्म निर्माण केला. ‘ मी जुनें धर्मशास्त्र रद्द करण्यास आलों नाहीं, तर त्यास पूर्णता देण्यास

आलों आहें. ' ह्या येशूच्या मार्मिक वाक्याचें रहस्य यावरून ध्यानांत येईल.

सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर अवतारी पुरुषाच्या जीवनकार्याला हातभार लावण्याकरितांच म्हणा, त्याच्या जन्माआधीं व त्या सुमारास नवधर्मांच्या स्थापनेचे प्रयत्न चाललेले दिसून येतात. येशूचा अवतार होण्याचे सुमारास विरक्त वृत्तीचा योहान जार्डन नदीच्या तीरावर संचार करून लोकांची मनोभूमिका शुद्ध करण्याचे यत्न करीत होता. बुद्धाच्या चरित्रांतहि हेंच दिसून येतें. आलारकालम, उद्रक तसेंच पांच भिक्षु इ० साधकावस्थेंतील बुद्धाचे गुरु जो उपदेश व धर्माचरण करीत त्यांचें स्वरूप आगामी बौद्धधर्माशीं कितीतरी सदृश होतें. अशा रीतीनें नवीन धर्माच्या निर्मितीपूर्वीं त्या धर्माची अंधुक कल्पना असणारे धार्मिक लोक नेहमींच आढळतात. अवतारी पुरुषाच्या आगमनाचा शुभसंदेश सांगणारे ते अग्रदूतच होत. त्याच्या मार्गांतील कांटेकुटे शक्य तोंवर साफ करून त्याच्या स्वागताची तयारी ते करून ठेवतात. आणि अखेर तो प्रकट झाला म्हणजे त्याच्या ध्वजाखालीं येतात.

येथवर अवताराची कल्पना, त्याचें उद्दिष्ट, त्याचा संभव, त्याचा क्रांतिवाद, अवताराच्या जन्मकालची परिस्थिति, आणि क्रांतीच्या उदयाचीं पूर्वचिन्हें यांचें विवेचन झालें. यावरून असें दिसून येईल कीं, असा महापुरुष जन्मास येणें ही निसर्गाच्या व्यवस्थेंतील व ईश्वरी योजनेंतील एक अवश्यक गोष्ट आहे. अवताराचें स्वरूप लोकांना कळावें आणि त्याचें कार्य सुकर व्हावें अशी घटना आपोआपच होत असते. तथापि इतकी अनुकूलता असूनहि अवतारी पुरुषाला अनायासें सिद्धि प्राप्त होत नाहींच. कारण मनुष्यरूप धारण केल्यानंतर परमेश्वरालाहि मनुष्याप्रमाणें आणि मनुष्यांना मार्गदर्शक होईल असें वागावें लागतें. श्रीकृष्णानें म्हटल्याप्रमाणें अवतारी पुरुषाचा मार्गच सर्व मनुष्यें अनुसारतात.* म्हणूनच साधन व तपश्चर्या यांच्या योगानें अवतारी पुरुष

* "मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः।" —भ. गीता

आत्मिक श्रेष्ठता मिळवितो आणि आत्मविकासाचा धडा घालून देतो.

अशा तऱ्हेचे अवतारी पुरुष युगायुगाचे ठिकाणीं निर्माण झाले आहेत. मानवतेच्या विकासाला त्यांचें साह्य किती झालें आहे याचें वर्णन कोठवर करावें ? रवीन्द्रनाथ म्हणतात—" त्यांनीं धर्माला आसुरी वृत्तीच्या ताब्यांतून काढून अखिल मानवतेच्या अंतरंगांत आणिलें, अशाकरितां कीं कांहीं ठराविक व्यक्तींचेंच नव्हे तर सर्व मानवांचें कल्याण व्हावें. त्यांना थोड्याशा आत्म्यांना आध्यात्मिक आनंद द्यावयाचा नव्हता; तर सर्व मानववंशाचा आत्मिक उद्धार करावयाचा होता. परमपुरुषाचा संदेश घेऊन ते अवतीर्ण झाले आणि सर्व देशांना त्यांनीं उपदेशिलें कीं, जो शाश्वत व दैवी परमपुरुष आहे त्याच्याशीं एकतान होणें हेंच मुक्तीचें रहस्य आहे. "*

असे जे ' स्फूर्तिकिरणांचे दिनकर, ' अवतारी पुरुष त्यांचीं चरित्रें हा चालता बोलता धर्मच होय. जेव्हां लिखित धर्म एखाद्या गोष्टीचा निर्णय देण्यास पंगु पडतो, प्राप्त परिस्थितींत कर्माकर्माचा निर्णय करणें अशक्य होऊन जातें, आणि बुद्धीची ओढ एकीकडे आणि विवेकाची दुसरीकडे असें द्वंद्व माजतें तेव्हां अवतारी पुरुष जो निवाडा देईल तो अखेरचा ठरतो. कारण त्याचे उद्गार म्हणजे परमेश्वराचेच आदेश होत.

---

* " They rescued religion from the magic stronghold of demon force and brought it into the inner heart of humanity, into a fulfilment not confined to some exclusive good fortune of the individual but to the welfare of all men. This was not for the spiritual ecstacy of lonely souls, but for the spiritual emancipation of all races. They came as the messengers of Man to men of all countries and spoke of the salvation that could only be reached by the perfecting of our relationship with Man the Eternal, Man the Divine. "–Rabindranath Tagore.

श्री ज्ञानेश्वरांच्या प्रासादिक वाणीनें अशा महानुभावांचें वर्णन द्यावयाचें म्हणजे—

“जयाचिया आस्थेचिया सद्भावा ।
आंतु धर्म करी राणीवा ।
जयांचें मनीं ओलावा ।
विवेकाचा ॥
जे ज्ञानगंगे नाहले ।
पूर्णता जेऊनि धाले ।
जे शांतीसि आले ।
पालव नवे ॥
जे परिणामा निघाले कोंभ ।
जे धैर्यमंडपाचे स्तंभ ।
जे आनंदसमुद्रीं कुंभ ।
चुबकळोनि भरले ॥
जयां भक्तीची येतुली प्राप्ति ।
जे कैवल्यातें परौतें सर म्हणती ।
जयांचिये लीलेमाजीं नीति ।
जियाली असे ॥”

# ३. पूर्णावतार.

सागराच्या अफाट विस्ताराकडे पाहून दररोज नव्या नव्या कल्पना मनांत उद्भवतात अशा अर्थाचे उद्गार एका वाग्भटानें काढले आहेत. भगवान् श्रीकृष्णाच्या चरित्रासंबंधीं हेंच म्हणतां येईल. खरोखर असा अनन्यसाधारण पुरुष हिंदुस्तानांतच काय पण अखिल जगाच्या इतिहासांत दुसरा झालाच नाहीं. हिंदी संस्कृतीचें असें एकहि अंग नाहीं कीं ज्यावर श्रीकृष्णाच्या अवतारकार्याचा वा उपदेशाचा ठसा उमटलेला नाहीं. राजाच्या प्रासादापासून गरिबाच्या झोपडीपर्यंत सर्वत्र श्रीकृष्णाचें पूजन चालू आहे. शूरांना तो शौर्याचा आदर्श वाटतो, प्रणयिजनांचा तर तो आधिदेव आहे, तत्त्ववेत्ते त्याच्या अलौकिक उपदेशाचें चिंतन करीत असतात, त्याच्या बाललीला हा प्रेमळ मातांच्या कौतुकाचा विषय होऊन राहिला आहे तर राजकारणांतील त्याचें चातुर्य राजनीति-

शास्त्रज्ञांना गुंग करून सोडीत आहे. अध्यात्मविद्येंतील या योगेश्वराच्या वचनांवर भाष्यें रचलीं जात आहेत, तर संगीतनृत्यादि संस्कृतीचीं ललित अंगें देखील कृष्णभक्तीचाच आविष्कार करीत आहेत. सारांश, बुद्धीच्या आणि भावनांच्या सर्व प्रांतांवर त्याचें प्रभुत्व असून आपल्या व्यक्तिमत्तेच्या लखलखाटानें सर्व हिंदी जग त्यानें दिपवून सोडलें आहे आणि म्हणूनच श्रीकृष्णाला पूर्णावतार म्हणावयाचें. विकासवादाच्या दृष्टीनें पाहतां देखील मत्स्यकूर्मादि अवतारांची परिणति होत होत हें सर्वांगीण रूप परमेश्वरानें धारण केलें ही विचारसरणी युक्त दिसते. 'मानवता हा एक विराट पुरुष आहे' असें मॅझिनी म्हणतो. तेव्हां पूर्णावतारांत मानवतेच्या सर्व अंगांचा समावेश झाला पाहिजे. श्रीकृष्णाच्या अष्टपैलु चारित्र्यांत हा सर्वांगीण विकास स्पष्ट दिसतो.

प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, श्रीकृष्ण ही एकमार्गी व्यक्ति ( simple personality ) नाहीं. त्याचें चरित इतक्या विविध तंतूनीं खुबीदार विणलें गेलें आहे कीं त्याची उकल वरवर पाहणाराला साधणार नाहीं. प्रत्येक कर्तव्याचे वेळीं कर्माकर्माचा सूक्ष्म विचार श्रीकृष्ण करीत असल्यानें त्याच्या चरित्रांत कित्येकदां विसंगति दिसते. बाह्यतः असमर्थनीय वाटणारा भाग कांहींसा आढळतो, तर कित्येक प्रसंग उचित वाटत असूनहि त्यांचें स्पष्टीकरण सांपडत नाहीं. दे. भ. काकासाहेब कालेलकर यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "व्याकरणकार एकाद्या नियमाच्या सर्व अपवादांची यादी देतो तद्वत् श्रीकृष्णाचें चरित्र म्हणजे लोकविलक्षण गोष्टींची एक नोंदच आहे."* म्हणूनच त्याच्या चरिताचें रहस्य काढणें कठिण होऊन बसतें.

श्रीकृष्णासंबंधीं प्रथम कोणती जर गोष्ट मनांत भरत असेल तर ती ही कीं तो जन्मसिद्ध लोकाग्रणी ( Leader ) होता. लोकनायक होण्यास बुद्धिमत्ता, कल्पकता, धैर्य, ध्येयवादित्त्व, सामर्थ्य इ० जे गुण अंगीं

* जीवनसाहित्य.

असावे लागतात ते तर त्याच्या अंगीं निसर्गतः अगदीं पुरेपुर होतेच. पण त्यांहूनहि त्याचा मोठा गुण म्हणजे बहुजनसमाजाविषयींची त्याची अनन्यसाधारण कळकळ. थोर कुळांत जन्म घेऊनहि बालपणापासूनच तो गोपगणांत वाढल्यानें बहुजनसमाजाच्या जीवनाशीं व आकांक्षांशीं त्याला समरस होतां आलें. जन्मजात उच्चतेचीं आभरणें झुगारून देऊन सामान्य जनतेंत तो मिसळून गेला. आजच्या एका थोर पुरुषाच्या उक्तींत थोडा फेरफार करून म्हणावयाचें झाल्यास ' तो जन्मानें उच्चकुलीन असला तरी स्वेच्छेनें सामान्यजन होता. ' ( He was an aristrocrat by birth but a commoner by choice ) सामान्यांशीं आपुलकीनें वागून त्यांच्या ठिकाणीं स्वतःबद्दल गाढ विश्वास उत्पन्न केला कीं, कर्तृत्वशाली माणसाचे कंठांत नायकत्वाची माला साहजिकच पडते. श्रीकृष्ण लोकनायक झाला तो याच न्यायानें.

हें त्याच्या यशाचें रहस्य लक्षांत घेतलें म्हणजे त्याला राष्ट्रनिर्माता ( Nation-builder ) कां म्हणतात तें स्पष्टपणें उमगेल.* कंस, शिशुपाल इ० क्रूर आणि अन्यायी सत्ताधाऱ्यांच्या बेबंद वर्तनानें सारा देश खिळखिळा होऊन गेला होता, कुमारिकांची अब्रू सुरक्षित नव्हती, शांततावादी नागरिकांच्या हक्कांची हवी तशी पायमल्ली चालली होती, उन्मत्त प्रबळांच्या नुसत्या नेत्रकटाक्षांवर न्यायदेवतेची हालचाल होत असे. ही गैरव्यवस्था मोडण्याकरितां श्रीकृष्णानें जुलमी सत्ताधीशांच्या विरुद्ध बंड पुकारलें. स्वातंत्र्यप्रिय व कर्तव्यनिष्ठ गोपांचें पुढारीपण स्वीकारून कंस, शिशुपाल, जरासंध इ० सत्ताधारी दुरात्म्यांचा नायनाट केला आणि लायक लोकांच्या हातीं राष्ट्राचीं सूत्रें दिलीं. गरीब नागरिकांचें जीवित स्थिर व उन्नत करण्यास त्यांना वाव दिला आणि स्त्रियांच्या शीलावर होत असलेल्या हल्ल्यांचा प्रतिकार केला. आणि या स्वतंत्र कर्तृत्वाइतकीच भरीव कामगिरी पांडवांसारख्या सच्छील व शूर माणसांना

* **Shri-Krishna** by B. C. Pal.

सदैव साह्य करून त्यानें करून दाखविली. शौर्य, संघटनाचातुर्य, शील व बुद्धिमत्ता अशा चार अंगांनीं तो सारखाच प्रकर्ष पावल्यामुळें राजसूय-यज्ञाचे वेळीं श्रीकृष्णाची अग्रपूजा करण्याचा प्रश्न निघाला, तेव्हां तेथील मान्यवंत ब्रह्मर्षींनीं व राजर्षींनीं त्याला मोठ्या आनंदानें आपली संमति दिली. तत्कालीन थोर माणसांत श्रीकृष्णाविषयीं केवढा गाढ आदर होता हें यावरून दिसून येईल.

विश्वरूपदर्शनानें भयचकित झालेल्या अर्जुनानें जेव्हां श्रीकृष्णाला विचारलें कीं, "देवा, हें सर्व जग व्यथित झालेलें आहे. सर्वत्र आपल्या विनाशिनीची लीला चाललेली आहे. तेव्हां असे आपण कोण आहां?" तेव्हां त्या विश्वरूपधारी श्रीकृष्णानें उत्तर दिलें कीं, "मी लोकांचा क्षय करण्याला प्रवृत्त झालेला काळ असून त्यांचा संहार करण्याकरितां अवतरलों आहें." * या उत्तरांत श्रीकृष्णाच्या अवतारकृत्यांची एक बाजू स्पष्ट दिसेल. संहारणीशिवाय उभारणीच होऊं शकत नाहीं. प्रचंड उत्पत्ति आणि प्रचंड नाश यांतूनच जगाचा विकास होत आला आहे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे परमेश्वराच्या ब्रह्मा व विष्णु या विधायक विभूतीं-बरोबरच रुद्रासारखी संहारक विभूतिहि प्राचीन तत्त्ववेत्त्यांनीं कल्पिली हें युक्तच दिसतें. शुद्धीकरणाची नैसर्गिक प्रवृत्ति ( cleansing impulse ) मानवी शरीराप्रमाणेंच राष्ट्रदेहांतहि असते. म्हणूनच कांहीं शतकें लोटलीं कीं एकादा अद्वितीय वीर उत्पन्न होऊन तो झंझावाताप्रमाणें प्रळय मांडतो आणि तो प्रळय कांहीं काळ उद्विग्नकारक वाटला तरी त्यांतूनच नवीन तत्त्वांची निर्मित होते. नेपोलियन् आणि कैसर विल्यम् यांच्या-सारख्या राक्षसी माणसांनीं एका दृष्टीनें हेंच परमेश्वरी कार्य केलें असें म्हणतां येईल. कारण नेपोलियनच्या वावटळींतून राष्ट्रीयत्व जन्माला आलें तर कैसरनें उडविलेला महायुद्धाचा धुराळा खालीं बसूं लागल्या-

* कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो ।
लोकान्समाहर्तुमिह प्रवृत्तः ॥—भ. गीता

नंतर अंतर्राष्ट्रीयत्वाच्या उदात्त भावनेचा विचार करण्याकडे जगाची प्रवृत्ति होऊं लागली. प्रबळ दुरात्म्यांनीं ही सृष्टि भारावली असतांना श्रीकृष्णाचा अवतार झाला आणि स्वतःच्या बाहुबळानें व दुसऱ्यांना अप्रत्यक्ष साह्य करून त्यानें त्या दुरात्म्यांची कत्तल केली व भूभार हलका केला. साधूंचें परित्राण हें जसें त्याचें विधायक कार्य तसेंच दुष्कृताचा विनाश हें त्याचें विध्वंसक कार्य होय. दोनही कार्यांची राष्ट्रोद्धाराला सारखीच अवश्यकता होती. हीं दोनहि कार्यें श्रीकृष्णानें कौशल्यानें पार पडलीं म्हणून त्याचें माहात्म्य एवढें थोर.

तथापि दुर्जनांचा संहार करण्याचे कामीं त्यानें जें रूद्ररूप धारण केलें होतें तें सोडलें म्हणजे त्याचें इतर जीवन प्रेमरसानें ओथंबलेलें आहे. सखा, वल्लभ आणि त्राता या तीनहि भूमिकांत त्याचें अथांग प्रेम दिसून येतें. अजाण गोपाल, कंगाल सुदामा, दरिद्री पण ज्ञानी विदुर, प्रेमसखा अर्जुन, साध्वी द्रौपदी इ० आपल्या अनेक निःसीम भक्तांसाठीं तो किती तत्परतेनें झटत असे तें पाहण्यासारखें आहे. तो ‘ भावार्थाचा भुकेला ’ होता. ‘ मी अनन्य भक्तीनेंच वश होणारा आहें ’ * हें आपल्या प्रसन्नतेचें रहस्य त्यानें अर्जुनाला सांगितलें आहे.

गोपींचा प्रेमविलास हा श्रीकृष्णाच्या भक्तियोगाचा गाभा होय. कृष्णगोपीसंबंधाचा विपर्यास पुष्कळ वेळां करण्यांत येतो. पण तें अज्ञान आहे. रूपकाचें कवच फोडून आंतल्या सत्तत्त्वाकडे पाहण्याची दृष्टि नसल्यानें अशी चूक होते. वास्तविक भक्तितत्त्वाचा खरा उत्कर्ष पाहावयाचा असेल तर तो कृष्णगोपींच्या प्रेमांतच दिसेल. स्वामी विवेकानंद या श्रीकृष्णचरित्रांतील भागासंबंधानें लिहितांना म्हणतात, “ श्रीकृष्णचरित्राचा काय अद्‌भुतरम्य भाग आहे हा ! आणि जितका अद्‌भुतरम्य तितकाच कळण्यास कठिण. पूर्णपणें शुद्ध आणि पवित्र झाल्यावांचून

---

* भक्त्या त्वनन्यया शक्यमहमेवंविधोऽर्जुन ।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥—गीता.

कोणीहि तो समजावून घेण्याचा प्रयत्न करूं नये. प्रेमामृतानें धुंद झाल्या-वांचून वृंदावनांतील ती रूपकात्मक सुंदर लीला उमगणार नाहीं ” * मानवी बुद्धि ही कोणी स्त्री असून तिचा हृदयनाथ म्हणजेच परमेश्वर असें मोहक रूपक बहुतेक धर्मांतील प्रतिभाशाली कवींनीं उपयोजिलें आहे. ‘ तुझा परमेश्वर म्हणजेच तुझा पति होय ’ ( Thy maker is thy husband ) हें हिब्रू उपदेशकांनीं म्हटलें तें याच अर्थानें. प्राचीन यहुदी कन्यकांचीं गीतें, सुफी कवींचीं कवनें किंवा महाराष्ट्र संतकवींच्या विराण्या अशा अनन्यमधुर गीतांतून हा प्रेमसंबंध फार बहारीचा वर्णिलेला आढळतो. कृष्णगोपींचें प्रेम म्हणजेच जीवशिवांतील उत्कट, मधुर, अहेतुक व अनन्य स्नेह होय. या स्नेहाचा प्रकर्ष श्रीकृष्णाच्या अवतारांत जितका उत्कटतेनें झाला आहे तितका प्रायः कोठेंच आढळून येत नाहीं.

येथवर लोकनायक, राष्ट्रनिर्माता, संहारक, आणि प्रेमयोगी या श्रीकृष्णाच्या निरनिराळ्या भूमिकांचें दर्शन झालें. तथापि त्याचें खरें अवतारकार्य म्हणजे तत्त्वनिरूपण. कुरुक्षेत्रांतील महायुद्धाचे आरंभीं स्वजनांचा विनाश होणार हें पाहून श्रमी व निरुत्साही झालेल्या अर्जुनाला त्यानें जें गीतातत्त्व सांगितलें तें भारताच्याच नव्हे, जगाच्या तत्त्वज्ञानात्मक वाङ्मयांत केवळ अलौकिक असें आहे. महंमदाचें वीरत्व, बुद्धाची अहिंसा, येशूचा भक्तियोग आणि झरतुष्ट्राचा सत्यशोध यांचा मधुर संगम म्हणजे श्रीकृष्णाचें तत्त्वज्ञान होय. प्रवृत्ति आणि निवृत्ति यांची उत्कृष्ट सांगड घालून त्यानें आपलें तत्त्वज्ञान सदा टवटवीत राहील असें

---

* “ Ah, that most marvellous passage in his life, the most diffciult to understand and which none ought to attempt to understand until he has become perfectly chaste and pure, that most marvellous expansion of love, allegorised and expressed in that beautiful play of Brindavan, which none can understand but he that has become mad and drunk deep of the cup of love. ”— Swami Vivekanand.

लवचिक व जिवंत बनविलें आहे. श्रीकृष्णाची अहिंसा म्हणजे ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें ' **जगाचिया सुखोद्देशें राहटणें**; ' त्याचा संन्यासयोग म्हणजे फलाची आसक्ति न धरतां साधलेला कर्मयोग. अवघ्या भूतीं आत्मौपम्य दृष्टीनें पाहणें हा श्रेष्ठ पुरुषाचा स्वभावधर्मच होय असें त्यानें प्रतिपादिलें आहे. पण वर्णाश्रमधर्माप्रमाणें विहित असलेलीं कर्में करणें हेंच हितावह आहे असाहि त्याचा आग्रह आहे. युद्धासाठीं अर्जुनाला प्रवृत्त करण्याकरितां तर त्यानें आपला सर्व उपदेश केला. तथापि त्याग, अपरिग्रह, अरति यांचीहि महती त्यानें तितक्याच उत्कटतेनें गाइली आहे. सारांश, धर्माधर्माचा अत्यंत सूक्ष्म विवेक करून त्यानें मानवतेला कर्तव्याचा शाश्वत मार्ग आखून दिला आहे. " सुख असो वा दुःख असो, मनुष्यजन्म प्राप्त झाला हेंच महद्भाग्य समजून कर्मसृष्टीच्या या अपरिहार्य व्यवहारांत जें जें प्राप्त होईल तें तें अंतःकरणाचा हिरमोड होऊं न देतां ' दुःखेष्वनुद्विग्नमना सुखेषु विगतस्पृहः ' ( गीता २–५६ ) या न्यायानें म्हणजे साम्य बुद्धीनें सहन करणें आणि जगाच्या धारणपोषणार्थ आपल्या अधिकाराप्रमाणें कर्माचा जो भाग शास्त्रतः आपल्या वांट्यास आला आहे, तो अमक्या तमक्यासाठीं नव्हे तर निष्कामबुद्धीनें करीत राहणें हेंच मनुष्याचें कर्तव्य होय."* श्रीकृष्णाच्या उपदेशाचें हें सूत्रमय रहस्य म्हणून सांगतां येईल.

अशा रीतीनें श्रीकृष्णाच्या अवतारकार्याचें स्वरूप आहे. त्याच्या इतर अनेक महत्त्वाच्या बाजू आहेत. प्रख्यात बंगाली उपन्यासकार बंकीमचंद्र चटर्जी यांनीं वर्णिल्याप्रमाणें श्रीकृष्ण हा ' अपराजेय, अपराजित, विशुद्ध, पुण्यमय, प्रीतिमय, दयामय, कर्तव्याचे ठिकाणीं अपराङ्मुख, धर्मात्मा, वेदज्ञ, नीतिज्ञ, लोकहितैषी, न्यायनिष्ठ, क्षमाशील, निरपेक्ष, शास्ता, निर्मम, निरहंकार, योगयुक्त, तपस्वी ' होता. यांतील प्रत्येक विशेषण सार्थ व समुचित आहे. बंकीमबाबू कृष्णचारित्रावरील

---

* गीतारहस्य.

आपल्या रमणीय ग्रंथाचा समारोप करतांना म्हणतात, " कृष्ण मानवी व्यक्ति होती असेंहि कोणीं मानलें तरी त्याला अखेर रीस डेव्हिड्स यांनीं बुद्धाबद्दल जें म्हटलें आहे तेंच कृष्णासंबंधींहि म्हणावें लागेल कीं, ' तो बुद्धिमानांतील अग्रणी व सर्वश्रेष्ठ हिंदु होता. ' " *

* तिनि मीमांसा करिबेन जे, कृष्ण मनुष्यमात्र छिलेन, तिनि अन्ततः Rhys Davids शाक्यसिंह संबंधे जाहा बलियाछेन, कृष्णके ताहाई बलिबेन " The Wisest and Greatest of the Hindus " –बंकिमचंद्र

# ४. दोन धार्मिक समाजसत्तावादी.

## बुद्ध आणि येशू.

ऐहिक व्यापाच्या अंधकारांतून चाचपडत चाललेल्या जगाला मार्ग-दर्शक होणाऱ्या तारकांत बुद्ध आणि येशू हे गुरुशुक्रासारखे आहेत. दोघांच्या तत्त्वगीतांचे सूर जवळ जवळ एकसारखे आणि दोघांचेंहि गायन विरक्ति आणि भूतदया या षड्जपंचमाच्या साथीवर चाललेलें. या साधर्म्यामुळेंच कीं काय पौर्वात्य देशांत येशूविषयीं व्यक्तिशः जसा आदर दिसून येतो तसाच किंबहुना त्याहूनहि अधिक आदर बुद्धा-विषयीं पाश्चात्य मुमुक्षू दाखवितात. एकोणिसाव्या शतकांतील बंगाली आद्य धर्मसुधारकांना येशूच्या उज्ज्वल चारित्र्यानें विलक्षण मोहिनी घातली होती ! आणि सध्यांहि येशूच्या जीवनाकडे आदरानें पाहणारा वर्ग आपलेकडे लहानसहान नाहीं. यूरोपांतील बुद्धपूजेविषयीं हेंच सांगतां

येईल. प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ता शौपनहूर हा पराकाष्ठेचा दुःखवादी. साहाजिकच बुद्धाच्या तत्त्वज्ञानानें तो मोहित झाला. भूतदया वगैरे उच्च तत्त्वांची बेसुमार रेवडी उडविणारा सामर्थ्योपासक जर्मन तत्त्वज्ञ नित्शे हा देखील ख्रिस्तीधर्माच्या तुलनेनें बुद्धाची शिकवण पुष्कळ बरी असें म्हणतो. बुद्धाचें चरित्र व तत्त्वज्ञान यांचा भाविकपणें अभ्यास करणारीं ऱ्हीस–डेव्हिड्स्, एडविन् अर्नोल्ड यांसारखीं कितीतरी अधिकारी माणसें तिकडे आहेत. इतकेंच काय पण मि. एच्. जी. वेल्ससारखे शास्त्रीय वृत्तीचे विचारवंत लेखक देखील 'जगांतील अत्यंत कुशाग्र बुद्धीचा पुरुष'* असा बुद्धाचा गौरवपूर्ण उल्लेख करतात.

बुद्ध आणि येशू यांच्या अवतारकार्यांतील व उपदेशांतील साधर्म्य व भिन्नता पाहण्यापूर्वीं एक गोष्ट प्रथम समजून घेतली पाहिजे. ती ही कीं, विरक्तीचा उपदेश दोघांनींहि केला असला तरी दोघांच्या वृत्तींत मूलतः एक महत्त्वाचा भेद आहे. जीवनकलहाचें भयंकर स्वरूप पाहून बुद्धाला ऐहिक वैभवाची शिसारी बसली आणि महासागराच्या मध्यावर संचारणाऱ्या खलाशाला जसें पाणीच पाणी दिसावें तद्वत् बुद्धाला अपरंपार दुःखच जगांत भरलेलें दिसूं लागलें. यांतून मोक्ष मिळविण्याकरितां विरक्तीचा आणि कर्तव्याचा एकच एक ध्यास घेतला पाहिजे असें त्यानें सांगितलें. येशूचा दृष्टिकोन मात्र बराच भिन्न. विषमता आणि आसुरी संपत्ति यांनीं रखरखलेल्या जगांत शांति नांदावी म्हणून प्रेमामृताचें सिंचन करणें हा मार्ग येशूनें उपदेशिला. बुद्धाच्या उपदेशांत कर्तव्य तत्परतेचें, व दमनाचें कठोरपण आहे. तर येशूचा उपदेश प्रेमाच्या ओलाव्यानें स्निग्ध झालेला आहे. थिऑसफीच्या दृष्टीनें बुद्ध आणि येशू यांच्या जीवनावर लिहितांना डॉ॰ ॲनी बेझंट यांनीं या दोघांच्या वृत्तींतील फरक फार सुंदर रीतीनें विशद केला आहे. डॉ॰ बेझंट म्हण-

* "... One of the most penetrating intelligences the world has ever known."—H. G. Wells

तात–" तो महापुरुष नंतर एकच वेळ एका श्रेष्ठधर्माची संस्थापना करण्याकरितां जगावर बुद्धरूपानें अवतरला. पुढें त्यानें कधींहि मानवरूप धारण केलें नाहीं. जगदुद्धाराची धुरा त्यानें आपल्या बंधूवर सोपविली. हा नवीन उद्धारक म्हणजेच मैत्रेय मुनि होय. आपल्या जेष्ठबंधूसमवेत मैत्रेय अनेकदां जगांत अवतरला होता. त्यालाच येशू असें संबोधतात. बुद्ध आणि येशू यांच्या विचारांत आणि उपदेशांत साम्य असलें तरी त्यांच्या वृत्तींत फरक असल्यानें प्रत्येकाच्या उपदेशावर सुंदर पण निराळीच छटा चढली आहे. बुद्धाला 'बुद्धीचा ईश्वर' म्हटलें तर येशूला 'प्रेमाचा ईश्वर' म्हणतां येईल. एकानें तत्त्वप्रतिपादन केलें आणि मनुष्यांना सम्यक् ज्ञानाची व सम्यक् विचारांची दीक्षा दिली, तर दुसऱ्याला प्रेम हेंच सर्व तत्त्वांची परिणति आहे असें वाटलें, आणि प्रेमांतच त्याला परमेश्वरदर्शन झालें. "*

अशा रीतीनें बुद्धि आणि प्रीति या दोन वेगवेगळ्या प्रेरक शक्तींतून ह्या दोघांचें तत्त्वज्ञान निर्माण झालें असल्यानें प्रत्येकाची ठेवण थोडी वेगळ्या थाटाची असावी हें साहजिकच आहे. बुद्धाच्या शिकवणींत चातुर्य दिसतें. येशूच्या उपदेशांत काव्य प्रतीत होतें.

—आणि येशूच्या उद्गारांत प्रीतीचा फुलोरा दिसण्याचें कारण म्हणजे त्याची निःसीम परमेश्वरभक्ति होय. तरफेच्या सतारीप्रमाणें भूतदया आणि ईशप्रेम या दोन प्रकारच्या तारांवर निनादत असलेलें त्याचें गीत अत्यंत मधुर वाटतें. उलट बुद्ध ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं मुग्ध आहे. जगांतील दुःखाचें निदान करून पूर्वजन्म आणि संचित हे सिद्धांत त्यानें ग्राह्य धरले आहेत. पुढें असलेल्या कूट प्रश्नाचा एकादा गणिती जसा शांत डोक्यानें व निव्वळ बुद्धीनें विचार करतो, तद्वत् बुद्धाची पद्धति दिसते. यामुळेंच त्याला 'बुद्धीचा ईश्वर' (God of Wisdom)

---

* The Immediate Future.

हें नांव यथार्थतेनें शोभतें. येशू पुनर्जन्म मानीत नाहीं. पण देवावर त्याची असीम निष्ठा आहे. ‘ चालो वाटे आम्ही, तुझाचि आधार, चालविसी भार, सवें माझा ’ अशा निष्ठेनें इहलोकीं सत्कृत्यें करावींत म्हणजे देवाचे राज्यांत प्रवेश मिळेल असा त्याचा उपदेश आहे.

एवढा मूलभेद ध्यानांत ठेवून या दोघांच्या चरित्रांकडे पाहिलें म्हणजे त्यांच्यांत अंशतः दिसणाऱ्या भिन्नपणाचें स्पष्टीकरण मिळतें आणि त्यांच्यांतील साधर्म्य अधिक उत्कटतेनें प्रतीत होतें.

बुद्ध आणि येशू हे दोघेहि धर्मसुधारक होते. बुद्धाला माराशीं झगडावें लागलें तसें येशूला सैतानाशीं सामना देणें भाग पडलें. रूढ धर्माच्या दासांनीं दोघांचाहि छळ केला.

बुद्धाचा काळ संपन्नतेचा होता. त्या काळीं ध्येयवाद पुष्कळच मंदावला होता. ऐहिक संपत्तीचा धूर भाग्यवंतांच्या डोळ्यांवर चढला असून गरिबांना ते तुच्छ लेखीत. जन्मसिद्ध वर्णावर श्रेष्ठाश्रेष्ठता ठरविली जात असल्यामुळें हीन वर्णाचा बहुजनसमाज असंतुष्ट असे. अध्यात्मविद्येची वतनदारी ठराविक वर्गाकडे असल्यानें, परमेश्वराच्या राज्यांत आपणांला कांहींच का स्थान नाहीं असा विषाद इतरांना वाटे. वैदिक धर्माच्या उज्ज्वल तत्त्वांवर विकृत रूढींचा गंज चढला होता. यज्ञयागादि विधींतील श्रेष्ठ तत्त्वांची ओळख बुजली जाऊन निव्वळ तंत्र हेंच लोकांना सर्वस्व वाटत होतें.

अशा काळीं बुद्धानें आपल्या अलौकिक प्रतिभाबलानें सर्व समाजसागराचें मंथन केलें. आपल्या उपदेशांत यज्ञविधींचा निषेध करून बहुजनसमाजाला रुचेल व पचेल अशा शब्दांत आपलें ज्ञान त्यानें सांगितलें. पांडित्याचें अवडंबर त्यानें मुळींच माजवलें नाहीं. अतींद्रिय व अद्भुत गोष्टींवर श्रद्धा ठेवल्यावांचून जीं वैदिक तत्त्वें लोकांना समजणेंच अशक्य तीं मुळींच टाळून बुद्धानें तर्कवादाला पटेल व सयुक्तिक वाटेल असेंच नवें तत्त्वज्ञान प्रसृत केलें. जन्मसिद्ध उच्चनीचतेस थारा न देतां

समाजांतील सर्व थरांच्या लोकांना आपला उपदेश सुलभ केला; आणि सर्वांहून श्रेष्ठ गोष्ट म्हणजे विरक्तीची दीक्षा जगाला देऊन ऐहिकाच्या लोभांत घोटाळणाऱ्या लोकांना उच्च जीवनाच्या वातावरणांत शिरण्याचा मार्ग दाखविला.

येशूचें अवतारकार्य याच धर्तीचें. सर्व यहुदी लोकांवर ऐहिक वैभवाचा पगडा बसला होता. परमेश्वरानें आपला पूर्वज जो अब्राहम त्याला हें पृथ्वीचें राज्य बहाल केलें आहे आणि त्याचा आपण यथेच्छ उपभोग घ्यावा अशी यहुद्यांची समजूत होती. भिक्षुकांनीं राजसत्तेशीं सहकार्य करून गरीब रयतेवर दण्डेली चालविली होती. परंपरागत अंधश्रद्धेच्या आहारीं जाऊन लोकहि हा जुलूम मुकाट सोशीत. सर्वच समाज हिणकस झाला होता तरी त्यांच्यांत सत्ताधाऱ्यांनीं दुर्बलांना हीन गणावें आणि वैभवशाली लोकांनीं गरिबांना तुच्छ लेखावें असें चाले. अशा दुःस्थितींत समतेच्या तत्त्वांची ओळख करून देऊन ‘ देवाच्या राज्याचा ’ ( Divine Kingdom ) संदेश द्यावयाचें महत्कार्य येशूनें केलें.

यावरून स्पष्ट दिसून येईल कीं, बुद्ध व येशू यांच्यापुढें परिस्थिति होती ती जवळ जवळ एकाच स्वरूपाची. त्यांच्या उपदेशवचनांत विलक्षण सादृश्य आढळतें तें त्यामुळेंच.

ऐहिक वैभवाच्या अनिवार लालसेला आळा घालण्याकरितां दोघांनाहि जोराची प्रतिक्रिया करावी लागली. म्हणूनच अपरिग्रह, त्याग, विरक्ति यांवर त्यांना सर्व भर द्यावा लागला. दोघांनींहि संपत्तीचा तिटकारा शक्य तितक्या कडक भाषेंत व्यक्त केला आहे.

बुद्ध म्हणतो—“ संपत्ति मिळविण्याचा एक मार्ग आहे आणि निर्वाण मिळविण्याचा अन्य मार्ग आहे हें ज्या बुद्धशिष्यास समजेल तो लौकिकाची वांछा करणार नाहीं आणि संसारापासून अलिप्त राहण्याचा यत्न करील. ” *

---

* धम्मपद

आतां येशूचे उद्गार पहा–" पृथ्वीवर धनाचा संचय करूं नका. कारण टोळ आणि गंज यांयोगें त्याचा नाश होईल. चोर तें लुटून नेईल. म्हणून स्वर्गांत धन सांठवा. "[१]

संपत्ति हा मोक्षमार्गांत केवढा अडथळा आहे याचें अतिरंजित चित्र रंगवून येशू म्हणतो–" सुईच्या नेढ्यांतून एकवेळ उंट जाऊं शकेल पण देवाच्या राज्यांतून श्रीमंत मनुष्य जाऊं शकणार नाहीं. "

बुद्ध आणि येशू यांना मुख्य झगडा करावयाचा होता तो देवाच्या राज्याचे वतनदार होऊन राहिलेल्या भिक्षुकांशीं. कारण हे लोक ढोंगी-पणानें श्रद्धाळू जनतेच्या विश्वासाचा फायदा घेत आणि स्वेच्छाचार करीत. हा ढोंगीपणा येशू व बुद्ध या दोघांनींहि लोकांना उघड करून दाखविला. पर्वतावरील विख्यात प्रवचनांत येशू सांगतो–

' ढोंगी धर्मोपदेशकांपासून सावध रहा. मेंढरांचीं कातडीं पांघरून तुम-च्यांत घुसूं पाहणारे ते लांडगे आहेत.'[२]

खऱ्या ब्राह्मणाची व्याख्या करतांना बुद्धानें असेच कडक शब्द उपयोजिले आहेत–" हे मूर्खा! जटाजूटांत काय अर्थ आहे? कृष्णा-जिनाचा काय उपयोग? अंतर्यामीं मलिन असून बाहेरून मात्र तूं आप-णास शुद्ध करतोस. जटाभाराच्या योगानें, कुळाच्या योगानें किंवा जन्म-संस्काराच्या योगानें मनुष्य ब्राह्मण होत नाहीं; तर जो सत्याचरणी व प्रामाणिक आहे तोच सुखी, तोच ब्राह्मण. "[३]

भिक्षुकशाहीशीं पत्करलेलें हें वैर दोघांहि महात्म्यांना जाचक झालें. बुद्धाला सतत पंचेचाळीस वर्षें नाना संकटें सोसावीं लागलीं, त्याच्या शीलावर शिंतोडे उडाले. येशूला तर आपल्या सत्यप्रतिपादनाकरितां भिक्षुकांच्या क्रोधाग्नींत प्राणाहुतिच द्यावी लागली.

---

१ St. Mathew ( The New Testament and Psalms )
२ St. Mathew ( The New Testament and Psalms )
३ धम्मपद

उच्चनीच वर्णभेदाविरुद्ध दोघांनींहि बंड पुकारलें होतें. बुद्धाला सत्य तत्त्वाचा साक्षात्कार झाल्यानंतर प्रथमच जो वैष्णव भेटला त्याच्या प्रश्नाला बुद्धानें दिलेलें उत्तर ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. उच्चनीच वर्णांचा विचार न करतां सर्वांना आपलें उपदेशामृत वाटण्याचा निर्धार बुद्धानें त्यांत जाहीर केला आहे. समाजांत हलके गणल्या गेलेल्या जकात-दार मत्तयाला घेऊन भोजन करण्यांत येशूनें तत्कालीन वर्णभेदावर मोठाच प्रहार केला आहे. दोघांनींहि आपल्या धर्माचें मंदिर सर्वांना खुलें ठेवलें. यावरून त्यांच्या सर्वसंग्राहक व उदार वृत्तीची कल्पना येते.

येशू व बुद्ध यांच्या जीवनांतील तपशीलांत याहूनहि पुष्कळ साम्य दाखवितां येण्यासारखें आहे. पण मुख्य मुख्य गोष्टी एवढ्याच. ऐहिक वैभवाचा निषेध, अनासक्ति, इंद्रियदमन, समता इ० तत्त्वांचा संदेश दोघांनींहि सारख्याच उत्कटतेनें उच्चारला, आणि आपल्या उज्ज्वल चारित्र्यानें तो पटवूनहि दिला. श्रेष्ठ धर्माची मिरास अल्पसंख्य उच्च वर्णांकडून काढून तो धर्म बहुजनसमाजाच्या मालकीचा केला हें या दोघां पुण्यात्म्यांचें फार मोठें अवतारकृत्य होय. म्हणून त्यांना ‘ धार्मिक समाजसत्तावादी ’ ही पदवी देणें उचित होईल. आजवर वर्धिष्णु राहि-लेले त्यांचे संप्रदाय हीच त्यांच्या कार्याच्या श्रेष्ठतेची साक्ष होय.

# ५. महंमदाचें अलौकिक जीवन

महंमदाचें अवतारकार्य समजावून घ्यावयाचें असेल तर तत्कालीन परिस्थिति व त्याचेपुढें असलेलीं दुस्तर संकटें यांची प्रथम ओळख करून घेतली पाहिजे. कारण इतर कोणत्याहि धर्मोपदेशकांपेक्षां महंमदाच्या भोवतालचें वातावरण फार बिकट होतें. इतर प्रेषितांना सुसंस्कृत समाजांत आपलें अवतारकार्य करण्याची संधि मिळाली. पण महंमदाचे वांट्यास रानटी अरबांचा मुलूख आला. त्यांच्या बिऱ्हाडाप्रमाणेंच त्यांचें मन अस्थिर असे. भोवतालच्या रुक्ष प्रदेशास अनुसरून त्यांची वृत्ति बनली होती. त्यांच्यांत भावनेचा ओलावा नव्हता असें नाहीं; पण लांब लांब सफरी केल्यावर जसें एकादें जलस्थान सांपडावें तसे त्यांच्या हृदयांत भावनांचे निर्झर अंतराअंतरावर वहात असावयाचे. वर अनंत आकाश आणि खालीं अफाट जमीन हें जसें सृष्टीचें एकजीनसी रूप

त्यांना पाहावयाला मिळे, तसेंच त्यांचें जीवन अगदीं ठरीव झालें होतें. दूरच्या सुसंस्कृत देशांतून जे अस्पष्ट, संदिग्ध असे धर्मकल्पनांचे पडसाद येत त्यांची कशीतरी जुळणी करून अरबांनीं आपला धर्म बनविला होता. सारांश, अशा रानटी, अडाणी, भटक्या लोकांवर प्रभुत्व मिळवून त्यांना धार्मिक जीवनाची गोडी लावण्याची अवघड जबाबदारी महंमदावर येऊन पडली होती.

महंमदानें या रानटी अरबांना उन्नत करण्याचें केवढें कार्य केलें याची कल्पना पुढील एका हकिकतीवरून येईल. एकदां त्याचे कांहीं अनुयायी भिक्षुकांच्या भीतीनें अबिसिनीयांत पळून गेले. भिक्षुकांनीं तेथल्या राजाला कळविलें कीं, या महंमदी शिष्यांना आमच्या स्वाधीन करावें. पण शिष्यांनीं त्या राजाला आपणास दूर करूं नका असें परोपरीनें विनविलें. महंमदानें तुम्हांला एवढें भारून कसें टाकिलें असा प्रश्न राजानें विचारला. तेव्हां त्यांचा मोहोरक्या जाफर म्हणाला, " हे राजा, आम्ही रानटी, अज्ञानी होतों. आम्ही दगडधोंड्यांना भजत असूं. शेजाऱ्यांचा छळ करण्यांत आणि आलेल्या अतिथींस हाकून लावण्यांत आम्हांला दिक्कत वाटत नसे. आमच्या चालीरीति माणुसकीला कमीपणा आणणाऱ्या होत्या. स्त्रिया व अज्ञानी मुलें यांचे हक्क आम्ही पायाखालीं तुडवीत होतों. अशा स्थितींत हजरत पैगंबर आला. त्यानें आम्हांला देव एक आहे आणि त्याचीच पूजा करा हें सांगितलें. स्त्रियांची योग्यता पटवून दिली. सत्य भाषण आणि सत्य आचरण यांचे धडे त्याजपासूनच आम्हीं घेतले. ज्यांनीं तुझ्याजवळ आमची मागणी केली आहे ते भिक्षुक महंमदाचे शत्रु होत. कृपा करून त्यांच्या हवालीं आम्हांला करूं नकोस." यावर राजानें महंमदाचीं कांहीं धर्मवचनें म्हणून दाखविण्यास जाफरला सांगितलें. तेव्हां जाफरनें कुराणांतील एक दोन सूक्ति म्हटल्या. त्यासरशी राजाचे डोळयांत अश्रु उभे राहिले. तेथेंच हजर असलेले खिस्ती धर्मोपदेशकहि सद्गदित झाले.

राजा प्रेमळ स्वरांत म्हणाला, "तुम्ही माझ्या आश्रयाला सुखानें रहा. मी तुम्हांला भिक्षुकांच्या हवालीं करणार नाहीं."

महंमदाचें अवतारकार्य समजण्यास हा प्रसंग अत्यंत उद्बोधक होईल. "दरिद्री मेंढपाळ लोक जगाच्या उत्पत्तीपासून अज्ञान स्थितींत हिंडत होते; एक वीर प्रेषित तेथें अवतरला, त्यानें दिलेल्या मंत्रावर त्यांची श्रद्धा बसली आणि पहा! ते अज्ञात लोक जगप्रसिद्ध झाले. त्या लहानशा जमातीनें जग व्यापून टाकलें."* हे कार्लाईलचे उद्गार महंमदाच्या कर्तृत्वाची साक्ष देतील. साधे साधे नीतिनियम तत्कालीन अरबांच्या मनावर ठसवून त्यांना नुसतें मनुष्यपदवीला आणणें हें देखील मोठें कठिण काम! मग पापपुण्याचा सूक्ष्म विवेक, एकेश्वरीवाद इ० गहन विषयांचें ज्ञान त्यांना करून देणें म्हणजे अशक्यप्रायच! पण महंमदाचें सामर्थ्य व प्रतिभा इतकी जाज्वल्य होती कीं, हा चमत्कार त्यानें यशस्वी रीतीनें करून दाखविला.

आतां महंमदाच्या उपदेशांत स्वर्गांतील सुखाचीं व नरकांतील दुःखाचीं भडक चित्रें आणि ऐहिक सुखदुःखाचीं स्थूल व ठळक वर्णनें कां रंगविलेलीं दिसतात याचा उलगडा होईल. लहान मुलांप्रमाणें प्राथमिक अवस्थेंतील माणसांना एकादी गोष्ट पटवून देणें झाल्यास स्थूल, दृश्य, झगझगीत अशीं वर्णनें द्यावीं लागतात. त्यांचे तामस व राजसगुण इतके प्रबळ असतात कीं, पापपुण्याचा विचारदेखील सात्त्विक वृत्तीनें त्यांना करतां येत नाहीं. म्हणून त्यांच्या राजस व तामस भावांना उत्तेजन देऊनच त्यांना सत्त्वगुणाची गुटिका पाजणें अवश्य असतें. हें जाणूनच महंमदानें आपली उपदेशपद्धति आखली होती.

---

*"A poor shepherd people, roaming unnoticed in its deserts since the creation of these worlds. A hero prophet was sent to them with a word they could believe; see, the unnoticed becomes world-notable, the small has grown world-great; ...... T.Carlyle

तलवारीसंबंधींहि तेंच. जेव्हां निव्वळ उपदेशानें दांभिकांचें व अ-धर्मीयांचें दमन होणें अशक्य होतें तेव्हां सद्धर्माचें स्थापन करण्याकरितां तलवार चालविणें हें एक कर्तव्यच होऊन बसतें. अशा वेळीं निव्वळ कर्माचें बाह्य स्वरूप न पाहतां त्याचा मूळ हेतु व उद्दिष्ट यांवरून त्याची श्रेष्ठाश्रेष्ठता ठरविली पाहिजे. महंमदानें तलवार चालविली ती धर्मप्रसाराकरितां. सर्व जग आपल्या सत्तेखालीं आणण्याची शिकंदरी महत्त्वाकांक्षा त्याला नव्हती. शिवाय धर्मप्रसाराकरितां युद्धमार्गाचा अवलंब एकट्या महंमदानेंच केला असें थोडेंच आहे! भगवान् श्रीकृष्णाला धर्मरक्षणाकरितां खड्ग चालवावें लागलें; झरतुष्ट्रालाहि अप्रत्यक्ष रीतीनें रणांगणावरच आपल्या धर्माची सत्यता पारखून घ्यावी लागली; आणि शांतिब्रह्म येशूनें जरी अहिंसेचें व्रत कायावाचामनें आचरिलें तरी पुढें त्याच्या अनुयायांना धर्मरक्षण व धर्मप्रसार यांसाठीं तलवार चालविणें भागच पडलें. अरबांसारख्या रानटी लोकांत धर्मोपदेश करावयाचा म्हणजे सत्ता पाहिजे; आणि ही सत्ता तलवारीखेरीज मिळणें अशक्य. अशा रीतीनें ब्रह्मकर्म व क्षात्रकर्म हीं उभयविध कार्यें महंमदाला करावीं लागलीं.

खाजगी जीवनांत महंमद नमुनेदार होता. त्याची राहणी अत्यंत साधी असे. श्रीकृष्ण, बुद्ध, येशू इ०प्रमाणेंच सामान्य जनतेच्या हृद-याशीं त्याला सहज समरस होतां आलें. तो आपलीं गृहकृत्यें आपणच उरकीत असे; इतकेंच काय पण मदिनेंत प्रभुमंदिर बांधतांना स्वतः जातीनें त्यानें दगड वाहिले आणि स्वावलंबनाचा व नम्रतेचा धडा घालून दिला. महंमदाचा प्रामाणिकपणा विख्यातच आहे. मक्कें-तील लोकांनीं त्याला ' अल्-अमीन ' म्हणजे ' विश्वासू ' अशा पदवीनें भूषविलें होतें. प्रेमाच्या बाबतींतली त्याची उत्कटता असाधारण होती. आपल्या सर्वच गृहिणींना तो प्रेमदृष्टीनें वागवी. त्याच्या ममताळूपणा-मुळेंच त्याचे अनुयायी त्याच्यावर असीम निष्ठा ठेवीत. महंमदाच्या

अनुयायांपैकीं कोणी फितुर झाल्याचें उदाहरण दिसत नाहीं. आनास नांवाचा त्याचा एक नोकर होता. त्यानें नेहमीं म्हणावें, "मी आठ वर्षांचा होतों तेव्हांपासून हजरतची सेवा करीत आहें. पण एकदासुद्धां तोंड टाकून ते मला बोलले नाहींत."

डॉ. राधाकृष्णन् यांनीं महंमद–प्रणीत इस्लामी धर्माच्या यशस्वितेविषयीं लिहितांना असें म्हटलें आहे कीं, "बहुजनसत्तावाद ही इस्लामी धर्माच्या व्यावहारिक बाजूची गुरुकिल्ली आहे. त्यामुळेंच त्या धर्माचा एवढा प्रसार होऊं शकला. वर्ण किंवा वंश यांचा विचार न करतां कोणत्याहि मनुष्याला इस्लामी धर्म आपल्या ध्वजाखालीं येऊं देतो."× आपल्या साऱ्या उपदेशांत महंमदानें तत्त्वापेक्षां वर्तनावर अधिक भर दिला आहे. प्रार्थना, दानधर्म, उपवास, तीर्थयात्रा, शुद्धाचरण हीं इस्लामी धर्माचीं विहित कर्में कोणत्याहि धर्मांत सांपडतील. या दृष्टीनें सर अहमद हुसेन यांनीं म्हटल्याप्रमाणें "मुसलमानी धर्म हा खऱ्या ख्रिस्ती धर्माशीं अथवा दुसऱ्या कोणत्याहि खऱ्या धर्माशीं विसंगत नाहीं." *

हार्दिक गुणांप्रमाणेंच महंमदाचे बौद्धिक गुणहि जाज्ज्वल्य होते. त्याचा मोहक रुबाब आणि अजब वक्तृत्वशैली यांयोगें प्रतिस्पर्धी पंडितांना तो तत्काळ तेजोहीन करीत असे. त्याची स्मरणशक्ति दांडगी होती. कल्पकता आणि बुद्धिचापल्य हीं देखील वाखाणण्यासारखीं होतीं.

महंमदाच्या या हार्दिक व बौद्धिक गुणांना आत्मविश्वास आणि ईश्वरनिष्ठा यांची अलौकिक जोड मिळाली म्हणून त्याच्या हातून एवढें

---

×" Democracy is the keynote of Islam on its practical side. This is what enabled it to succeed as a missionary religion. It invites every human being to its ample fold, whatever be his colour or race"—S. Radhakrishnan.

* "... is not inconsistent with true Christianity or any other true religion."

—A Hussain.

कार्य झालें. आपण जगदुद्धारार्थ अवतरलों आहों असा त्याला गाढ विश्वास वाटे. प्रेषितांचें वैशिष्ट्य तें हेंच.

अखेर महंमदाच्या अवतारकार्याचा एका वाक्यांत समारोप करावयाचा म्हणजे अमीरअल्लींनीं म्हटल्याप्रमाणें, "त्याचें जीवन म्हणजे उदात्त विचारानें आणि श्रद्धेनें केलेल्या कृत्यांचा अत्यंत उदात्त इतिहास होय."*

---

* "His life is the noblest record of a work nobly and faithfully performed."—**Ameer Ali.**

# ६. एक रमणीय तत्त्वज्ञान

जुन्या पारशी धर्मांत ज्या कल्पना प्रचलित होत्या त्या जगांतील इतर मुख्य धर्मांच्या कल्पनांशीं बऱ्याच सदृश आहेत हें पुढील विवेचनावरून कळून येईल. साधारणतः सत् आणि असत्, पुण्य आणि पाप, तेज आणि तम या द्वंद्वांवर जगांतील एकंदर सुखदुःखांची संगति लावण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. अदृश्य जगांतील ज्या शक्तींचा अंमल आपल्या सृष्टीवर चालतो असें आपण मानतों त्या शक्तींतदेखील या द्वंद्वांच्या तत्त्वावर दोन पक्ष पाडण्यांत येतात. सुख, पुण्य, तेज इ०वर नियंत्रण करणाऱ्यांचा एक पक्ष आणि दुःख, पाप, तम इ०कांचें साम्राज्य चालविणारा दुसरा पक्ष. जुन्या पारशांच्या पौराणिक कल्पना याच धर्तीच्या आहेत.

अदृश्य जग एका खाडीनें मधोमध विभागलेलें आहे. दक्षिणेकडे

पुण्यमय प्रदेश आणि उत्तरेकडे पापमय प्रदेश. सत्यतेजाची रोषनाई दक्षिणेकडे झाली आहे तर उत्तरेकडे असत्याची काजळी रात्र पसरलेली आहे. आहूर मझ्द हा दक्षिणेचा महाराजा आणि अर्हिमान् हा उत्तरेचा अधिराज. आहूर मझ्दाचे ३३ सहाय्यक असून ते त्याच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्यांत तत्पर असतात. अर्हिमानचेहि अनुयायी अनेक आहेत. उल्का व ग्रह हे निसर्गाच्या चक्रांत अडथळा आणणारे आहेत अशा समजुतीनें त्यांना अर्हिमानचे पाइक मानण्यांत येतें.

ही झाली अदृश्य जगाची घटना. देवदानवांच्या हिंदु कल्पना तसेंच ख्रिस्ती व इस्लामी पुराणांतील प्रभु व सैतान या कल्पना वरील योजनेशीं किती सुसंगत आहेत हें सहज दिसून येईल. ख्रिस्ती पुराणांतील ॲडॅम व ईव्ह या मानव जातीच्या पितरांप्रमाणें माशा आणि माशजोई ही दंपती पार्शी लोक मानतात. पृथ्वीच्या आरंभीं एक वृषभ ( घोष ) परमेश्वरानें निर्माण केला. त्यानें टाकलेल्या बीजापासून हें आद्य मानवांचें जोडपें निर्माण झालें. आज दिसणारा मानवजातीचा अफाट विस्तार या जोडप्यापासून झाला आहे. याच वृषभानें टाकलेल्या दुसऱ्या बीजांपासून राक्षस निर्माण झाले. अशा रीतीनें मानवी व आसुरी सृष्टीचा निर्माता म्हणून या स्वर्गीय वृषभाची महती गाण्यांत येते.

मरणोत्तर जीवनांतदेखील कृतकर्माप्रमाणें स्वर्ग व नरक यांची प्राप्ति होण्याची पारशी कल्पना इतर धर्मांतील कल्पनांशीं जुळती आहे. मृत्यूनंतर जीवात्मा तीन दिवसपर्यंत संचार करीत असतो. त्यानें पुण्यसंचय करून ठेवला असेल तर हे तीन दिवस सुखांत जातात; पण त्यानें पाप आचरलें असेल तर मात्र या तीन दिवसांत त्याला क्लेश होतात. नंतर पुण्यवान् आत्मा असल्यास एक रूपसुंदर कुमारी त्याला भेटते व स्वर्गाकडे घेऊन जाते. उलट पापात्म्याच्या स्वागतार्थ एक जखीण येते आणि नरकाकडे त्याला खेचून नेते.

अग्निपूजा ही इराणमधील सनातन उपासना. आर्य हिंदूंत ज्याप्रमाणें दक्षिणाग्नि, गार्हपत्याग्नि इ० अग्नि आहेत. त्याप्रमाणेंच मुख्यतः तीन अग्नि इराणी लोक मानीत. ( १ ) पुरोहिताग्नि ( Atur Farnbag ), ( २ ) वीराग्नि ( Atur Gusnasp ) हा कैखुस्रूनें प्रज्वलित केलेला अत्यंत प्राचीन अग्नि होय. ( ३ ) मजूराचा अग्नि ( Atur Burzhin Mitro ) हा खोरासान प्रांतांत होता.

झरतुष्ट्राचा अवतार झाला त्या वेळच्या पारशी लोकांत अशा प्रकारच्या कल्पना रूढ होत्या. इतर धर्मसंस्थापकांप्रमाणें झरतुष्ट्रालाहि तत्कालीन अज्ञ जनतेच्या अडाणी समजुतींविरुद्ध झगडावें लागलें. प्राचीन धर्मतत्त्वांना उजळा देण्याचें अवघड कार्य त्यानें पार पाडलें. विशेषतः धार्मिक जीवनाची, सत्यसंशोधनाची, आणि विकासाची अवश्यकता लोकांस पटवून एक रमणीय तत्त्वज्ञान त्यानें निर्माण केलें. झरतुष्ट्री धर्माचीं तत्त्वें पुढें थोडक्यांत दिलीं आहेत. त्यांवरून त्याच्या उदात्त धर्मज्ञानाचें श्रेष्ठत्व कळून येण्यासारखें आहे.

खालीं दिलेलीं सात तत्त्वें हा झरतुष्ट्री धर्माचा गाभा होय. झरतुष्ट्री धर्माचें संगीत या सप्तसुरांवर छेडलें गेलें आहे.

( १ ) सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ, विश्वनिर्माता जो आहूर मझ्द ( Ahura Mazda ) त्याचें आम्ही पूजन करतों.

( २ ) मझ्दाचा धर्म हाच सत्यधर्म. आमचें धर्मशास्त्र सांगतें कीं, "धर्ममार्ग एकच आहे आणि तो म्हणजे सत्याचा मार्ग होय."

( ३ ) परमेश्वराचा प्रेषित जो पुण्यशील झरतुष्ट्र त्यानें हा स्वर्गीय धर्म जगतावर आणिला.

( ४ ) सद्विचार, सच्छब्द, आणि सत्कृत्यें या तीन शब्दांत आमच्या धर्मतत्त्वांचें रहस्य सांगतां येईल.

( ५ ) आमच्या पूज्य अवेस्तांत झरतुष्ट्रानें सांगितलें आहे कीं,

( अ ) मानवतेचें आणि जगताचें उद्दिष्ट म्हणजे विकास हें होय.

(आ) सत्यासत्याची निवड करण्याचा स्त्रीपुरुषांना सारखाच अधिकार आहे. त्यांनीं सत्याचाच मार्ग स्वीकारावा.

(इ) बुद्धि व ज्ञान यांच्या किरणांत संचार करण्याची स्त्रीपुरुषांना सारखीच मोकळीक आहे.

(ई) सर्व माणसें श्रीमंत, गरीब, रावरंक हीं समान दर्ज्याचीं असून शाश्वत जीवनावर व विकासावर त्यांचा सारखाच हक्क आहे. मात्र ज्याला तें जीवन व परिणति प्राप्त करून घ्यावयाची असेल त्यानें सद्धर्माचें आचरण केलें पाहिजे.

(उ) धर्मशील माणसें समता, बंधुता, आणि शांति यांचें स्वर्गीय साम्राज्य या जगांत स्थापन करूं शकतील.

(६) आम्ही झरतुष्ट्री लोक प्रार्थना करतों कीं, " ज्यांनीं विकासाकडे जगाची प्रगति केली आहे त्यांची योग्यता आम्हांला यावी. " पुण्यशील झरतुष्ट्रानें विकासाचा मार्गहि स्पष्ट आखून दिला आहे. तो असाः—

(अ) सत्य आणि धार्मिकता हेंच आमचें आयुष्यांतील अखंड ध्येय असलें पाहिजे. आम्ही त्यांची पूर्णांशानें प्राप्ति करून घेण्याकरितां झटलें पाहिजे. प्रातःकाळीं उठल्यावर आणि रात्रीं निजतांना आम्ही जी प्रार्थना म्हणतों तींत याच तत्त्वाचें मंडन आहे. " धार्मिकता हें सर्वश्रेष्ठ पुण्य आहे. तेंच सौख्यनिधान होय. अत्यंत धार्मिक कार्यांत श्रेष्ठ सत्याची कास धरणारा पुण्यपुरुष सुख पावतो. "

(आ) मनांत सद्वृत्तीची जोपासना केली पाहिजे. ज्ञानतेजाचा साक्षात्कार होईपर्यंत परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीला शिक्षणानें पूर्णता आणीत राहावें. आपलें मन सद्वृत्त होऊन आहूर मझ्दाचे ठिकाणीं शांतपणें विलीन झालें म्हणजे पूर्णज्ञानाचें तेज आपलें मार्गदर्शक होईल. मग सद्विचार ( Humata ), सच्छब्द

( Hukhta ) आणि सत्कृत्यें ( Huvarastha ) ह्यांच्या आचरणांतच आपण तत्पर राहूं.

( इ ) दान, निष्ठा, प्रेम, आणि लोकसेवा हीं आपल्या विकासास अवश्य आहेत. आत्मोन्नति आणि लोकहित हीं एकरूपच आहेत.

( ई ) समाजांतील उच्चनीच, श्रेष्ठकनिष्ठ अशा सर्व वर्गांना कल्याणकारक होईल अशी शासनसंस्था स्थापण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. परमेश्वराच्या सर्वच लेंकरांना शांततेनें व समतेनें वागवावयाचें हाच खरा धर्म होय. यायोगेंच दैवी साम्राज्य पृथ्वीवर नांदूं लागेल.

( उ ) शरीर हें आद्य धर्मसाधन आहे म्हणून त्याची पूर्णपणें निगा राखणें, तसेंच जनहिताच्या दृष्टीनें आपलें घर, आपला समाज, आणि आपला देश रोगरहित करण्यासाठीं झटणें हें अवश्य आहे.

( ऊ ) वरील तत्त्वाप्रमाणें वागून जीवनाचें सार्थक केलें म्हणजे या जगांत माणसाचा पूर्ण विकास होईल आणि जड देहाचा त्याग केल्यानंतर गीतनिवासांत ( Abode of songs ) आहूर मझ्दाचे समवेत शाश्वत आनंदाचा उपभोग घेत तो परमपद मिळवील.

झरतुष्ट्राच्या उपदेशाचें हें रहस्य होय. मनुष्याला विकासाचा मार्ग सुलभ करून देणाऱ्या आणि सर्व जगांवर प्रभुत्व गाजविणाऱ्या परमेश्वराच्या सहा निरनिराळ्या विभूति झरतुष्ट्रानें कल्पिल्या आहेत. ( १ ) सन्मन ( Vohu Mano ), ( २ ) सत्य ( Asha ), ( ३ ) पवित्र शासक ( Khashtra ), ( ४ ) दया ( Spenta Armaiti ), ( ५ ) पूर्णत्व ( Haur vatal ), ( ६ ) अमरत्व ( Ameratal )

झरतुष्ट्राच्या रमणीय तत्त्वज्ञानाची स्थूल कल्पना एवढ्यावरून येईल. व्यक्ति आणि समष्टि यांचा पूर्ण विकास करणारें धार्मिक जीवन झरतु-

ष्ट्रानें उपदेशिलें. त्याच्या तत्त्वज्ञानाचें विहंगावलोकन करणारांसहि त्याचें इतर धर्मात्म्यांच्या उपदेशाशीं असलेलें सादृश्य चटकन् कळून येईल. येशू आणि महंमद यांची असीम ईश्वरभक्ति झरतुष्ट्राचे ठिकाणीं होती. बुद्धानें आखून दिलेला निर्वाणप्राप्तीचा अष्टांगिक मार्ग आणि झरतुष्ट्राचीं सद्विचार, सच्छद्ध इ० तत्त्वें यांच्यांत सारखेपणा आहे. इतकेंच नव्हे, तर समता, लोकसेवा इ० इतरहि बाबतींत बौद्ध व झर-तुष्ट्री धर्मांत एकवाक्यता आहे. तथापि बुद्ध आणि झरतुष्ट्र यांच्या वृत्तींत एक महत्त्वाचा भेद आढळतो. बुद्धाच्या शिकवणींत त्याग, शांति, अरति ह्यांवर सारा भर दिलेला, तर झरतुष्ट्राचें तत्त्वज्ञान युद्ध, कर्तृत्व, आणि विकासप्रियता यांवर उभारलेलें. झरतुष्ट्राच्या उपदेशांतील लढाऊ वृत्ति व विकासप्रियता यांमुळेंच विकासवादाचा तत्त्वज्ञ पंडित नित्शे याला आपणांस ‘ झरतुष्ट्र ’ म्हणवून घेण्यांत भूषण वाटलें. आपल्या ग्रंथाला ‘ इति झरतुष्ट्रः ’ [ ‘ Thus spake Zaratusthra ’ ] असें नित्शेनें नांव दिलें आहे. प्रसिद्ध पंडित प्रो. ए. व्ही. वुल्यम् जॅक्सन् यांनीं म्हटल्याप्रमाणें जगांत अपरंपार भरलेलें दुःख पाहून बुद्धाला मनु-ष्याच्या जीवनाचा वीट आला आणि त्यांतून सुटण्याकरितां तो निर्वाण-प्राप्तीचा मार्ग शोधूं लागला; पण जगांतील दुःखाची कल्पना असूनहि झरतुष्ट्राचा आशावाद व विजिगीषु वृत्ति अढळ राहिली.*

याच दृष्टीनें झरतुष्ट्री धर्म सामर्थ्यवान् अशा वैदिक तत्त्वज्ञानाला जवळचा आहे. आपल्या ठिकाणीं असलेल्या परमेश्वरी तेजाची जाणीव ठेवून व्यक्ति व समष्टि यांच्या उन्नतीसाठीं झटणें आणि अखेर परमेश्वर-

---

* “ India’s so called Prophet Prince is over-whelmed with the wretchedness of human existence, an existence from which the sole release is absorption into Nirvana; Persia’s sage is equally cognizant of the existence of woe but it is no world-woe without hope of triumphant domination. ”—A. V. William Jackson.

पदवीला पोचणें हें वैदिक ध्येय झरतुष्ट्री धर्मतत्त्वांतहि बिंबलें आहे. प्रतिभा, संस्कृति, आणि संपत्ति यांनीं झरतुष्ट्री लोक संपन्न आहेत. झरतुष्ट्री धर्मांत निराशावादाला जागा नाहीं, त्याला हिणकस भावनांचा गंध नाहीं, आणि दुर्बलतेचा संपर्कहि नाहीं. वीर्य, ओज, व सामर्थ्य यांनीं हें झरतुष्ट्री तत्त्वज्ञान रसरसलेलें आहे म्हणूनच अनुयायांची संख्या अत्यल्प असूनहि जगांतील प्रमुख धर्मांत त्याला मानाचें स्थान आहे.

[library stamp, illegible]

# ७. धर्माचें अंतर्राष्ट्रीय स्वरूप

धर्मविषयक प्रश्नांची गंभीर चर्चा कोठें सुरू झाली कीं, आमचे एक नवविचारवादी मित्र उपहासपूर्वक म्हणतात कीं, " अरे, मरणोन्मुख होऊन पडलेल्या त्या धर्माला ऑक्सिजन् देऊन जगविण्याचा तुम्ही कां प्रयत्न करीत आहां ? " आधुनिक आधिभौतिकवादी लोकांची धर्मासंबंधीं काय वृत्ति आहे हें या उद्गारांवरून उत्तम रीतीनें कळून येईल. असें म्हणतात कीं, मास्को शहरांत मोठमोठ्या इमारतींवरून ' धर्म ही अफू आहे ' हें कार्ल मार्क्सचें सुप्रसिद्ध वचन आकर्षक व ठळक अक्षरांनीं लिहिलेलें असतें. एकंदर मानवी समाजाच्या घटनेंत आमूलाग्र बदल व्हावा अशाबद्दल ज्यांचा अट्टाहास चालू आहे त्यांना अगोदर धर्माचें उच्चाटण होणें इष्ट वाटतें. आधुनिक जगांतली ही धर्मनिर्मूलनाची चळवळ अधिकाधिक फैलावत जाणार हें स्पष्ट आहे.

असें असतां " धर्मो नित्यः सुखदुःखे त्वनित्ये " हें सनातन वचन खोटें पडणार कीं काय अशी भीति कोणास वाटत असेल तर ती मात्र निराधार होय. कारण वर्तमानकाळ हा आपल्या डोळ्यांसमोर असल्यानें सद्यःकालीन घडामोडी अपूर्व आहेत असें आपणांला वाटतें. पण ही चूक आहे. मानवी समाजाचा ओघ कांहीं काळ वाहत राहिला म्हणजे पुढें पुढें त्याचा निर्मळपणा जाऊन त्यांत घाण सांठते आणि ती असह्य झाली म्हणजे विचारवंत पुरुष निर्माण होऊन ते ती घाण काढून टाकण्याचा प्रयत्न करतात. अशांचे आचारविचार क्रांतिकारक असल्यानें ते जनतेला अधर्मी व समाजशत्रु वाटावेत यांत नवल नाहीं. सध्या धर्मावतार म्हणून ज्यांचें जगभर पूजन होत आहे त्या बुद्ध, येशू, महंमद, झरतुष्ट्र इ० प्रेषितांना त्यांच्या त्यांच्या काळीं पुराणमताभिमानी समाजानें छळलेंच कीं नाहीं? आज धर्माचा कट्टा वैरी कार्ल मार्क्स कालांतरानें अवतारी पुरुष गणला जाईल हें आजच त्याची जी विभूतिपूजा चालली आहे तीवरून दिसून येईल. सारांश, युगायुगानें निर्माण होणारे क्रांतिकारक पुरुष प्रतिक्रिया म्हणून रूढ धर्माविरुद्ध बंड पुकारतात आणि त्यांच्या क्रांतिकारक विचारांचे पडसाद जगभर उमटतात हें खरें असलें, तरी त्यांयोगें शाश्वतजीवी धर्मतत्त्वांना ढळ पोंचत नाहीं; उलट त्यांचें शुद्धीकरण होऊन तीं अधिकच तेजस्वी बनतात. 'नित्य' म्हणून समजला जाणारा जो धर्म तीं हीं धर्मतत्त्वेंच होत.

धर्म या कल्पनेचें मूळ शोधीत गेलें तर आपणांस अगदीं मानवी समाजाच्या प्रथमावस्थेपर्यंत जावें लागेल. जनावरांची स्थिति सुटून मनुष्यपणाचा जरा कोठें प्रादुर्भाव झाला असेल तोंच धर्मविषयक कल्पना उदय पावल्या असें दिसून येतें; आणि याचें प्रत्यक्ष प्रमाण म्हणजे आज जगावर ज्या रानटी जातींनीं ज्ञानवृक्षाचें फळ अद्याप चाखलेलें नाहीं त्यांच्यांतहि ओबडधोबड स्वरूपांत धर्म रूढ आहे असें दिसून येईल. त्यांना अप्रतिम कोरीव लेणीं कोरतां आलीं नाहींत, तरी दगडांची बोजड हत्यारें तयार

करतां येतात; रागरागिण्यांची छेड करून नादसागराचा मध्य गांठतां आला नाहीं, तरी चामड्यांच्या वाद्यांवर हेंगाडे सूर काढून तल्लीन होतां येतें; तसेंच धर्माचें अंतिम शुद्ध व परममंगल दर्शन त्यांना होत नसलें, तरी त्यांची अडाणी श्रद्धा रानटी प्रकारांनीं देवतांची उपासना करीतच असते.

रानटी अवस्थेंतील हा धर्म नेहमीं भीतीच्या पोटीं जन्म घेतो. इंद्रधनुष्य, विजांचे उत्पात, वादळें, सूर्याचा प्रखर ताप, पर्जन्यवृष्टि, इ० पंचमहाभूतांच्या रम्यगंभीर लीला पाहून आश्चर्य आणि भीति यांनीं रानटी मन गुंग होऊन जातें आणि ह्यांपैकीं प्रत्येक चमत्काराचा कोणी-तरी अव्यक्त जनक असला पाहिजे असें त्याला वाटूं लागतें. अशा रीतीनें निरनिराळ्या देवता रूढ होतात. पुढें या देवतांना प्रसन्न करून घेण्याकरितां रानटी माणूस स्तोत्रें रचतो, उपासनापद्धति ठरवितो, आणि त्यांचा कोप होऊं नये म्हणून आपणांवर कांहीं विशिष्ट नियम लादून घेतो. देवताविषयक कल्पना हा त्याचा वेदांत आणि हे नियम हा त्याचा आचारधर्म होय.

सामान्यतः धर्माच्या उत्पत्तीची कथा अशी सांगतां येईल. मानवी समाज जसजसा उन्नत होत गेला, त्यांत अलौकिक प्रतिभेचे व साक्षात्का-राचे पुरुष जसजसे निर्माण होत गेले, तसतशी धर्म व नीति हीं देखील उदात्त, व्यापक, व सूक्ष्मतर झालीं. मग धर्माची उभारणी भीतीच्या पायावरून न होतां भक्तीच्या पायावर होऊं लागली. देवतांचें अनेकत्व नाहींसें होऊन एका सर्वशक्तिमान् जगन्नियंत्याचा साक्षात्कार मनुष्यांना झाला. सर्वांत विशेष गोष्ट म्हणजे आपणदेखील तपश्चर्येच्या जोरावर पर-मेश्वराचें परमपद मिळवूं याची जाणीव मनुष्यांना झाली. ही सायुज्य-मुक्ति देणारा तोच श्रेष्ठ धर्म होय. अशा रीतीनें धर्माच्या विकासाचें थोडक्यांत दिग्दर्शन करतां येईल.

हा श्रेष्ठधर्म फार प्राचीन काळींच अवतीर्ण झाला आहे. तथापि तीन

चारशें वर्षांपूर्वी युरोपखंडांत जी प्रचंड क्रांति झाली, जे नवे शोध लागले, आधिभौतिक वादाचे नवे सिद्धांत प्रस्थापित होऊं लागले त्यांनीं धर्मावर जबरदस्त आघात केला. जळ, स्थळ, आणि अंतराळ यांत आपणांला अनिरुद्ध संचार करतां येणार अशीं चिन्हें मनुष्याला दिसूं लागलीं. नवीं नवीं सुखसाधनें निर्माण करून आपण भूलोकाला स्वर्गाचें रूप देऊं शकूं असा विश्वास त्याला वाटूं लागला, आणि पंचमहाभूतांना आपण लागेल तसें वळवूं शकतों असा अहंकार त्याच्यांत उत्पन्न झाला. बुद्धि आणि तर्क यांचें प्राबल्य झालें. श्रद्धेची पकड कमी होत गेली आणि प्रत्यक्ष सृष्टीच्या मोहजालांत गुंतलेली मनुष्याची प्रतिभा अव्यक्त, अचिंत्य अशा गोष्टींचा विचार करीनाशी झाली. निरीश्वरवाद, जडवाद इत्यादिकांचा उदय याच वेळीं झाला.

भौतिक शास्त्रें परिणतीकडे जसजशीं अधिक जाऊं लागलीं, खोल संशोधन अतोनात झालें, मानवी सामर्थ्य अपरंपार वाढलें, तसतसे जड-वाद व निरीश्वरवाद यांच्या विरुद्ध दिशेनें वारे वाहूं लागले. कारण अधिक संशोधनानें मनुष्याचें जगाविषयींचें कुतूहल कमी न होतां वाढूंच लागलें. 'टयुटानिक' सारखी राक्षसी नौका एकाद्या हिमगिरीनें सहज लीलेनें एकादी कोपरखळी देतांच भग्न व्हावी किंवा सुंदर शिल्पानें भूषित केलेलें शहर धरणीकंपानें विछिन्न होऊन पडावें हें पाहून मनुष्याला आपल्या पंगूपणाची व निसर्गाच्या सामर्थ्याची जाणीव होऊं लागली. दुर्बिणीच्या साह्यानें अंतराळाचा ठाव कांहींसा घेतां आला, तेव्हां सागरा-वर एकादें वाळलेलें लिंबू तरंगावें त्याप्रमाणें अनंताच्या अवकाशांत आपली ही पृथ्वी तरंगत आहे हें कळून निसर्गाच्या विराट्स्वरूपाची कल्पना आली.

परमेश्वराची जागा निसर्गानें घेतली. सर्व विश्वांत एक तऱ्हेची संगति व एकजिनसीपणा दिसूं लागला. भौतिकशास्त्रांतले पंडितदेखील श्रद्धाळु दृष्टीनें जगच्चक्राकडे पाहूं लागले. केवळ निसर्गाच्या वेगवेगळ्या शक्तींना

८८३५

आपल्या सुखसोयीसाठीं राबवणें एवढेंच त्यांचें ध्येय राहिलें नाहीं. विख्यात हिंदी शास्त्रज्ञ सर जगदीशचंद्र बोस म्हणतात, " या विश्वाच्या सर्व बदलत्या बाह्य स्वरूपांत व विविधतेंत एकच तत्त्व भरलेलें आहे हें ज्यांना कळेल, त्यांनाच अंतिम सत्याची प्राप्ति होईल. इतरांना नाहीं."* जर्मनीचे भौतिकशास्त्राचे महर्षी प्रो. एलबर्ट इन्स्टिन, प्रो. इविंग, प्रो. हॉल्डेन, हिंदी शास्त्रज्ञ सर प्रफुल्लचंद्र रॉय इ० गृहस्थ या विचारप्रणालीचे प्रवर्तक आहेत.

धर्माच्या उत्पत्तीपासून त्याचा विकास आणि त्याचीं स्थित्यंतरें पहात पहात आपण अगदीं आजच्या काळापर्यंत आलों.

आजचा काळ आपण बुद्धिप्रामाण्याचा व आधिभौतिकवादाचा समजतों. आधिभौतिक शास्त्रें आणि धर्म यांचा अन्योन्यविरोध नाहीं हें सत्य डॉ. जे. बी. एस्. हॉल्डेन् या सुप्रसिद्ध इंग्लिश शास्त्रज्ञानें सुंदर रीतीनें विशद केलें आहे. प्रो. हॉल्डेन हे सन्मान्य शास्त्रज्ञ आहेत. त्यांचें संशोधनकार्य श्रेष्ठ दर्ज्याचें आहे. इतकें असूनहि त्यांनीं धर्माच्या अवश्यकतेचें सदासर्वकाळ समर्थनच केलें आहे. नुकतेंच त्यांनीं ' आधिभौतिकवाद ' ( Materialism ) नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते म्हणतात, " उच्च शास्त्रज्ञानाचे नांवाखालीं धार्मिक कल्पनांचा विध्वंस करणें मला संमत नाहीं...... सध्याच्या काळीं धर्माची जितकी अवश्यकता आहे तितकी ती पूर्वीं केव्हांच नव्हती. आपल्या जीवनां-

---

* जगदीश बाबूंच्या मूळच्या सुंदर भाषणांतील हा विस्तृत उतारा देत आहें.

" It was when I came upon these selfmade records and perceived in them one phase of pervading unity that bears within it all things: the mote that quivers and ripples on light, the teeming life upon our earth, and the radiant suns that shine above us–it was then that I understood for the first time a little of that message proclaimed by my ancestors on the banks of the Ganges, thirty centuries ago "—J Bose

तच त्याचा अंतर्भाव आहे. * " इतके सश्रद्ध असूनहि हॉल्डेनसाहेब खोट्या धर्मसमजुतींच्या व चमत्कारांच्या विरुद्ध आहेत. एकाद्या ठिकाणीं एकदम एकादी वस्तु उत्पन्न होणें किंवा धर्मप्रभावानें असाध्य रोग तत्काळ बरा होणें ह्या गोष्टी निव्वळ काल्पनिक आहेत असें ते म्हणतात. तथापि दररोजच्या जीवनांत इतकी घाण माजली आहे कीं, उच्च गोष्टीकरितां स्वर्ग वगैरे काल्पनिक सृष्टि निर्माण करून मनुष्याला आपलें समाधान करून घ्यावें लागतें. अशी या गोष्टीच्या उत्पत्तीची मीमांसा ते करतात. हॉल्डेन साहेबांच्या मतें धार्मिक दृष्टीनें विश्वाच्या उत्पत्तिस्थितीचा अर्थ लावणें हाच सर्वश्रेष्ठ मार्ग होय.

हॉल्डेन साहेब म्हणतात, " परमेश्वर ही कल्पना राष्ट्रांना एकत्र आणून एक सर्वव्यापी संस्कृति स्थापण्यास साह्य करते. आणि या एकीकरणावर धार्मिक मान्यतेचा शिक्का बसला म्हणजे त्या संस्कृतीला बळकटी येते. "† पण ही अशी सार्वराष्ट्रीय धार्मिक मान्यता मिळवावयाची कशी हा प्रश्न आहे. कारण प्रत्येक राष्ट्र आपापल्या धर्माचा अभिमान वाहत असावयाचें. प्रत्येक राष्ट्र सहिष्णु व निरभिमान होईल तेव्हांच हा प्रश्न सुटेल. पण याहि अडचणीला तोंड देण्याचे प्रयत्न उदार विचाराच्या लोकांनीं केले पाहिजेत.

डॉ. हॉल्डेन यांनीं सुचविलेली एक योजना सर्वमान्य होण्यासारखी आहे. सर्व धार्मिक वाङ्मय आणि कला यांची मीमांसा मोकळ्या मनानें करावी. ती अशी कीं देवताविषयक वा इतर आस्तिक्यवादाच्या कल्पना

* " I have no sympathy with mere destruction of religious beliefs in the name of superior and scientific knowledge....... Religion is perhaps more needed at the present time than ever before. It is implicit in our very being "–Haldane.

†"...the person of God binds nations together in a common civilization and the definite religious recognition of this bond gives strength to it. "— Haldane.

टाळून फक्त सर्व धर्मांची आध्यात्मिक बाजू तेवढी विचारांत घ्यावी. अशा योगें वादविवादांचीं स्थळें फार थोडीं उरतील आणि सर्व राष्ट्रांना मान्य व श्रेयस्कर होईल असा धर्म निर्माण करतां येईल. आज जगांत शांति नांदावी म्हणून ज्या लोकांचे व संस्थांचे प्रयत्न चालले आहेत त्यांनीं या दिशेनें कार्य करावें असा डॉ. हॉल्डेन यांचा अभिप्राय आहे. याप्रमाणें एका धर्मप्रवण शास्त्रज्ञाचीं मतें आहेत. त्यांतील मुद्दे इतके मार्मिक व सर्वव्यापी आहेत कीं, त्यांवरच आपल्या विवेचनाची उभारणी करणें इष्ट होईल.

व्यक्ति काय किंवा राष्ट्र काय श्रद्धेच्या बळावर जगतात आणि श्रद्धेनेंच उन्नत होतात. ज्ञानाच्या प्रगतीबरोबर श्रद्धेयांत बदल होत जाईल हें खरें. पण कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत श्रद्धेय कायम राहील. परमेश्वर या कल्पनेला शास्त्रज्ञानानें दूर सारिलें. पण त्याऐवजीं निसर्गपूजा सुरू झाली. ईश्वर अथवा निसर्ग या दोन श्रद्धेयांखेरीज संस्था, समाज, मातृभूमि, मानवता इ० दुसऱ्या अनेक ध्येयांची उपासना चालू आहे. देव काय आणि ध्येय काय कोणाचीहि अनन्यभावानें भक्ति केली म्हणजे तिचें आध्यात्मिक फल एकच मिळावयाचें. या दृष्टीनें विदेही जनक, जगाच्या कल्याणासाठीं प्राणत्याग करणारा येशू, मायभूमीच्या उद्धारार्थ आयुष्यभर झगडणारा जोसेफ मॅझिनी, गुलामगिरीच्या विरुद्ध झगडतां झगडतां प्राण ठेवणारा हुतात्मा एब्राहिम लिंकन हे सर्व निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या राष्ट्रांत, निरनिराळ्या ध्येयांसाठीं झटणारे थोर पुरुष आध्यात्मिक दृष्ट्या एकाच योग्यतेचे ठरतात.

कारण परमेश्वर ही कल्पनाच मुळीं सर्व उच्च ध्येयांची एक मूर्ति करून बनवलेली आहे.

**हिंदुधर्मः**—परमेश्वर म्हणजे सत्त्व, सत्य, आणि आत्मा आहे.
**बौद्धधर्मः**—शाश्वत शांति हाच परमेश्वर.
**ख्रिस्तीधर्मः**—परमेश्वर प्रेमस्वरूप आहे.

**मुसलमानी धर्मः**—परमेश्वर एक आहे. शक्ति आणि न्याय-बुद्धि हें त्याचें रूप आहे.

**झरतुष्ट्री धर्मः**—परमेश्वर म्हणजे तेज आणि सत्य.*

यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं ‘परमेश्वर’ ही रूढ कल्पना कोणास अमान्य असली तरी सत्य, प्रेम, शक्ति, न्यायबुद्धि इ० दैवी गुणांचा आदर ते खास करतील.

तेव्हां जगाचा एक सर्वव्यापी धर्म होण्यास ईश्वरवादाची अथवा धार्मिक कल्पनांची आडकाठी येईल असें नाहीं. बुद्ध स्वतः निरीश्वरवादी होता. तरी महान् धार्मिक पुरुषांत त्याची गणना करतात. ख्रिस्ती धर्मातील पुनरुत्थान वगैरे कल्पना कोणास न पटणाऱ्या असल्या तरी येशूचें आदर्शभूत जीवन सर्वांना वंद्य वाटेल. यावरून धर्म ही वस्तु निव्वळ श्रद्धाळु समजुतीवर आधारलेली नाहीं असें स्पष्ट म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

मग धर्माची व्याख्या तरी काय? खरोखर म्हटलें तर धर्माची व्याख्या थोडक्यांत देतां येणें केवळ अशक्य आहे. तथापि त्याचें स्थूल आणि व्यापक स्वरूप मात्र थोडक्यांत सांगतां येईल. मनुष्याला आपला पूर्ण विकास व्हावयास ‘अभ्युदय’ आणि ‘निश्रेयस्’ म्हणजे इहलोकीं उत्कर्ष आणि परलोकीं मुक्ति या दोन गोष्टी मिळाल्या पाहिजेत. डॉ. राधाकृष्णन् हे हीच गोष्ट विशद करतांना म्हणतात, “समाजाचा सदस्य आणि व्यक्ति या दोनहि दृष्टींनीं मनुष्याचें शील बनविण्यास जीं ध्येयें व उद्दिष्टें, जे संस्कार आणि ज्या संस्था कारणीभूत होतात त्या सर्वांचा ‘धर्म’ ह्या संज्ञेंत अंतर्भाव करतां येईल. धर्म म्हणजे भूलोकीं सौख्य मिळावें आणि परलोकीं मुक्ति मिळावी या दुहेरी उद्दे-

* J. T. Sunderland (Modern Review, March 1932)

शानें पाळावयाचा सम्यक् आचाराचा नियम होय. "*

ह्या व्याख्येशीं बहुधा कोणत्याहि तत्त्वज्ञानाचा वा धर्माचा विरोध येईलसें वाटत नाहीं. या व्याख्येप्रमाणें प्रमुख धर्मांतील सर्वसामान्य नीतितत्त्वें निवडून त्यांची गुंफण केली आणि उपलब्ध असलेल्या शास्त्रीय ज्ञानाच्या तेजानें धर्मकल्पनांतील गूढ भागांचें आविष्करण करून त्या विशद केल्या तर बुद्धिवादी नवीन जग खात्रीनें या जगद्धर्मा-कडे पाहूं लागेल. श्रद्धा आणि बुद्धि यांचा असा समन्वय करण्याचे प्रयत्न करणारी थिआसॉफिकल सोसायटीसारखी संस्था उदयास येणें हें एक प्रसादचिन्हच होय.

"इमीजिएट फ्यूचर" (the Immediate Future) या आपल्या सुंदर पुस्तकांत डॉ. ॲनी बेझंट यांनीं निरनिराळ्या प्रमुख धर्मांनीं जगाच्या आत्मिक जीवनाचीं कोणकोणतीं अंगें प्रकर्षाला आणिलीं याचें थोडक्यांत उत्तम विवेचन केलें आहे. मनुष्याला त्याच्या परमेश्वर स्वरू-पाची ओळख हिंदुधर्मानें करून दिली; ज्ञान आणि सम्यक् विचार यांचा ठेवा बौद्ध धर्मानें जगाच्या हवालीं केला; पवित्र जीवन आणि शुद्ध वातावरण यांची महती झरतुष्ट्री धर्मानें पटवून दिली, आणि ख्रिस्ती धर्मानें मानवाला श्रेष्ठतेची शिकवण देऊन स्वार्थत्यागाचा धडा शिक-विला. यांतच महंमदी धर्माची आत्यंतिक निष्ठा घेतली म्हणजे सर्व धर्मांचें सार आलें.‡

---

* It stands for all those ideals and purposes, influences and institutions that shape the character of man both as an individual and as a member of society. It is the law of right living, the observence of which secures the double object of happiness on earth and salvation "—S. Radhakrishnan.

‡ डॉ. सर राधाकृष्णन् यांचें "The Heart of Hindustan" हें पुस्तक या दृष्टीनें अभ्यसनीय आहे. हिंदु, बौद्ध, ख्रिस्ती इ. धर्मांचा इतका व्यापक, सुसंगत व खोल विचार केलेला इतरत्र क्वचितच आढळेल.

नवीन आंतरराष्ट्रीय धर्माची संस्थापना करतांना आजवरच्या इतिहासांतल्या ज्ञानभांडाराचा सढळ हातानें उपयोग करून घेतां येईल. याचकरितां इतिहास घडविणारे जे महापुरुष त्यांच्या जीवनाशीं परिचय करून घेतला पाहिजे. नंदादीपाप्रमाणें अखंड तेवत राहिलेल्या त्यांच्या चरित्रांनींच जगाचा मार्ग आजवर उजळ होत आला आहे. त्यांचीं निःश्वसितें म्हणजेच परमेश्वरानें मनुष्याच्या चौकस प्रश्नांना पाठविलेलीं उत्तरें होत. त्यांनाच आपण धर्म म्हणतों.* त्यांचे उपदेश म्हणजे निव्वळ भाषेचा कलाविलास नव्हे; तर त्यांच्या आचारांचें प्रतिबिंब होय. कर्मयोगाचा उपदेश करणाऱ्या श्रीकृष्णानें निःस्वार्थी वृत्तीनें विहित कर्तव्यें कशीं करतां येतील तें दाखविलें. जगांत दुःख भरलेलें आहे एवढें सांगून बुद्ध स्वस्थ बसला नाहीं, तर त्यानें अपार वैभवाचा व संसारसुखाचा त्याग ऐन तारुण्यांत करून धर्मोपदेशांत विरक्त वृत्तीनें आयुष्य घालविलें. येशूनें तर स्वार्थत्यागाचें उदाहरण घालून देतांना प्राणाकडेहि पाहिलें नाहीं. आपल्या धर्मविचाराकरितां महंमदानें रानटी जमातींचा असह्य छळ सोशिला. सारांश, उपदेश आणि आचरण या दोन्ही दृष्टींनीं प्रेषितांचीं चरित्रें अभ्यसनीय आहेत.

वाढत्या शोधांनीं, प्रवासाच्या वेगवान् साधनांनीं, आणि वाङ्मयप्रसारामुळें दूरदूरचे देश निकट येत चालले आहेत. राष्ट्राराष्ट्रांतील सीमारेषा फक्त औपचारिकच ठरून सांस्कृतिक विचारांचा विनिमय सर्रास सुरू झाला आहे. सर्व राष्ट्रांचें एकीकरण करण्याच्या कल्पनेंतूनच राष्ट्रसंघाची योजना बाहेर पडत आहे. सामाजिक, आर्थिक, व राजकीय गोष्टींना असें अंतरार्ष्ट्रीय स्वरूप हळूहळू येत चाललें असतां धार्मिक

* "Religions in the plural mean God's answer through men in whom divinity shines out more than in their fellows. His answer to the search of man after himself."

—Annie Besant.

जीवनाचा तेवढा विचार संकुचित बुद्धीनें करणें इष्ट होणार नाहीं. निरनिराळ्या देशांत व धर्मांत प्रतिभाशाली महात्मे जन्मास आले आहेत. आणि त्यांचे उपदेशहि पृथ्वीमोलाचे आहेत. ते अदूषित व श्रद्धायुक्त बुद्धीनें अभ्यासणें व यथाशक्ति त्याप्रमाणें आचरण करणें हा श्रेष्ठ जीवनाकडे नेणारा मार्ग होय. उच्च गोष्टींशीं आदरबुद्धीनें तन्मय झाल्याखेरीज आपला विकास होत नाहीं, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. आज म. गांधी, डॉ. रवींद्रनाथ टागोर, सी. एफ्. अँड्रूज्, मॉ. रोमांरोलां, एच्. जी. वेल्स् इ. महात्मे व विचारवंत पुरुष सहिष्णुतेची व अंतर्राष्ट्रीय प्रेमभावाची शिकवण देत आहेत. अशा वेळीं म. गांधींनीं म्हटल्याप्रमाणें—“ सर्वांचे धर्म निराळे असले तरी एका झाडाचीं पानें निरनिराळीं असून सुद्धां ज्याप्रमाणें आपण एकाच झाडाचीं पानें आहोंत असें समजून राहतात, त्याप्रमाणें राहण्याची आपण महत्त्वाकांक्षा बाळगिली पाहिजे. ” सर्व राष्ट्रांची शांति तीच आपली शांति, सर्व मानवतेचें सुख तेंच आपलें सुख, आणि साऱ्या जगाचा उद्धार तोच आपला उद्धार हें एकदां पटलें म्हणजे मग सर्वत्र आनंदाचें साम्राज्य सुरू होईल.

# आशियाचे धर्मदीप

## ( चरित्र-विभाग )

# १. श्रीकृष्ण.

आज त्या गोष्टीला सुमारें पांच हजार वर्षें झालीं असतील. श्रावण महिन्यांतील वद्य अष्टमीची रात्र. काळोख म्हणजे मी म्हणत होता. पावसानें तर अशी झोड उठाविली होती कीं सारी पृथ्वी जलमय होते कीं काय अशी भीति वाटूं लागली. लहानथोर सर्व प्राणी भयचकित होऊन आपापल्या घरांत बसले होते. अशा भीषण काळीं वसुदेव नुकतेंच जन्मलेलें बालक घेऊन, यमुनापार होण्यासाठीं दुथडी फोंफावत चाललेल्या त्या नदींत शिरला. एकदोन पाउलें टाकलीं न टाकलीं तों त्याच्या गळ्यापर्यंत पाणी लागलें. इतक्यांत बालकाच्या पायाचा स्पर्श यमुनेच्या पाण्याला झाला. तों अकस्मात् पाणी भराभर उतरूं लागलें! वसुदेव चकित झाला. झपाझप नदी उतरून तो परतीराला पोहोंचला. वसुदेव ज्याला घेऊन जात होता तें बालक म्हणजेच भगवान् श्रीकृष्ण होय.

अगदीं थोड्या वेळापूर्वीं जन्मलेलें बालक इतक्या भीषण रात्रीं, आईबापापासून तोडून दूर नेण्याचें कारण काय असावें ?

शूरसेन देशावर उग्रसेन नांवाचा वृद्ध, दयाळु, धर्मनिष्ठ राजा राज्य करीत असे. शूरसेन देश म्हणजे वैभवाचें आगर. त्याची राजधानी मथुरा. मथुरेला वळसा घालून पुण्यसलिला यमुना वाहत असे. या रमणीय देशाचा कारभार उग्रसेनानें मोठ्या सुखासमाधानानें चालविला असतां त्याचा दुष्ट पुत्र कंस त्याच्याविरुद्ध उठला. त्यानें उग्रसेनास कैदेंत टाकिलें आणि सिंहासन बळकाविलें. कंसाचा सासरा मगध देशाचा महाबलाढ्य राजा जरासंध हा कंसाचा मुख्य साह्यकर्ता होता.

बापाला कैदेंत टाकूनच कंस थांबला नाहीं. बापाचे जेवढे म्हणून स्नेही-सोबती होते त्यांचाहि त्यांनें छळ आरंभिला. मनुष्यानें अन्यायानें एकादी भयंकर गोष्ट केली कीं त्याचें मन संशयी, भयाकुल, आणि अस्वस्थ होत जातें व आपण केलेल्या पापाचें भूत त्याला ठिकठिकाणीं दिसूं लागतें. कंसाचें असेंच झालें. त्याची चुलत बहिण देवकी ही वसुदेवाची पत्नी. वसुदेवदेवकी हीं उग्रसेनाच्या पक्षाचीं आहेत असें कंसाच्या मनानें घेतलें. याचवेळीं नारदमुनींकडून त्याला असेंहि कळलें कीं देवकीच्या पोटीं जन्मास येणारा आठवा मुलगा हा विष्णूचा अवतार असून त्याच्या हातून आपला वध होणार आहे. मग काय विचारतां ? कंस वसुदेवदेवकीला पाण्यांत पाहूं लागला. त्यानें त्या दोघांस बंदिशाळेंत टाकलें आणि देवकीला मूल झालें कीं तें तत्क्षणीं शिळेवर आपटून मारावयाचें असा क्रम त्या राक्षसानें आरंभिला. अशीं तिचीं सात मुलें त्यानें मारलीं.

आठव्या खेपेस देवकी अकल्पित प्रसूत झाली. त्या देदीप्यमान मुलाच्या हातापायांवर अत्यंत शुभ अशीं चिन्हें होतीं. कंसाला कळण्याचे आंत त्याला कोठेंतरी सुरक्षित ठिकाणीं ठेवून यावें म्हणून वसुदेवानें त्याला उचललें. 'असें सुंदर मूल माझ्यापासून घेऊन जाऊं नका'

म्हणून देवकीनें त्याला काकुळतीनें विनाविलें. पण त्यानें तिची समजूत घालून बालकाला बंदिशाळेबाहेर काढलें. तो यमुनापार होऊन तडक गोकुळांत नंदाकडे गेला. नंदाची पत्नी यशोदा नुकतीच बाळंत होऊन तिला मुलगी झाली होती. वसुदेवानें आपला मुलगा तेथें ठेवून मुलगी उचलली आणि तो गेल्या वाटेनें परत मथुरेंत आला. ही गोष्ट इतक्या सफाईनें व जलदीनें साधली कीं बंदिशाळेच्या प्रचंड दरवाजाजवळ घोरत पडलेल्या पहारेकऱ्यांना त्याची दादहि लागली नाहीं.

दुसरे दिवशीं रात्रीं देवकी प्रसूत झाल्याची बातमी कंसाला कळली. तो धावतच बंदिशाळेकडे आला. भविष्य वर्तविल्याप्रमाणें जन्मलेलें मूल मुलगा असावयास पाहिजे याचीहि त्याला विस्मृति पडली. देवकीच्या विनवण्यांकडे दुर्लक्ष करून त्यानें ती मुलगी उचलली आणि गरगर फिरवून शिळेवर आपटली. त्याच क्षणीं त्या बालिकेच्या शरीरांतून एक दिव्य स्त्री निघून आकाशांत गेली. तिनें दिव्य मुकुट व अलंकार परिधान केले होते. तिचा वर्ण तेजस्वी होता आणि तिच्या मुखावर पूर्णचंद्रासारखें तेज होतें. ती अंतराळीं क्षणभर थांबून कंसाला म्हणाली, ‘ अरे दुष्टा, तुझा शत्रु ज्यावेळीं तुझा वध करील त्यावेळीं तुझें रक्त मी घटघटा पिईन. ’ हें ऐकून कंस भयभीत झाला, त्याला दुःख झालें. त्यानें पुढें वसुदेवदेवकीस बंधमुक्त केलें.

इकडे गोवर्धन पर्वताचे पायथ्याशीं असलेल्या गोकुळांत श्रीकृष्ण वाढू लागला. वसुदेवाची दुसरी पत्नी रोहिणी हिचा मुलगा राम हाहि श्रीकृष्णासमवेतच राहत असे. नंद आणि यशोदा ही दंपती डोळ्यांतील बाहुल्याप्रमाणें त्या दोन मुलांची जपणूक करी. गोकुळ म्हणजे केवळ भूलोकींचा स्वर्ग होता. लतांनीं वेष्टलेले मोठमोठे वृक्ष, उन्हाळ्यांत देखील कृश न होणाऱ्या नद्या, हिरवींगार कुरणें, आणि त्यांवर उगवलेलीं असंख्य रंगीबेरंगी रानफुलें, आणि मधून मधून सुटणारे सुगंधित वारे यांमुळें त्या प्रदेशांत निव्वळ आनंदच भरून राहिला आहे असा

भास होई. निरोगी, आनंदी, मोहक, अशा गौळणी गाणीं म्हणत काम करतांना दिसत. कोठें मंथन चाललेलें असावयाचें, तर कोठें तूप कढत असावयाचें. गाईम्हशींचे हंबारव, त्यांच्या गळ्यांतल्या घण्टांचे मंजुळ ध्वनि, आणि गोपाळांच्या आरोळ्या यांनीं तो प्रदेश सदैव दुमदुमत असे. अशा त्या मनोहर प्रदेशांत निष्पाप, उद्योगी, आनंदी, शूर, साध्या-भोळ्या गोपांत श्रीकृष्णाचे दिवस मोठ्या आनंदांत जाऊं लागले.

श्रीकृष्णाच्या बाललीलांनीं गोपींना नकोनकोसें होऊन जाई. स्वारीनें कधीं कोणाचें दहींदूध चोरून खावें तर कधीं गोपींच्या घागरीच फोडून टाकाव्या. गोपी येऊन यशोदेला गाऱ्हाणीं सांगूं लागल्या कीं कृष्णानें कोठेंतरी पोबारा करावा. एकदां यशोदेनें त्याला दगडाच्या उखळीला बांधलें, पण स्वारी त्या उखळीसह पळून जाऊं लागली. मग यशोदेनें घाबऱ्या घाबऱ्या त्याला सोडून दिलें. दुसऱ्या एका वेळीं चोरून खाल्याचा आळ आला असतां, ‘ हें बघ माझ्या तोंडांत कांहीं नाहीं ’ असें सांगून कृष्णानें यशोदेपुढें आपलें तोंड उघडलें; तों आंत विश्वस्वरूप दिसून ती गर्भगळित झाली. अशा अनेक लीलांनीं श्रीकृष्णानें गोकुळाला वेडावून सोडलें.

वसुदेव देवकीला इतके दिवस कडक बंदोबस्तांत ठेवूनहि आपला वैरी आपल्या हातून निसटला आणि आतां तो गोकुळांत चांगला वाढीला लागला आहे हें कंसाला कळल्यानंतर तो मनांत जळूं लागला. अनेक रूपें धारण करणारे मायावी राक्षस त्यानें गोकुळांत पाठविले आणि त्यानें त्यांच्याकडून श्रीकृष्णाचा अंत करण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ ! श्रीकृष्णानें उलट त्या कपटी नीचांनाच यमसदनास पाठविलें. पूतना नांवाची एक राक्षसी साध्या स्त्रीच्या रूपानें यशोदेकडे आली आणि ममतेचा आव आणून श्रीकृष्णाला प्रेमपान्हा देऊं लागली. आपल्या विषारी दुधानें श्रीकृष्णाला ठार करावें असा तिचा हेतु होता. पण हें कपट ओळखून श्रीकृष्णानें तिचें इतकें शोषण केलें कीं, अल्पावकाशांत

तिचें प्रेत होऊन पडलें. एकदां गाड्याच्या रूपानें आलेल्या राक्षसाचाहि श्रीकृष्णानें असाच धुव्वा उडविला. असे अनेक प्रयत्न फसल्यामुळें आतां ह्या पोराची विल्हेवाट कशी लावावयाची याची कंसाला मोठी चिंता उत्पन्न झाली.

थोडा मोठा झाल्यानंतर गोपालांसमवेत श्रीकृष्ण गाई चारायला जाऊं लागला. या वेळचें त्याचें आयुष्य केवळ फुलपाखरांसारखें होतें. मल्लविद्या शिकावी आणि रानांत खूप मौज करावी एवढाच त्यांस उद्योग असे. सारें शरीर नानारंगांच्या पुष्पपल्लवांनीं सुशोभित करावयाचें आणि आनंदानें नाचावयाचें हा त्या गोपालांचा मोठा आवडता खेळ. त्यांनीं माकडांना वाकुल्या दाखवाव्या, मोरांच्या नाचाची नक्कल करावी, आणि आरोळ्या मारीत रानभर हिंडावें. हिंस्र पशूंबरोबर लढण्याचा प्रसंगच आला तर उपयोगीं पडतील अशीं शस्त्रास्त्रें त्यांच्या जवळ असत. दूरच्या लोकांस इषारा देण्याकरितां शंख किंवा शिंगें ते जवळ बाळगीत. कधीं कधीं श्रीकृष्ण आपली मनोहर मुरली वाजवून साऱ्या चराचराला डोलयाला लावी.

तेथें यमुनानदीस एक भयंकर डोह होता. यांत कालिया नांवाचा एक विषारी सर्प राहत असे. त्याच्या उच्छ्वासानें आणि विषानें यमुनेचें पाणीच काय, पण भोंवतालचें वातावरण देखील दूषित झालें होतें. एकादें जनावर चुकून त्या डोहावर पाणी पिण्यास गेलें, कीं त्याची गठडी वळलीच म्हणून समजावें. अंतराळांतून जाणारीं पाखरें देखील त्या डोहावरून गेलीं कीं पटापट मरून पडत. लोकांना तापदायक झालेल्या ह्या कालसर्पाचा शेवट लावावयाचें श्रीकृष्णानें ठरविलें. तो सोबत्यांची नजर चुकवून कालिया डोहांत शिरला. तथापि तो कालियाडोहांत गेल्याची वार्ता पसरलीच. मग लोकांचा शोक काय विचारावा? सर्व गोकुळाचा प्राण होऊन राहिलेला श्रीकृष्ण आपण होऊन मृत्युमुखांत शिरला; आतां तो कसचा परत येतो, या भीतिप्रद विचारानें सर्व

लोक रडूं लागले. नंदयशोदेसह सर्व गोकुळांतले लोक यमुनातीरीं आले. यशोदा शोकानें मूर्च्छित पडली. श्रीकृष्णाची अत्यंत प्रिय गौळण राधा हिनें सारखा टाहो फोडला. पण लौकरच सर्वांची काळजी दूर झाली. कालियाला ठार करून मोठ्या विजयानंदानें श्रीकृष्ण वर आला. त्या वेळीं त्या गोकुळच्या प्रेमळ जनतेला केवढा आनंद झाला असेल बरें !

पुढें एकदां गोकुळांतल्या लोकांनीं इंद्राच्या पूजेची तयारी चालविली. श्रीकृष्णानें विचारलें, " तुम्ही इंद्राची पूजा कां करणार ? " गोपाल म्हणाले, " तो पाऊस पाडून आमचें कल्याण करतो म्हणून. " यावर श्रीकृष्ण हंसून म्हणाला, " हें तुमचें करणें चूक आहे. अन्न एकाचें खावयाचें आणि सेवा दुसऱ्याची करावयाची अशासारखी ही स्थिति होत आहे. वास्तविक तुम्हीं गोवर्धन पर्वताचें पूजन करावयास पाहिजे. कारण तो मेघांना आकर्षून तुमच्यावर वृष्टि करतो आणि भोंवतालच्या देशाला धनधान्यांनीं समृद्धि आणतो. तसेंच आपल्या गोमातांचेंहि आपण पूजन करावयास नको काय ? " सर्वांना हें कृष्णाचें बोलणें पटलें. जुळविलेली सर्व पूजासामग्री घेऊन गोपाल गोवर्धनपर्वताचे पायथ्याशीं गेले आणि तेथें त्यांनीं गोवर्धनाची व गाईची पूजा आरंभिली. हें पाहून इंद्राला संताप आला. त्या भरांत त्यानें असा कांहीं पावसाचा मारा केला, कीं गोपालांची पांचावर धारण बसली. सर्व मालमत्ता, शेतीवाडी पार धुवून जाणार अशी भीति वाटूं लागली. " कृष्णा, आतां तूंच आमचें रक्षण करणार ! " असा त्यांनीं टाहो फोडला. श्रीकृष्णानें त्यांना धीर दिला आणि सर्व गोवर्धनपर्वतच तळासकट उचलून गोकुळावर धरला ! त्यामुळें माणसें, पशुपक्षी, शेतीवाडी यांना उत्तम निवारा मिळून त्यांचें रक्षण झालें. इंद्रानें सारखी सात दिवस वृष्टि चालविली. पण गोकुळांत काडीचेंहि नुकसान झालें नाहीं. अखेर थकून इंद्र श्रीकृष्णाला शरण आला. श्रीकृष्ण हाच विष्णूचा अवतार आहे याविषयीं कोणाला शंका राहिली नाहीं.

हे व असेच दुसरे चमत्कार जसे जसे कंसाच्या कानावर जात, तसतशी त्याची भीति वाढूं लागली. हा महाबलाढ्य गवळ्याचा पोर एकदां आपणांला चांगलाच हात दाखविणार अशी कंसाला जबरदस्त धास्ती वाटूं लागली. आतां एकदां कायमचा सोक्षमोक्ष लावून टाकावा असें त्यानें ठरविलें. त्यानें मथुरेंत एक मोठा सुशोभित मंडप उभारला. त्यांत मध्यभागीं मल्लयुद्धाचा आखाडा तयार केला. त्यानें आपल्या पदरच्या नामांकित मल्लांना योग्य ती शिकवण देऊन ठेवून श्रीकृष्णास ठार करण्याची योजना केली. इतकें झाल्यानंतर कंसानें श्रीकृष्णास मोठ्या समारंभानें घेऊन येण्याकरितां अक्रूराची गोकुळाकडे रवानगी केली.

चांगलाच अंधार पडला होता. गाईम्हशींचे कळप रानांतून परत आले होते. धार काढण्याची गडबड सुरू होती. इतक्यांत रथाचा खडखडाट ऐकूं आला. 'अहो! नंदाचा पुत्र कृष्ण कोठें राहतो?' 'तो पराक्रमी यशोदाबाळ मला दाखवाल काय?' असें विचारीत अक्रूर गोकुळभर हिंडूं लागला. अखेर एके ठिकाणीं गाईची धार काढीत असलेली श्रीकृष्णाची रम्य मूर्ति त्याच्या दृष्टीस पडली. अक्रूराला प्रेमाचें भरतें आलें. त्यानें रथांतून उडी टाकली आणि धावत जाऊन श्रीकृष्णास आलिंगन दिलें. क्षेमकुशल विचारणें होतांच अक्रूरानें नंदयशोदेला आपल्या येण्याचा हेतु सांगितला. तो ऐकतांच सर्वांच्या अंतःकरणांत शोकाची लाट उसळली. या श्यामसुंदर मूर्तीला कंसाकडे पाठवावयाचें म्हणजे आपण होऊनच मृत्यूच्या दाढेखालीं लोटावयाचें. अशा गोष्टीला कोण तयार होणार? पण कंसाचें निमंत्रण आल्यानंतर न जाणें भ्याडपणाचें दिसतें. यशोदेला रात्रभर झोप आली नाहीं. गोकुळांतले लोक अस्वस्थ होते. श्रीकृष्णाला मथुरेला पाठवायला कोणीच संमति देईना.

अखेर श्रीकृष्णानें सर्वांची समजूत घातली, मातापित्यांचे व वृद्ध जनांचे आशीर्वाद घेतले आणि बलरामासह तो मथुरेला जावयास निघाला. सर्व गोकुळ त्याला पोंचवायला आलें होतें. बायकामुलांच्या

डोळ्यांतून अश्रु वाहत होते. श्रीकृष्णानें सर्वांचें सान्त्वन केलें आणि लौकरच विजयी होऊन परत येईन असें त्यांना आश्वासन दिलें.

मथुरेंत येतांच श्रीकृष्ण व बलराम यांनीं उत्तम वस्त्रें परिधान केलीं. कंसाची दासी कुब्जा ही गंध घेऊन चालली होती तिच्याकडून त्यांनीं गंध घेतलें आणि मोठ्या प्रफुल्ल चेहऱ्यानें ते मंडपाकडे चालूं लागले. त्या तरुण, तेजस्वी, सुंदर, महापराक्रमी बंधूंना पाहण्यास मथुरावासी-यांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या.

प्रथमच कंसानें एक मस्त हत्ती राम-कृष्णावर सोडला; पण दोघांनीं निमिषार्धांत त्याची गठडी वळविली. यामुळें कंसाला भयंकर धक्का बसला. नंतर मुष्टिक आणि चाणूर या दोघां भीमकाय मल्लांना राम व श्रीकृष्ण यांच्यावर चालून जाण्याची कंसानें खूण केली. राम-कृष्ण सावध होतेच. या दोन जोड्यांचें तुंबळ युद्ध सुरू झालें. एवढे राक्षसी मल्ल पण या दोघां कुमारांनीं त्यांचा चेंदामेंदा उडविला. जमलेल्या लोकांनीं 'वाहवा! धन्य! धन्य!' असें म्हणून कुमारांना धन्यवाद दिले. चाणूराला ठार करून श्रीकृष्णानें दंड थोपटतांच कंसाचा जीव ठिका-णावर राहिला नाहीं. भीति, दुःख, संताप, आवेश इ. विकारांची त्याच्या मनांत गर्दी उसळली. रक्ताचे डाग शरीरावर ठिकठिकाणीं उडलेले आणि तोंडावर विजयाचा आनंद बहरलेला, असा श्रीकृष्ण सूर्यासारखा तेजस्वी दिसूं लागला. तो चित्त्यासारखा कंसाचे अंगावर धावून गेला आणि त्यानें कंसाला त्याचे केस धरून जमिनीवर आपटलें. त्याबरोबर आधींच अर्धमेला झालेला तो दुष्ट पुरुष तत्काळ गतप्राण झाला.

नंतर जन्मदात्या मातापित्यास म्हणजे वसुदेवदेवकीस श्रीकृष्ण मोठ्या प्रेमभावानें भेटला. कंसाचा वृद्ध, नीतिमान्, दुःखीकष्टी बाप उग्रसेन हाहि श्रीकृष्णास भेटण्यास आला. "आतां तूंच मथुरेचा राजमुकुट आपल्या शिरावर घाल. मी आतां वनांत निघून जातों." असें उग्र-सेनानें श्रीकृष्णाला सांगितलें. परंतु श्रीकृष्णानें उत्तर दिलें, "महाराज,

आपल्या दुष्ट पुत्राचा वध मीं केला तो केवळ जगांतलें पाप कमी व्हावें याकरितांच. मथुरेच्या राजमुकुटाचा लोभ धरून मीं हें साहसकर्म केलें नाहीं.' मग श्रीकृष्णानें वृद्ध उग्रसेनास गादीवर बसविलें आणि आपल्या जेष्ठ बंधूसह अध्ययनासाठीं तो उज्जयिनी येथें सांदीपनि मुनीच्या आश्रमास गेला.

सांदीपनीच्या आश्रमांत श्रीकृष्णानें निष्ठापूर्वक अध्ययन केलें. इतर विद्यार्थ्यांच्या मेळ्यांत तो अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागे. एकदां सांदीपनि घरीं नव्हते. गुरुपत्नीनें घरांत लाकडें नाहींत असें म्हटलें. लगेच श्रीकृष्ण आपला मित्र सुदामा व बंधु बलराम यांसह लांकडें आणण्यास रानांत गेला. कांहीं वेळानें डोक्यावर मोळ्या घेऊन हे राजपुत्र परत आले. याचवेळीं सांदीपनिहि बाहेरून परत आले. आपल्या घरीं राजपुत्रांनीं डोक्यावरून मोळ्या आणाव्या याचा त्यांना खेद झाला व ते त्याबद्दल गृहिणीला बोलूं लागले. पण श्रीकृष्णानें त्यांना म्हटलें, "महाराज, आपण श्रमी कां होतां ? आपली सेवा करण्याची संधि गुरुपत्नींनें आम्हांला दिली याबद्दल खरोखरच मला आनंद होत आहे." अशा रीतीनें नम्रपणानें, खेळीमेळीनें राहून श्रीकृष्णानें विद्याभ्यास संपविला आणि तो परत मथुरेस आला.

या वेळपर्यंत कंसवधामुळें मोठा कल्लोळ माजून राहिला होता. कंसाचा सासरा सम्राट् जरासंध, तसेंच त्याचे मित्र शिशुपाल, रुक्मी वगैरे बलाढ्य राजे श्रीकृष्णावर खवळले होते. त्यांनीं मथुरेवर चाल केली. मूठभर यादवांना हटवायला कितीसें बल लागणार ? म्हणून ते आपलें प्रचंड सैन्य मागें ठेवून शेलक्या सैन्यानिशीं आले होते. पण श्रीकृष्णानें त्यांना चांगलाच हात दाखविला. अठ्ठावीस दिवस घनघोर युद्ध होऊन जरासंधाचे लोक टेकीला आले. अखेर त्यांनीं माघार घेतली.

पण एकदां डिवचलेला साप मुकाट थोडाच बसणार आहे ! तो केव्हां ना केव्हां तरी पुनः चावा घेणारच. पराभवानें चिडून जाऊन जरासंध

आपलें प्रचंड सैन्य घेऊन पुनः चाल करून आला. यावेळींहि आपण जरासंधाला पळवून लावूं याविषयीं श्रीकृष्णाला खात्री होतीच. परंतु तसें करण्यांत मथुरेचा मात्र धुव्वा उडेल हें तो जाणून होता. जरासंधानें युद्ध उपस्थित केलें तें कांहीं मथुरावासीयांवरील रागानें नव्हे. त्याचा खरा शत्रु श्रीकृष्ण. तेव्हां श्रीकृष्णानें विचार केला कीं, आपणच मथुरा सोडून दूर निघून जावें. तेथें शत्रूची गांठ पडली तर पाहून घेऊं. पण आपल्या एकट्याकरितां साऱ्या मथुरेचा सत्यनाश होणें नको. असा थोर विचार करून तो बलरामासह मथुरा सोडून गेला.

वाटेंत श्रीकृष्णाला एक वृद्ध, तेजःपुंज ऋषि दृष्टीस पडला. तो महा-विक्रमशाली परशुराम होता. त्यानें दर्शविल्याप्रमाणें श्रीकृष्ण गोमंत पर्वतावर राहावयास गेला. हा पर्वत म्हणजे रम्यतेचें केवळ आगरच होता. नीलमण्यांनीं मढविलेलीं शिखरें, रत्नखचित गुहा, हिरवींगार पठारें, स्फटिकाप्रमाणें वाहणारे निर्मळ झरे, नानारंगांचीं भूकमळें, मधुर शब्द करणार पक्षी यांमुळें तो पर्वत नंदनवनाप्रमाणें शोभे. या पर्वतावर रामकृष्ण मोठ्या आनंदानें राहूं लागले.

पण त्यांच्या या वसतीचा सुगावा शत्रूंना लागला. जरासंधानें आपला मोर्चा गोमंत पर्वताकडे वळविला. सर्व पर्वताच्या भोंवतीं वाळलेल्या गवताचे, रानशेण्यांचे, आणि लाकडाचे ढीग रचून त्यानें ते पेटवून दिले. गोमंत पर्वताला अग्नीचें कडें पडलें. हजारों प्राणी जळून तडफडूं लागले. सापांनीं संतापानें उच्छ्वास सोडण्यास सुरवात केली. वाघ-सिंह गुहेंतून आरोळ्या ठोकीत बाहेर पडले आणि गोंधळून इतस्ततः हिंडूं लागले. पर्वताच्या पोटांत असलेल्या धातूंचे रस होऊन ते ज्वालामुखी-प्रमाणें भराभर वाहूं लागले.

तथापि रामकृष्ण मुळींच डगमगले नाहींत. त्यांनीं पर्वताभोंवतीं पड-लेलें अग्नीचें कडें तर ओलांडलेंच. पण त्या कड्यांबाहेर जें जरासंधाचें प्रचंड सैन्य वेढा देऊन बसलें होतें त्याचीहि त्यांनीं एकाद्या झंझावात-

प्रमाणें दाणादाण उडविली आणि ते तडक मथुरेला आले. जरासंधानें रामकृष्णावर चाल केली म्हणून मथुरेचे लोक काळजींत होते. त्यांना ही वीरबंधूंची जोडी पाहून केवढा आनंद झाला असेल बरें! विजयी होऊन रामकृष्ण परत आल्याबद्दल मथुरेंत मोठा उत्सव करण्यांत आला.

आतां श्रीकृष्णानें तारुण्यांत प्रवेश केला होता. मदनाप्रमाणें सुंदर रूप आणि त्यावर पराक्रमाची कांति झळकते आहे असा श्रीकृष्ण किती अप्रतिम दिसत असेल याची कल्पनाच करावी. याचवेळीं विदर्भ देशचा राजा भीष्मक याची लावण्यखनी कन्या रुक्मिणी ही उपवर झाली होती. तिच्या रूपगुणाची कीर्ति साऱ्या भरतखंडांत पसरली असून तिच्याशीं विवाह करण्यास मोठमोठे राजे उत्सुक होते. श्रीकृष्णाचा पराक्रम, त्याचें सौंदर्य, मथुरेचें राज्यपद नाकारण्यांत त्यानें दाखविलेला निःस्वार्थीपणा इ० सर्व गोष्टी रुक्मिणीच्या कानावर गेल्या होत्या. तिचें श्रीकृष्णावर प्रेम जडलें आणि लग्न करावयाचें तर याच पुरुषोत्तमाशीं असा तिनें निश्चय केला.

याच सुमारास भीष्मक राजानें तिचा स्वयंवर आरंभिला. स्वतःला आमंत्रण नसतांहि तरुणांच्या साहसी वृत्तीनें श्रीकृष्ण कुंडिनपुरला गेला. तेथें जरासंध, शिशुपाल, शाल्व हे महाराजे जमले होते. रुक्मिणीचा भाऊ रुक्मी हाहि त्यांच्याच पक्षाचा होता. श्रीकृष्ण आल्याची खबर लागतांच त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. हा उपटसुंभ स्वयंवराच्या मंडपांत येणार असेल तर आम्ही तेथें पाऊलहि ठेवणार नाहीं असा त्यांनीं धाक घातला. श्रीकृष्ण राजा नाहीं अथवा युवराजहि नाहीं; तेव्हां स्वयंवराला येण्याचा हक्कच त्याला पोंचत नाहीं असें या नामधारी राजांचें म्हणणें होतें. ही क्षुल्लक अडचण टळावी म्हणून क्रथकैशिक नांवाच्या सुज्ञ राजानें आपलें राज्य श्रीकृष्णाला अर्पण केलें. पण तेवढ्यानेंहि चांडाळचौकडीचें समाधान झालें नाहीं. अखेर या भांडणांतच स्वयंवर मोडला.

श्रीकृष्ण द्वारकेकडे परत फिरला तों जरासंधानें वाटेंतच त्याला गांठलें. जरासंधाचा मित्र कालयवन यानें दुसऱ्या बाजूनें श्रीकृष्णावर चाल केली. यावेळींहि श्रीकृष्णानें चांगलेंच रणकौशल्य दाखविलें. आपल्यासाठीं मथुरेचा नाश नको म्हणून त्यानें शत्रूंना झुकांडी देऊन गुजराथेंत प्रयाण केलें. तेथें एक राज्य स्थापून द्वारका शहर वसविलें आणि मग शत्रूंना तोंड द्यायला तो परत फिरला. त्यानें कालयवनाला युक्तीनें स्वर्गाची वाट दाखविली आणि मग त्याच्या सैन्याचा फडशा उडविला. या लढाईंत श्रीकृष्णाला अगणित संपत्ति मिळाली. ती घेऊन तो द्वारकेस गेला आणि देशोदेशींचे कारागीर बोलावून थोड्याच अवधींत त्यानें द्वारका हें अत्यंत शोभिवंत शहर बनविलें.

द्वारकेंत येऊन जरा स्थिरस्थावर होत आहे तोंच श्रीकृष्णाला रुक्मिणीकडून गुप्त रीतीनें पत्रिका आली. " हे मदनमनोहरा ! तुझें शौर्य व सौंदर्य यांवर लुब्ध होऊन मीं मनानें तुला वरिलें आहे. परंतु माझा कर्दनकाळ बंधु रुक्मी हा शिशुपालाच्या हातांत माझा हात जबरदस्तीनें देणार आहे. हे त्रैलोक्यनाथा ! तत्पूर्वीं तूं माझें हरण करून ने ! " असा त्या पत्राचा आशय होता. असलें गोड साहस कोणत्या पराक्रमी वीराला अप्रिय असणार ? मोठ्या उत्साहानें श्रीकृष्ण कुंडिनपुराला गेला आणि संकेताप्रमाणें रुक्मिणीला त्यानें तेथून उचललें. वाटेंत रुक्मी आदिकरून राजांनीं त्याचा पाठलाग केला. पण व्यर्थ ! रुक्मीचा सपशेल पराभव होऊन तो श्रीकृष्णाच्या पाशांत सांपडला. पण रुक्मिणीच्या विनंतीला मान देऊन श्रीकृष्णानें त्याला जीवदान दिलें. मग मोठ्या थाटामाटानें त्यानें रुक्मिणीसह द्वारकेंत प्रवेश केला.

पुढें श्रीकृष्णानें अनेक विवाह केले. सत्राजित नांवाच्या यादवाजवळ असलेला स्यमंतक मणि श्रीकृष्णानें चोरला असा त्यावर आळ आला होता. वास्तविक तो नेला होता जांबुवानानें. आपल्यावरील आळ घालविण्याकरितां श्रीकृष्णानें जांबुवानाशीं घनघोर युद्ध करून त्याच्यापासन

तो मणि सत्राजिताला परत मिळवून दिला. श्रीकृष्णाच्या शौर्याची साक्ष जांबुवानास पटली आणि त्याचें निष्कलंक वर्तन सत्राजिताला पूर्ण कळून चुकलें. दोघांनींहि प्रसन्न होऊन आपापल्या मुली श्रीकृष्णास दिल्या. खेरीज अनेक गोपी व राक्षसांच्या जाचांतून सोडविलेल्या सुंदर कुमारिका यांनीं श्रीकृष्णाला भक्तिभावानें वरलें.

यानंतर धामधुमीचा काळ संपलाच म्हणावयास हरकत नाहीं. एकाद्या सुखवस्तु गृहस्थाप्रमाणें आपल्या सुंदर पतिनिष्ठ राण्यांच्या संगतींत श्रीकृष्ण आनंदानें काळ घालवीत होता. मध्यंतरीं द्रुपद राजाच्या निमंत्रणावरून त्याला द्रौपदीस्वयंवराकरितां जावें लागलें. तेथें त्याचे आतेबंधु पांडव यांची भेट झाली. ते लाक्षागृहांत जळून मेले असावेत, अशा समजुतीनें श्रीकृष्णास दुःख झालें होतें. साहजिकच त्यांची भेट झाल्यानें श्रीकृष्णाला परमानंद झाला. अर्जुनानें पण जिंकून द्रौपदीचें पाणिग्रहण केलें व पांच पांडवांची ती पत्नी झाली. सर्वच पांडव श्रीकृष्णाला गुरूचे ठायीं मानीत, पण अर्जुनाचें त्याच्याशीं विशेष सख्य होतें. एकाच आत्म्याचीं तीं दोन रूपें होतीं ! द्रौपदीचीहि श्रीकृष्णाचे ठिकाणीं अत्यंत निष्ठा होती. अर्जुनाचे व आपले संबंध दृढतम करावे म्हणून श्रीकृष्णानें आपली बहीण सुभद्रा त्याला दिली. पांडवांनीं इंद्रप्रस्थ येथें नवीन राज्य स्थापिलें, त्यांत श्रीकृष्णाचें त्यांना अतोनात साह्य झालें. इतकेंच नव्हे, तर ऐश्वर्य आणि लौकिक यांनीं अद्वितीय ठरलेल्या श्रीकृष्णाचें उत्तर आयुष्य केवळ पांडवांच्या हितासाठीं झटण्यांत गेलें.

इंद्रप्रस्थास राज्य स्थापून झाल्यानंतर राजसूय यज्ञ करण्याचें युधिष्ठिराच्या मनानें घेतलें. या कामीं त्यानें श्रीकृष्णाची सल्ला घेतली. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, "तुझी कल्पना मला पसंत आहे. परंतु क्रूर जरासंधाचा वध करून त्यानें बंदींत टाकलेल्या दुर्दैवी राजांची व राजकन्यांची मुक्तता केल्याखेरीज राजसूय यज्ञाला पूर्णता कशी येणार ?"

धर्माला ही गोष्ट पटली. त्यानें भीमार्जुनांना श्रीकृष्णाचे स्वाधीन केलें आणि जरासंधाचा वध करून येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते तिघे जरासंधावर चालून गेले. भीमाचें व जरासंधाचें मल्लयुद्ध झालें. जरा राक्षसीपासून झालेल्या त्या पराक्रमी राक्षसाचें शरीर दोन तुकड्यांचें बनलेलें होतें. त्यामुळें भीमानें त्याला अनेकदां चिरलें तरी आईच्या वरप्रसादानें दोनाहि शकलें जुळून तो जिवंत होई. तेव्हां श्रीकृष्णानें खूण करून दोन शकलें दोन विरुद्ध बाजूंस फेकण्यास भीमाला सांगितलें. भीमानें त्याप्रमाणें करतांच सर्व भरतखंडांत कर्दनकाळ होऊन बसलेला तो वृद्ध राजा अंत पावला. या बातमीनें राजमंडळांत एकच हाहाकार उडाला. पौंड्रक, काशीराजा इ० राजे श्रीकृष्णावर चालून आले. पण श्रीकृष्णापुढें नामोहरम होऊन त्यांना रणांगणांतून पळ काढावा लागला. अशा रीतीनें उन्मत्त क्षत्रियांची रग जिरवून श्रीकृष्ण भीमार्जुनासह इंद्रप्रस्थास परत आला व राजसूय यज्ञास मोठ्या थाटानें आरंभ झाला.

राजसूय यज्ञांत सारेंच अपूर्व होतें. मोठमोठ्या राजांनीं कामें वांटून घेतलीं होतीं. व्यास, याज्ञवल्क्यांसारखे महर्षि होमहवनाचें काम करीत होते. पितामह भीष्म, द्रोणाचार्य इ० कौरवपांडवांचे गुरुवर्य सल्ला देत होते. सर्व कांहीं मोठ्या उत्साहानें पार पडत असतां एक अनिष्ट गोष्ट घडून आलीच. यज्ञांत अग्रपूजा कोणाची करावयाची हा प्रश्न निघाला. अर्थात् पांडवांच्या मनांत श्रीकृष्णाची अग्रपूजा करावयाची होती. धर्मानें तशी आपली इच्छा प्रदर्शित करतांच कोणीं हरकत घेतली नाहीं. भीष्मद्रोणासारख्या माननीय वृद्धांना व व्यास महर्षींनादेखील पराक्रम, लौकिक, विद्वत्ता, ऐश्वर्य या सर्व दृष्टींनीं श्रीकृष्णाचीच अग्रपूजा होणें इष्ट वाटलें. तेव्हां मोठ्या समारंभानें श्रीकृष्णाला उच्चासनावर बसवून धर्म त्याची पूजा करूं लागला. पण श्रीकृष्णाचा हा सन्मान तेथें जमलेल्या शिशुपालशाल्व आदिकरून राजांना रुचला नाहीं. त्यांत शिशुपाल तर भारीच खवळला. वयानें थोर असे अनेक राजे व महर्षि

येथें असतांना एका अडदांड गवळ्याच्या पोराचा हा सन्मान करतां तेव्हां तुमच्या मूर्खपणास काय म्हणावें ? असें त्यानें सर्वांना स्वच्छच सांगितलें. इतकेंच काय, पण तो वाटेल त्यास वाटेल तें बोलूं लागला. प्रकरण विकोपास जाणार असें दिसतांच श्रीकृष्णानें आपलें सुदर्शनचक्र त्याच्यावर सोडून त्याचें डोकें धडापासून वेगळें केलें. हा प्रकार पाहून सर्वांनाच मोठी दहशत बसली. यापुढें मात्र कांहींच विघ्न न येतां समारंभ सुरळीत पार पडला. पांडवांच्या यशाचे व श्रीकृष्णाच्या पराक्रमाचे पवाडे गात गात मंडळी आपापल्या घरीं परतली. पांडवांच्या वैभवाचा हा कळस झालेला पाहून दुर्योधन व धृतराष्ट्राचे इतर पुत्र पांडवांवर मनांतून जळूं लागले आणि पांडवांना सर्व वैभवास पारखे करून देशोधडीला कसें लावावयाचें याबद्दल त्यांच्यांत खलबतें सुरू झालीं.

लौकरच दुर्योधनाचा दुष्ट मामा शकुनि यानें कपटी व्यूह रचून धर्माला द्यूत खेळण्यास बोलाविलें. क्षत्रियांच्या नियमाप्रमाणें हें आमंत्रण नाकारणें धर्माला शक्यच नव्हतें. धर्म द्यूताला गेला. दुर्दैवानें द्यूतांत आपलें राज्य, आपण स्वतः, आपले बंधु, इ० सर्वच तो हरला. अखेर द्रौपदीलाहि त्यानें पणाला लावलें आणि तीहि तो हरला. मग खुनशी कौरवांचा आनंद काय विचारतां ? दुर्योधनाचा भाऊ दुःशासन द्रौपदीच्या महालांत गेला व तिला त्यानें फरफर ओढीत राजसभेंत आणिलें. इतकेंच काय, तिचें वस्त्रहरण करण्यापर्यंत त्या चांडाळाची मजल गेली. भीष्मद्रोणादि वृद्धांचा संताप होत होता; पण ते पडले कौरवांचे नोकर ! पांडवांच्या डोळ्यांतून संतापाचे निखारे उडत होते. पण त्यांना कौरवांनीं द्यूतांत जिंकल्यामुळें ते कौरवांचे दास बनले होते. अखेर द्रौपदीनें श्रीकृष्णाचा धांवा करण्यास सुरवात केली. " देवाधिदेवा, या नीच कौरवांनीं मला असहाय स्थितींत एका वस्त्रानिशीं सभेंत आणिलें आणि आतां हे माझें लज्जाहरण करूं पाहत आहेत. यावेळीं तूंच माझी लाज राखणार. " हा तिचा धावा श्रीकृष्णानें ऐकिला आणि गुप्त रीतीनें तिला

असंख्य वस्त्रें पुरविलीं. अखेर फजीत झालेला दुःशासन मुकाट्यानें जागेवर जाऊन बसला. पुढें धृतराष्ट्रानें प्रसन्न होऊन द्रौपदीला तीन वर दिले. त्यामुळें पांडव स्वतंत्र झाले. पण पुनः द्यूत खेळायचें ठरून त्यांत हरल्यामुळें बारा वर्षें वनवास आणि एक वर्ष अज्ञातवास भोगण्याची त्यांच्यावर पाळी आली.

सत्त्वशीलपणानें पांडवांनीं १३ वर्षें वनवास भोगल्यानंतरहि त्यांचें राज्य त्यांना परत द्यावयाला कौरव तयार होईनात. युद्धाचा मार्ग मोकळा होताच. पण सामोपचारानें मिटलें तर पाहावें म्हणून श्रीकृष्ण शिष्टाई करावयास हस्तिनापुरास गेला. दरबारी पाहुणचार मिळत असतांहि तो नाकारून आपला भक्त धर्मात्मा विदुर याचेकडे श्रीकृष्ण उतरला. "तुमच्या म्हणण्याप्रमाणें हालावनवासांत पांडवांनीं दिवस काढले. आतां त्यांचें राज्य त्यांच्या हातीं देणें हें तुमचें कर्तव्य आहे. ते बिचारे इतके अल्पसंतुष्ट आहेत कीं निव्वळ पांच गांवें दिल्यानेंच त्यांचें समाधान होणार आहे." हें श्रीकृष्णाचें हितकर वचन प्रमत्त कौरवांना पटलें नाहीं. त्यांनीं श्रीकृष्णाची मागणी तर धुडकावून लावलीच, पण त्याला विश्वासघातानें कैद करण्याचाहि घाट घातला. सर्व चराचरांवर सत्ता गाजविणारें तें तेज दुर्योधनासारख्या पामरांना पराभूत करतां येणार होतें काय ? मुळींच नाहीं. श्रीकृष्णानें समेट मोडल्याचें जाहीर केलें आणि भारतीय युद्धाची भेरी फुंकली.

साऱ्या भरतखंडांतले नामांकित योद्धे आपापल्या सैन्यासह दाखल झाले. कोणी पांडवांना मिळाले, कोणीं कौरवांचा पक्ष घेतला. कुरुक्षेत्रावर ही प्रचंड सेना जमा झाली. हत्तींचे चीत्कार, घोड्यांचें खिंकाळणें, वीरांचे जयघोष आणि शस्त्रास्त्रांचे खणखणाट यांनीं दशदिशा गर्जू लागल्या. श्रीकृष्णानें या युद्धांत 'मी शस्त्र हातांत धरणार नाहीं' अशी प्रतिज्ञा केली होती. तो अर्जुनाचें सारथ्य तेवढें करणार होता.

युद्धाचा दिवस उगवला. दोन्ही दळांतील अतिरथ्यांनीं व महारथ्यांनीं

आपापले शंख फुंकले. त्या सर्वांचा मिळून आवाज एवढा मोठा झाला कीं ब्रह्मांड कडाडून मोडतें आहे कीं काय असें वाटलें. भेकड माणसांनीं तर तो प्रचंड आवाज ऐकून डोळे मिटले. श्रीकृष्णानें अर्जुनाचा रथ दोनही सैन्यांच्या मध्यभागीं नेऊन उभा केला. दोनही पक्षांत आपलेच भाऊबंद, आजे, गुरु, शालक इ० सुहृद्मंडळी असलेली पाहून अर्जुनाचें कोमल अंतःकरण द्रवलें. विनाशाच्या उग्र स्वरूपाची कल्पना येतांच त्याच्या अंगाला दरदरून घाम सुटला. हा सर्व परिवार युद्धांत ठार करून आम्ही राज्य मिळविणार ना! यांच्या प्रेतांच्या राशि तुडवीत आम्ही उत्कर्षाचें शिखर गांठणार ना! यांच्या कुलस्त्रियांचें सौभाग्य हिरावून घेऊन आमचें वैभव आम्ही उजळणार ना! असे उदास विचार मनांत येऊन तो खिन्न झाला. " हे श्रीकृष्णा! साऱ्या बांधवांचा नाश करून मिळणारें तें राज्यही मला नको आणि त्यासाठीं हें युद्धहि नको." असें म्हणून धनुष्यबाण टाकून देऊन अर्जुन स्वस्थ बसला.

युद्धाच्या ऐन सुरवातीलाच अर्जुनानें हातपाय गाळले; तेंव्हां मोठी आपत्तिच कोसळली. अर्जुनाचा विषाद म्हणजे पांडवांचा विनाश हें श्रीकृष्णानें जाणलें. अर्जुनाची निराशा घालवून त्याला क्षत्रियाच्या खऱ्या कर्तव्याची जाणीव देण्याकरितां श्रीकृष्णानें त्याला नीति व धर्म यांचा उपदेश केला. या उपदेशाला जगाच्या तत्त्वज्ञानांत तोड नाहीं. अनंत कालपर्यंत त्यांतील सत्य व सौंदर्य अढळ राहील. अलौकिक प्रतिभाशाली माणसांनाहि या उपदेशाची खोली अजून पूर्ण उकललेली नाहीं. इतका तो गहन आहे.

श्रीकृष्ण म्हणालाः—" अर्जुना, ज्याकरितां शोक करूं नये त्या गोष्टीचा तूं शोक करीत आहेस. अरे, शैशव, यौवन, आणि वार्धक्य या अवस्था आत्म्याला नाहींत. तसेंच जन्ममरणापासूनहि तो मुक्त आहे. तो कोणाचाहि अंत करीत नाहीं व त्याचा कोणी अंत करीत नाहीं. तो नित्य, शाश्वत, सर्वव्यापी, अव्यक्त असा आहे. हें जाणनच ज्ञाते पुरुष जन्ममरणाचा शोक करीत नाहींत.

तुझें कर्तव्य फक्त कर्म करण्यापुरतें आहे. फलावर तुझा अधिकार नाहीं. म्हणून आसक्ति न धरतां प्राप्त कर्में तूं करीत जा. प्रीति, भय, राग, द्वेष इ० विकारांचा त्याग केला आणि शुभाशुभांचा व सुख-दुःखाचा हर्षशोक वाटेनासा झाला म्हणजे बुद्धि मोहापासून मुक्त होते आणि मनुष्य स्थितप्रज्ञ होतो.

कर्म न करतां नुसतें स्वस्थ बसणें हें ज्ञात्याला शोभत नाहीं. कारण साधी जीवनयात्रा देखील कर्माशिवाय चालवितां येणार नाहीं. म्हणूनच स्वधर्मानें नियम घालून दिल्याप्रमाणें अनासक्त होऊन आचरण करणें हेंच आपलें पवित्र कर्तव्य आहे. यज्ञ हाच सर्व सृष्टीचा चालक आहे. यासाठीं निःस्वार्थबुद्धीनें विहित कर्में करावींत. हे प्रियसख्या अर्जुना ! हें सर्व जगत् मीं व्यापलेलें आहे. सर्व प्राणिमात्र कल्पांतीं माझ्याच रूपास येऊन मिळतात आणि पुनः सृष्टीच्या आरंभीं मी त्यांना निर्माण करतों. माझी अनन्य भावानें भक्ति करणाऱ्या लोकांचा योगक्षेम मी चालवितों. हे पुण्यवान् पुरुष मरणान्तीं माझ्या दिव्य रूपांत मिसळून जातात. माझी अनन्यभक्ति फार तापदायक आहे असेंहि नाहीं. पत्र, पुष्प, फल, किंवा पाणी देखील कोणीं मला निष्ठापूर्वक अर्पण केलें, कीं मी त्याचें आनंदानें सेवन करतों. अत्यंत दुराचरणी माणसेंसुद्धां भक्तिभावानें माझें पूजन करूं लागलीं तर साधुकोटीला पोंचतात. इतका हा भक्तियोग सुलभ आहे.

मी सर्व प्राणिमात्राच्या हृदयांत असणारा आत्मा आहें. आदित्यांत मी विष्णु आहें, तेजस्वी गोलांत मी सूर्य आहें. नक्षत्रांत चंद्र, वेदांत सामवेद, मुनींमध्यें व्यास, जलाशयांत सागर, विद्यांत अध्यात्म-विद्या आणि शस्त्रधारीपुरुषांत राम मी आहें. पण हें कशाला ! जी जी वस्तु, विभूति, ऐश्वर्य, आणि उत्साह यांनीं युक्त आहे ती माझ्या तेजापासून निर्माण झाली आहे; इतकेंच नव्हे, तर सर्व जग म्हणजेंच माझ्या तेजाचा एक अंश आहे.

जो कोणाचा द्वेष करीत नाहीं, जो करुणेचा समुद्र आहे, जो ममतारहित व निगर्वी आहे, सुखदुःख–शीत–उष्ण, हीं ज्याला सारखींच वाटतात, जो कार्यदक्ष असून तटस्थ आहे, शत्रुमित्रांच्या ठिकाणीं जो समभावानें वागतो तो मौनधारी, एकांतप्रिय, आणि स्थिरबुद्धि भक्त मला प्रिय वाटतो.

आसक्ति आणि समद्वेष सोडून केलेलें जें कर्म तेंच सात्त्विक कर्म होय. हें कर्म करणें म्हणजेच धर्माचरण. अर्जुना, मनानें सर्व कर्में माझ्या ठायीं अर्पण करून, माझ्या ठिकाणीं परायण राहून, विवेकबुद्धीचा आश्रय घेऊन माझ्यामध्यें चित्त गुंतीव. म्हणजे तूं सर्व अडचणींचे डोंगर उल्लंघून जाशील. ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयांत वास करतो. हे अर्जुना, सर्वभावेंकरून तूं त्याला शरण जा. सर्व धर्मांचा त्याग करून मला शरण ये. मी तुझी सर्व पापांपासून मुक्तता करीन."

नीतिज्ञानाचा हा थोर उपदेश तर श्रीकृष्णानें अर्जुनाला केलाच, पण त्याच्या विनंतीवरून आपलें दिव्य विश्वरूप श्रीकृष्णानें त्याला दाखविलें. अर्जुनाला दिव्यदृष्टि देऊन त्या महायोगेश्वरानें–श्रीकृष्णानें–आपलें दिव्य रूप दाखविलें. आकाशांत एकाच वेळीं हजार सूर्य उगवले असतां जशी प्रभा फाकेल तशी त्यावेळीं जगतांत पसरली. त्या अद्भुत रूपाला हजारो डोळे, हात, तोंड, पाय होते. ब्रह्मदेवासह सर्व देव, दानव, यक्ष, नाग, महर्षि त्या रूपाची प्रार्थना करतांना दिसत होते. त्याच्या तोंडांतील भयंकर दाढांत सापडून भीष्मद्रोणादि योद्धे, धृतराष्ट्राचे पुत्र यांचा चुराडा होत आहे असें दिसत होतें. अर्जुनानें थरथर कापत विचारलें, "देवा, हें तुझें अलौकिक रूप पाहून मी भयभीत झालों आहें. आपण कोण आहां तें मला सांगा." तेव्हां विश्वरूप धारण केलेला श्रीकृष्ण म्हणाला, "अर्जुना, तिन्ही लोकांचा क्षय करावयास निघालेला काळ तो मी आहें. कुरुक्षेत्रांत जमलेले सर्व योद्धे मीं आधींच मारले आहेत. तूं फक्त निमित्तमात्र हो." मग अर्जुनाला

आश्वासन देऊन श्रीकृष्णानें तें दिव्य रूप टाकलें आणि पूर्ववत् मनुष्य-रूप धारण केलें.

श्रीकृष्णाचें उपदेशामृत प्राशून आणि त्याच्या दिव्यरूपाचें दर्शन घेऊन अर्जुन प्रसन्नचित्त झाला. त्याचा विषाद कोठल्या कोठें मावळला. तो अफाट उत्साहानें लढूं ला ला. श्रीकृष्ण प्रत्यक्ष लढत नव्हता, तरी पांडवांना त्याचा केवढा तरी उपयोग होई. सर्व विश्वांतील शक्तिच आपणाकडे आहे असें पांडवांना वाटे आणि त्यांची ती भाविक समजूत चुकीची होती का?

अजिंक्य द्रोणांचा पराभव होईना. तेव्हां श्रीकृष्णानें सांगितलें कीं, "या वृद्धानें हातांतलें शस्त्र खालीं ठेविल्याशिवाय याचा वध करणें अशक्य आहे. म्हणून 'अश्वत्थामा मेला' असें धर्मानें त्यांना सांगावें. म्हणजे पुत्रशोकानें विव्हल होऊन हा ब्राह्मणवीर शस्त्रत्याग करील." धर्मराजानें तसें करतांच इष्ट तें घडून आलें आणि धृष्टद्युम्नानें द्रोणांचा शिरश्छेद केला.

रणांत मृत्युमुखीं पडलेल्या अभिमन्यूला लत्ताप्रहार करणाऱ्या जयद्रथाचा सूर्यास्ताचे आंत वध करण्याची प्रतिज्ञा अर्जुनानें केली. पण कौरववीरांच्या पहाऱ्यांत असलेल्या जयद्रथाचा थांग लागेना. तेव्हां सूर्यावर सुदर्शन धरून श्रीकृष्णानें अंधार पाडला आणि कौरवांत गाफिलगिरी उत्पन्न केली आणि अशा रीतीनें जयद्रथाला अर्जुनापुढें आणवून आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्याची संधि त्यानें अर्जुनाला दिली.

पितृवधानें खवळून जाऊन अश्वत्थाम्यानें भयंकर अस्त्रें पांडवांवर सोडलीं. इतकच काय पण पांडवस्त्रियांच्या गर्भावरहि त्या दुरात्म्यानें अखेरचें अस्त्र वळविलें. तेव्हां श्रीकृष्णानें उत्तरेच्या ( अभिमन्यूच्या पत्नीच्या ) पोटांत वाढत असलेल्या परीक्षिताचें आपल्या पुण्याईनें संरक्षण केलें आणि पांडवांचा वंशवेल शाबूत ठेविला.

अशा अनेक तऱ्हेनें श्रीकृष्णानें पांडवांना परोपरीनें साह्य केलें. एक

बलाढ्य क्षत्रियपिढी १८ दिवसांत नामशेष होऊन हें महायुद्ध संपलें. अखेर पांडवांना त्यानें राज्यावर बसविलें व शरपंजरीं पडलेल्या भीष्मांना अखेरचें दर्शन दिलें. मग अश्वमेधयज्ञ आटोपून श्रीकृष्ण द्वारकेस परत आला.

यानंतर पुनः शांततेचा काळ सुरू झाला. यावेळीं श्रीकृष्णाचें वैभव खूपच वाढलें होतें. त्याचें राज्य संपन्न होतें. भाऊबंद, संपत्ति, संतति, कीर्ति, ज्ञान यांपैकीं त्याला कशाचीच उणीव नव्हती. यावेळीं त्याचा दरिद्री बालमित्र सुदामा त्याला भेटावयाला आला. त्याचा प्रेमभरानें सत्कार करून श्रीकृष्णानें त्याचें दारिद्र्य नाहींसें केलें. अशाच रीतीनें ऋषि, ब्राह्मण इ० चा सन्मान करीत आणि अनाथपंगूचें दुःख निवारण करीत श्रीकृष्ण आपलें राज्य मोठ्या चातुर्यानें चालवीत होता.

अखेर यादवांत बंडाळी माजली. कांहीं क्षुल्लक कारणावरून सर्व यादव एकमेकांत भांडूं लागले. प्रकरण विकोपास जाऊन घोर युद्ध झालें आणि त्यांत बहुतेक सर्व यादव कामास येऊन एक अत्यंत विक्रमशाली कुल लयाला गेलें. आतां आपलें अवतारकार्य संपलें असें श्रीकृष्णास वाटलें. अर्जुनाप्रमाणेंच आपला दुसरा अनन्यभक्त उद्धव याला त्यानें राहिलेलें सर्व ज्ञान निवेदन केलें. यादवांचा संहार होतांच त्यानें अरण्याची वाट धरली. एका वृक्षाखालीं चिंतन करीत तो स्वस्थ बसला. इतक्यांत एका पारध्यानें चुकून त्याच्या पायालाच बाण मारला. हाच आपला निर्वाणकाळ असें श्रीकृष्णानें ठरविलें. त्याच्या शरीरांतून दिव्य तेज बाहेर पडून तें ब्रह्मांड व्यापूं लागलें. अखेर आपला लौकिक देह भूतलावर टाकून हा पराक्रमी वीर, प्रेमळ वल्लभ, साह्यकर्ता बंधु, थोर मुत्सद्दी, आणि हिंदी तत्त्वज्ञान्यांचा मुकुटमणि अपल्या परम रूपांत विलीन झाला.

---

# गौतमबुद्ध.

इसवी सनापूर्वी पांचव्या आणि सहाव्या शतकांतला काळ तो. त्यावेळीं हिंदुस्थानावर एका सार्वभौम राजाचा असा अंमल नव्हता. एवढा प्रचंड देश शेकडों राज्यांत विभागलेला असून प्रत्येक राज्याची मालकी एकेका क्षत्रियकुलाकडे असे. सर्वांच्या वर कोणी प्रबळ शास्ता नसला तरी हे छोटे राजेमहाराजे आपआपसांत कांहीं फारसे झुंजत नसत. उलट निकटवर्ती देशांची प्रवृत्ति एकमेकांचा सलोखा वाढविण्याकडेच बहुधा असे. व्यापाऱ्यांची देवघेव आणि राजघराण्यांतील विवाहसंबंध या बंधनांनीं प्रायः दोन राज्यांत दुवे जोडले जावयाचे. अशी वृत्ति असल्यामुळें निसर्गतः संपन्न असलेल्या या भरतभूमींत शांततेचें साम्राज्य नांदत होतें. याच समृद्ध काळांत बुद्धदेव पृथ्वीवर अवतीर्ण झाला.

बुद्धजन्माचे सुमारास हिरव्यागार रानावर सोनेरी छटा झळकूं लागली.

साऱ्या लोकांना ऐकूं जाईल असा स्पष्ट पण मंद ध्वनि निघाला, " अरे, पुनर्जन्मासाठीं उत्सुक असलेल्या आत्म्यांनो! अरे, नश्वर जीवांनो, उठा, उत्साह धरा. बुद्ध जन्माला येत आहे." इकडे कपिलवस्तु येथें शुद्धोदन राजाची राणी मायादेवी प्रसूत होऊन बालकरूपानें बुद्धानें जन्म घेतला. त्यावेळीं त्या बालकावर स्वर्गीय उष्णोदकाची व शीतोदकाची वृष्टि झाली. लतांनीं पुष्पें समर्पण केलीं आणि एकंदर निसर्गातच आनंदोत्सव सुरू झाला.

शुद्धोदनाचे नगरींत तर काय गुढ्यातोरणें, मंगलवाद्यें, शांतिपाठ, गायननर्तन यांची एकच गर्दी झाली. राजाला अलौकिक व सुलक्षणी पुत्र झाल्याचें ऐकून भाविक प्रजाजनांचा आनंद गगनांत मावेना.

हा उत्सव चालू असतांच असित नांवाचा एक वृद्ध तपस्वी राजवाड्यांत आला. तो थेट राणी मायादेवीपर्यंत गेला. राजानें त्याचा योग्य सत्कार केल्यानंतर त्यानें बालबुद्धाला स्पर्श करून वंदन केलें आणि सद्गदित होऊन तो म्हणाला, " हे बालका, तूं प्रत्यक्ष भगवान् बुद्ध अवतरला आहेस. तुला वंदन असो. तूं सत्यधर्माचा प्रसार करशील. मात्र मृत्यूच्या द्वारीं टेकलेल्या मला, तुझा दिग्विजय पाहायला मिळणार नाहीं." नंतर राजाकडे वळून तो म्हणाला, " राजा, मानवतेच्या वृक्षाला आलेलें हें उत्कृष्ट पुष्प आहे. याच्या ज्ञानसुगंधानें थोड्याच दिवसांत दशदिशा भरून जातील. पण या मुलाच्या सातव्या दिवशीं मायादेवी अंत पावेल." इतकें सांगून तो तपस्वी अंतर्धान पावला. एका अद्वितीय मुलाला जन्म दिल्यामुळें कृतार्थ झालेल्या मायाराणीनें मोठ्या आनंदानें प्राणोत्क्रमण केलें. पुढें राजाची दुसरी राणी महाप्रजावती-गोतमी हिनें बुद्धाचा सांभाळ केला.

राजपुत्र सिद्धार्थ (गौतमबुद्ध) याला लहान वयांतच शिक्षण देण्यांत येऊं लागलें. पण त्याच्या अप्रतिम बुद्धीपुढें सर्व गुरु भांबावून जात. बुद्धाला एक धडा द्यावा तोंच त्यापुढील धडा तो तोंडानें खडाखड

म्हणून दाखवी. न्यायतर्कादि वादग्रस्त विषयांत देखील तो अल्पवयांतच असामान्य पांडित्य दाखवूं लागला. अखेर त्याच्या सर्व गुरूंनीं त्याच्यापुढें हात टेकले. तथापि निसर्गतः ज्ञानसंपन्न असूनही बुद्धानें आपल्या गुरूंचा अवमान असा केव्हांच केला नाहीं. तो सर्वांशीं विनयानें वागे, त्यांच्या आज्ञा पाळी, इतकेंच नव्हे तर सर्वसामान्य शिष्याप्रमाणें गुरूंच्या सेवेंत तत्पर असे. लौकरच लौकिकदृष्ट्याहि तो सर्व विषयांत पारंगत झाला. तो धनुर्विद्या शिकला आणि त्याची गणना भारतवर्षांतील तत्कालीन उमद्या राजपुत्रांत होऊं लागली.

एकदा बुद्ध बागेंत हिंडत असतां त्याच्या समोर एक पक्षी बाणानें घायाळ होऊन पडलेला त्यानें पाहिला. त्यानें झटकन् त्या पक्ष्याला उचललें आणि त्याच्या अंगांतून बाण काढून तो त्याची शुश्रूषा करूं लागला. इतक्यांत बुद्धाच्या चुलत भावाचा एक सेवक तेथें आला आणि बुद्धाला म्हणाला, “ महाराज, माझे मालक राजपुत्र देवव्रत यांनीं या पक्ष्याला अचूक शरसंधानानें घायाळ केलें आहे; तर तो पक्षी मजकडे द्या. तो घेऊन येण्याची त्यांनीं मला आज्ञा केली आहे. ” बुद्ध पक्ष्याला कुरवाळीत म्हणाला, “ पक्षी बाणानें मेला असता तर कदाचित् मीं त्याला तुझ्या हवालीं केलें असतें. पण तो अद्याप जिवंत आहे. निरपराधी प्राण्यांना कां उगीच मारावयाचें? शिवाय मीं याला जीवदान दिलें आहे. ” यावर बराच वाद माजला. देवव्रतानें पक्षी घेऊन जाण्याचा हट्ट धरला आणि बुद्ध तर कांहीं केल्या पक्षी द्यावयास तयार होईना. अखेर एक साधुपुरुष त्या ठिकाणीं अकस्मात् प्रकट झाला. त्यानें दोघांचें म्हणणें ऐकून घेऊन शांतपणें सांगितलें, “ बुद्धानें पक्ष्याचा जीव वांचविला तेव्हां त्याचाच हक्क पक्ष्यावर अधिक आहे. कारण जीवदान देणारा हा जीव घेणाऱ्यापेक्षां केव्हांहि श्रेष्ठच. म्हणून देवव्रतानें हा पक्षी बुद्धाला द्यावा. ” इतकें बोलून तो साधु दृष्टिआड झाला.

या पक्ष्याचा रक्तबंबाळ देह पाहून बुद्धाचें हृदय द्रवलें. तत्पूर्वीं त्याला

दुःख म्हणजे काय याची कल्पनाच नव्हती. त्याच्या प्रासादांत करुण सूर शिरला नव्हता अथवा हृदयद्रावक दृश्य असें त्याला दिसलें नव्हतें. लौकरच एका प्रसंगानें दुःखसागरांत डुंबत राहिलेल्या जगाचें दर्शन त्याला घडलें आणि दयेनें ओथंबणारें त्याचें अंतःकरण तत्त्वचिंतनाकडे झुकूं लागलें. तो प्रसंग असा—

एके दिवशीं शुद्धोदन राजा बुद्धाला म्हणाला, " बाळा, वसंतऋतूनें सर्व सृष्टीवर सौंदर्याचा साज चढविला आहे. आपल्या संपन्न राज्याची शोभा पाहण्यास आपण जाऊं या. " बुद्ध लगेच तयार झाला. मग पितापुत्र आपापल्या घोड्यावर स्वार होऊन व निवडक सेवक बरोबर घेऊन निघाले.

वाटेनें सर्व सृष्टि जणूं काय त्यांच्या स्वागताकरितां सज्जच होऊन बसली होती. हिरव्यागार कुरणांतून ओहळ वाहत होते. रानाकडे तसेच नानातऱ्हेचे पक्षी आपल्या अनंत सुरांनीं रानांतलें वातावरण भरून टाकीत होते. तऱ्हतऱ्हेचीं फुलपाखरें तर इतकीं होतीं कीं एक रम्य फुलांची सृष्टिच अधांतरीं उडत आहे असें वाटे. पण बुद्धाचें चिंतन-शील मन या अप्रतिम फुलोऱ्याच्या बाह्यांगावरच लुब्ध होऊन राहिलें नाहीं. या फुलांच्या खालीं आणि आजूबाजूस जीं कांटेरी जाळीं पसरलीं होतीं त्यांकडे दृष्टि जाऊन बुद्ध गंभीर झाला.

बाजूच्या शेतांत एक शेतकरी आपल्या बैलाच्या पाठीवर कडाकड आसूड उडवून नांगर हाकीत होता. बिचाऱ्या बैलाला आपल्या धन्याचा असह्य छळ सोसून मुकाट काम करावें लागत होतें. हें पाहून बुद्धाला खेद झाला. नंतर त्यानें पलीकडे जरा निरखून पाहिलें तों एक सरडा मुंग्यांना पटापट मारून खात होता. इतक्यांत शेजारच्या वारुळांतून एक साप फों फों करीत तेथें आला आणि त्यानें क्षणार्धांत त्या सर-ड्याची चटणी उडविली. पण सापाचींहि शंभर वर्षें भरलीं होतीं. कारण तितक्यांत एक प्रचंड घार अंतराळांतून झपाट्यानें खालीं उत-

रली आणि तिनें सापाला गट्ट केलें. तोंच एका पारध्यानें मारलेला बाण सूं सूं करीत आला आणि घारीच्या शरीरांत शिरला. त्या क्षणीं ती रक्तबंबाळ होऊन खालीं पडली.

हा प्रकार इतक्या थोड्या अवधींत घडला कीं सामान्य माणसाच्या तो लक्षांतहि न येता. पण बुद्धाला जीवनकलहाचें क्रूर स्वरूप एवढ्याच देखाव्यावरून दिसून आलें. तो खेदानें उद्गारला, "अरेरे, जग हें असेंच आहेना! सबलांनीं दुर्बलांस छळावें आणि आपली चैन चालवावी हेंच साऱ्या व्यवहाराचें तत्त्व आहे तर!" तो सचिंत होऊन एका वृक्षाखालीं बसला. इतक्यांत पांच देवपुत्र अंतराळांतून चालले होते. त्यांतील एकाची नजर बुद्धाकडे गेली. तो म्हणाला, "पहा, जगांतील दुःखानें हृदय द्रवून हा जगाचा उद्धारक सचिंत बसला आहे. हा या वैराग्यांतूनच परमपदाकडे जाईल आणि जगाचें तारण करील." इतकें बोलून त्यांनीं बुद्धास वंदन केलें आणि ही आनंदाची वार्ता परमेश्वरास कळविण्याकरितां ते निघून गेले.

या वेळीं जें निराशेचें पटल बुद्धाच्या अंतःकरणावर चढलें तें कांहीं केल्या हलेना. वास्तविक त्याच्या प्रासादांत कोणत्याहि गोष्टीची कमतरता नव्हती. दासदासी, विलासाचीं साधनें, वैभव, प्रेमळ व संपत्तिमान पिता, आणि पतीच्या प्रसन्नतेसाठीं सर्वकाळ तत्पर असलेली तरुण, गुणवती, विनयशालिनी, रतीप्रमाणें सौंदर्यवती पत्नी यशोधरा. इहलोकींच्या वैभवाला आतां कोणता उणेपणा असणार? पण वसंतश्रीच्या उदरांत दिसलेला तो तीव्र जीवनकलह पाहिल्यानंतर बुद्धाला जो उदासीनपणा आला तो कांहीं केल्या हटेना.

पुढें एकदां राज्याची शोभा पाहण्याकरितां बुद्ध निघाला. पताका तोरणांनीं सारे रस्ते शृंगारले होते. मंगलवाद्यें वाजत होतीं. मोठमोठे नजराणे घेऊन पौरजन भेटीला येत होते. पण या उत्सवांत त्याचें मन रमेना. एक वृद्ध, पंगु, वाकलेला कष्टी भिकारी रस्त्याच्या कडेला बसलेला होता.

कांहीं आंधळेपांगळे दान मिळेल या आशेनें देवाच्या नांवानें करुण किंकाळ्या मारीत होते. बुद्ध हा देखावा पाहूं लागला. मानवी शरीर किती पराधीन आहे! आणखी पन्नास साठ वर्षांनीं आज सुरम्य दिसणारें माझें शरीर या म्हाताऱ्याप्रमाणेंच वाकणारना? मग या नश्वर सौंदर्याकरितां मोठाल्या उपाधि कशाला लावून घ्यावयाच्या? हाय रे! कष्टी जगता! जन्ममरणाच्या जाळ्यांत आमचें हें शरीर सापडलें आहे. सुखाचा अंत दुःखांत, तारुण्याचा शेवट वार्धक्यांत, प्रेमाची परिणति नुकसानींत व्हावयाची. हीं दुःखीकष्टी माणसें देवाच्या नांवानें करुणा भाकीत आहेत, तरी यांचें दुःख कायमच आहे. कदाचित् देवालाच साह्याची अपेक्षा असेल. ह्या हीनदीनांची दुःस्थिति सुधारतां येत नसेल तर त्याच्यांत देवपण तरी कशाचें?" अशा उदास, नास्तिक, गंभीर पण भूतदयेच्या उद्रेकांतून निघालेल्या विचारांनीं बुद्धाचें मस्तक भ्रमण करूं लागलें. त्यानें एकदम सारथ्याला सांगितलें, "चल, रथ परत राजवाड्याकडे घेऊन चल."

याच वेळीं शुद्धोधन राजाला दुःस्वप्नांनीं ग्रासलें होतें. त्याला अनेक भयसूचक स्वप्नें पडत. अंतराळांत डोलणारा राजध्वज कलता झाला आहे असें एकदां दिसावें तर कधीं दहा ऐरावतांना ठार केल्याचें दृश्य नजरेस यावें. शुद्धोदनानें एका जाणत्या माणसाला बोलावून त्याला या स्वप्नांचें फल विचारलें. तो म्हणाला, "महाराज, दर्शनीं अशुभ वाटणारीं हीं चिन्हें वास्तविक मंगलकारक आहेत. त्यांत मोठा गूढार्थ भरला आहे. युवराज सिद्धार्थ राज्यवैभवाला तृणवत् लेखून ज्ञानमार्गानें जगावर प्रभुत्व मिळवितील हें पहिल्या स्वप्नानें सूचित केलें आहे. तसेंच गारद झालेले दहा हत्ती म्हणजे जगांतील दहा दार्शनिक होत. बुद्धिवादांत सिद्धार्थ त्यांना नामोहरम करणार आहे." हें ऐकून शुद्धोदनाचें कांहींसें समाधान झालें. पण बुद्धाच्या निराशेविषयींची हुरहुर त्याच्या मनांतून जाईना."

जगाचें भीषण स्वरूप पाहिल्यानंतर बुद्धानें राज्यत्याग करण्याचें जवळ

जवळ कायम केलें होतें. आपल्या रूपगुणवती कांतेला त्यानें हा आपला निश्चय सांगितला तेव्हां तिचें दुःख काय विचारावें? तिच्या नेत्रांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या, "महाराज, असलें गजान्तलक्ष्मीचें वैभव सोडून वनवास पत्करण्यास आपण कां हो सिद्ध होतां? या अभागिनीची दया आपणांला येत नाहीं काय?" अशी तिनें त्याची करुणा भाकली. पण बुद्धानें तिला प्रेमानें कुरवाळीत परोपरीनें तिची समजूत घातली. तथापि आपला पति आपणाला सोडून जाणार हा भीतिप्रद विचार तिला असह्य वाटूं लागला.

यशोधरेनें याच सुमारास एका पुत्ररत्नास जन्म दिला. सिद्धार्थ एका जंबुवृक्षाखालीं सचिंत होऊन बसला असतां एका भृत्यानें त्याला पुत्ररत्न झाल्याची आनंददायक वार्ता कळविली. एवढ्यांत राजधानींत कडाख्याचा उत्सव सुरू झाला होता. ते हर्षनिनाद ऐकून बुद्ध अधिकच खिन्न झाला. संसारांत एक नवीनच पाश निर्माण झाला, असें वाटून संसारत्याग करण्याची शक्य तेवढी जलदी करण्याचें त्यानें ठरविलें.

मग तो राजवाड्यांत यशोधरेच्या महालांत आला. प्रसूतिवेदनेमुळें थकून गेल्यामुळें तिला या सुमारास झोप लागली होती. सुगंधित तेलानें जळणार दिवे मंद झाले असून त्यांचा कोमल प्रकाश तिच्या क्षीण पावलेल्या पण आनंद व सौंदर्य यांनीं झळकणाऱ्या तोंडावर पडला होता. ती झोपेंतहि सस्मित दिसत होती. तिच्याजवळ नुकतेंच जन्मलेलें बालक झोपीं गेलें होतें. तो देखावा इतका वत्सल व चित्ताकर्षक होता कीं बुद्ध क्षणभर मुग्धच होऊन गेला. यशोधरेच्या सुंदर वदनाचें चुंबन घ्यावें आणि पुत्रास उचलून त्याचें कौतुक करावें असें त्याच्या मनांत हजारदां येई; पण पुनःपुनः विवेकानें तो आपला मोह मागें सारी. अखेर ठाम निर्धार करून तो म्हणाला, "माझ्या वैराग्याचा हाच समय आहे. कठोर वज्र, कुऱ्हाडीचे घाव, बाण व दगड यांची वृष्टि, विजेच्या सामर्थ्यानें वितळलेलें लोखंड, आणि शैलशिखरें हीं सर्व जरी माझ्या डोक्यावर

कोसळलीं तरी संसारत्यागाचा हा निश्चय कदापि ढळणार नाहीं. हीन, दीन, पंगु, पीडित अशा जगाच्या किंकाळ्या मला ऐकूं येत आहेत. हीं राजवस्त्रें व वैभव सोडून संन्याशाचीं वस्त्रें आणि दारिद्र्य यांचाच अंगीकार मला केला पाहिजे " असें म्हणून तो निघाला आणि त्यानें सारथ्याला रथ जुंपण्यास सांगितलें.

नंतर रथांत बसून त्यानें राज्याची हद्द ओलांडली. बुद्ध निघाला ती वेळ जगाला परममंगल अशी होती. कारण त्याच्या वैराग्यांतच जगाच्या चिरंतन शांतीचीं बीजें पेरलीं गेलीं. असो. त्यानें राज्याबाहेर येतांच आपले लांबसडक केस कापून टाकले, राजवस्त्रें टाकून दिलीं, आणि संन्याशाचीं वस्त्रें परिधान करून तो सारथ्यास म्हणाला, " तूं आतां परत जा. " सारथ्यानें अनेकदां विनविलें कीं, " महाराज, अशी विरक्ति न धरतां राजधानीस परत चलावें. आपल्या अशा करण्यानें आपलीं सर्व माणसें दु:खीकष्टी होतील. " तेव्हां बुद्ध हंसून म्हणाला, " अरे, सर्व जगाचेंच दुःख नाहींसें करण्याचा मार्ग मीं शोधून काढीत आहें. तेव्हां त्यांत त्यांच्याहि दुःखाचें निरसन होईलच. कारण तीं तरी काय जगावेगळीं आहेत! " सारथ्याचा नाइलाज झाला आणि तो मुकाट्यानें रथ घेऊन राजधानीस परतला.

पुढें बुद्ध फिरत फिरत वैशाली नगरींत येऊन पोचला. उपरति झाली, मुमुक्षुत्व आलें हें खरें, पण आपणाला कोणींतरी सद्गुरु मिळविलाच पाहिजे याची जाणीव बुद्धाला होऊं लागली. इतक्यांत त्याला असें कळलें कीं, याच नगरींत कोणी एक आलार कालम नांवाचा विरक्त ब्राह्मण विषयवासनेच्या निरसनाचें व सर्वसंगपरित्यागाचें तत्त्व आचरीत असून लोकांनाहि तसाच उपदेश करतो; हाच मुक्तीचा मार्ग होय अशी त्याची समजूत आहे. बुद्धाला हें तत्त्वज्ञान जिव्हाळ्याचें वाटलें. बुद्ध तडक त्या ब्राह्मणाकडे गेला आणि त्यानें त्या ब्राह्मणाचें शिष्यत्व पत्करलें. कांहीं दिवस गुरूचे घरीं निवास केल्यानंतर बुद्धाला अतृप्त-

ताच वाटूं लागली. आपण ज्या अंतिम सत्याचा व शांतीचा शोध करीत आहों ती एवढ्यानें मिळणार नाहीं असें बुद्धाला वाटलें. म्हणून त्यानें गुरुगृहास रामराम ठोकला आणि तो संचार करूं लागला.

फिरतां फिरतां तो पांडवपर्वताच्या संनिध पोंचला. पांडवपर्वताच्या पायथ्याशीं राहावें आणि राजगृहनगरास भिक्षेकरितां जावें असा त्याचा क्रम असे. अभिजात सौंदर्याच्या कांतीनें झळकणाऱ्या या पुरुषाकडे ग्रामवासीयांनीं मोठ्या आदरानें व कुतूहलानें पहावें पण त्याची विचारपूस करण्याचा धीर मात्र कोणास होऊं नये. पुढें कोणी एक तेजस्वी पुरुष आपल्या नगरीच्या आसमंतभागीं संचार करीत असतो, अशी बातमी बिंबिसार राजाचे कानावर गेली; तेव्हां बिंबिसार राजा बुद्धाचे दर्शनास आला. 'आपण कोण? कोठले? ऐन तारुण्यांत श्रमण होण्याची बुद्धि आपणांस कां झाली?' इ० प्रश्न बिंबिसार राजानें बुद्धाला विचारले. तेव्हां बुद्धानें आपला सर्व वृत्तांत त्याला निवेदन केला. तो ऐकून बिंबिसार राजाला फार आश्चर्य वाटलें. तो नम्रपणें बुद्धाला म्हणाला, "आपले हातीं भिक्षापात्र शोभत नाहीं. आपण राजदंडच धारण करावा. सत्ता आणि धन ह्या गोष्टी उपेक्षणीय नाहींत. विचारपूर्वक त्यांचा उपयोग मात्र केला पाहिजे. या दोनही गोष्टी आपणासारख्या उदारचरिताच्या पायावर समर्पण करण्यास मी तयार आहें." हें ऐकून बुद्धानें स्मित केलें आणि म्हटलें, "राजा, तूं मोठ्या आदरानें देऊं केलेल्या गोष्टींची मला उणीव का होती? पण मींच स्वेच्छेनें त्यांचा त्याग केला. संपत्ति चंचल आहे. तृष्णेला अंत नाहीं. तिची तृप्ति करावी तों तों ती अधिकच बळावत जाते. सत्ता म्हटली कीं अहोरात्र काळजी आलीच. म्हणूनच हें सर्व सोडून हा मार्ग मीं पत्करला. दुःखापासून मुक्ति कशी मिळेल हें शोधून काढणें हेंच माझें ध्येय आहे." हें उत्तर ऐकून बिंबिसार राजा निरुत्तर झाला आणि बुद्धाला वंदन करून निघून गेला.

राजगृह नगरांत उद्रक नांवाचा एक ब्राह्मण राहत असे. हा मोठा ज्ञानी होता. श्रद्धा, वीर्य, स्मृति, समाधि, व प्रज्ञा या पांच गोष्टींचा आश्रय करणाराला मोक्ष मिळतो हें त्याच्या उपदेशाचें सार असे. बुद्ध त्याच्यापाशीं कांहीं दिवस राहिला आणि नंतर गयाशीर्ष पर्वतावर गेला. तेथें चिंतन करीत असतां रागद्वेषरहित झाल्याखेरीज ज्ञानाचा प्रकाश अंतःकरणांत पडणार नाहीं हें सत्य त्याच्या प्रत्ययाला आलें.

पुढें नैरंजना नदीच्या कांठीं बुद्ध आला. या ठिकाणीं पांच भिक्षु तपश्चर्या करीत होते. तपस्येनें शरीराला क्षीण करून घेतल्यानें ज्ञान-प्राप्ति होते अशी या भिक्षूंची श्रद्धा होती. बुद्धहि तेथेंच तपश्चर्येस बसला. जसजसे दिवस जाऊं लागले तसतसा त्याचा देह कृश होऊं लागला. मोडक्या घराच्या वाशांप्रमाणें बरगड्या दिसूं लागल्या. डोळे खोल गेले आणि शरीरांत त्राण राहिलें नाहीं. अखेर अशा शरीर-कष्टांनीं धर्मज्ञान होईल अशी खात्री होईना. पूर्वीं जीवनकलहाची भीष-णता पाहिल्यानंतर आपण जंबुवृक्षाखालीं क्षणिक समाधिमग्न झालों होतों, त्यावेळचा आनंद बुद्धाला आठवला. त्या आनंदाचा अक्षय साक्षात्कार झाला तर मात्र आपलें उद्दिष्ट साध्य होईल असें त्याला वाटूं लागलें.

यावेळीं क्षीणतेची परमावधि होऊन तो मूर्च्छित पडण्याच्या बेतांत होता. इतक्यांत नंदा नांवाची एक गवळण वनदेवतांना नैवेद्य दाख-विण्याकरितां खीर घेऊन त्या ठिकाणीं आली. बुद्धाची स्थिति पाहून तिला कळवळा आला आणि तिनें ती खीर त्याला दिली. ती मिळाल्या-मुळें बुद्धाची क्षीणता जाऊन तो ताजातवाना झाला. मग हठयोगाचा मार्ग सोडून बुद्ध पूर्ववत् संचारास निघाला. तो बोधिवृक्षापाशीं येऊन त्या वृक्षाच्या छायेंत ध्यानस्थ बसला.

या वेळीं बुद्धाला मोठें दिव्य करावें लागलें. साधुसंतांचा शत्रु आणि सद्वासनांचा प्रतिस्पर्धी जो मार तो नाना तऱ्हेच्या आयुधांनीं आणि

मायाजालानें बुद्धाची समाधि भग्न करण्याची खटपट करूं लागला. त्यानें बुद्धाभोंवतीं रूपसुंदर नर्तकींचा ताफाच आणून सोडला तरी बुद्धाचें चित्त विचलित होईना. तेव्हां प्रत्यक्ष यशोधरेची करुणरम्य मूर्ति त्यानें बुद्धापुढें निर्माण केली. 'नाथ, आतां या दीन अबलेचा किती अंत पाहणार ?' असें अश्रुपूर्ण लोचनांनीं ती विनवीत आहे असें बुद्धाला वाटलें. पण याहि वेळीं विवेकाचा जय झाला व बुद्धाची समाधि अढळ राहिली. अशा रीतीनें नाना उपायांनीं मारानें बुद्धाला त्याच्या ध्येयापासून च्युत करण्याचा प्रयत्न केला. पण बुद्धानें त्याला अधिकारवाणीनें सांगितलें— "अरे, नीच मारा! भीति, कुशंका, विषयवासना, गर्व इ० तुझ्या अनेक सेनांसह माझ्यावर तूं कितीहि हल्ले चढविलेस तरी मजवर त्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं. कारण श्रद्धा, प्रज्ञा, आणि उत्साह यांनीं माझें अंतःकरण परिपूर्ण आहे. मला मृत्यूची भीति घालशील तर तिचाहि कांहीं उपयोग होणार नाहीं." अशा अलौकिक निर्धाराचें चिलखत ज्यानें अंगावर चढविलें आहे अशा बुद्धावर सोडलेले माराचे सर्व बाण बोथटून जावेत यांत काय आश्चर्य ?

याप्रमाणें कामदेवावर विजय मिळवून बुद्ध ध्यानस्थ बसला असतां वैशाख शुद्ध पौर्णिमेच्या मंगल दिवशीं त्याला दिव्य साक्षात्कार झाला. आजवर अनेक आपदांशीं झगडत आणि विचारांच्या क्षुब्ध वादळांत हेलकावे खात तो ज्या परमदिव्य तत्त्वाचा शोध करीत राहिला होता तें तत्त्व त्याला सांपडलें. निराशेनें व्याप्त असलेल्या अंतःकरणांत प्रभा पसरली आणि आनंदातिशयामुळें पुढील उद्गार त्याच्या तोंडांतून बाहेर पडले.

"देहरूपी गृह उभारणाऱ्या तृष्णेला शोधतां शोधतां आजवर अनेक जन्म गेले, कित्येक संसारांतून भ्रमण केलें, पण तिचा शोध लागला नाहीं! पुनः पुनः जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडणें ही केवढी दुःसह गोष्ट आहे. पण हे तृष्णे! आतां मात्र मी तुला पक्कें जाणलें.

आतां पुनः तुला हें गृह निर्माण करतां येणार नाहीं. घराचे खांब आणि वासे मोडले आहेत. माझ्या संस्कारविहित चित्तानें तृष्णेचा नाश केला आहे."

या मोक्षसुखाचा अनुभव घेत बुद्धदेव सात दिवसपर्यंत तसाच ध्यानस्थ बसून राहिला होता. नंतर दहा हजार देवपुत्र त्या ठिकाणीं अवतीर्ण झाले आणि त्यांनीं बुद्धाला व बोधिवृक्षाला गंगोदकाचें स्नान घातलें. इतक्यांत तो दुष्ट मार तेथें आला आणि मोठ्या शिष्टपणाचा आव आणून बुद्धाला म्हणाला, "आतां तर तुम्हांला पाहिजे तें मिळालें ना? मग आतां अवतार समाप्त करा." यावर बुद्ध म्हणाला, "निव्वळ आत्मोन्नति हें माझें ध्येय नाहीं. मीं शोधून काढलेला आनंदनिधि लोकांना दिल्याशिवाय मी अवतार संपवणार नाहीं."

आपणास साक्षात्कार झालेल्या दिव्य तत्त्वावर सुमारें दोन महिने विचार केल्यानंतर जगदुद्धारासाठीं भगवान् बुद्ध जगावर संचार करण्यास निघाला. वाटेंत एक वैष्णव संन्यासी त्याला भेटला. संन्याशानें विचारलें, "आपला संप्रदाय कोणता?" बुद्धानें उत्तर दिलें, "मला संप्रदाय नाहीं. जातिवर्ण वगैरे भेद न ठेवतां सर्व मानवतेच्या दुःखाचा निरास करण्याचा मार्ग मीं शोधून काढला आहे." नंतर ते पूर्वींचे पांच भिक्षु त्याला भेटले. बुद्धानें आपलीं धर्मतत्त्वें त्यांना सांगितलीं.

"कठोर व्रतें आणि भोग्य वस्तूंचें अतिसेवन हीं दोनही टाळलीं पाहिजेत. ह्यांच्यामधील मार्ग आहे तोच खरा निर्वाणप्राप्तीचा मार्ग होय. यथार्थ ज्ञान, उच्च गोष्टी करण्याचा निश्चय, चरितार्थाचें योग्य साधन, उत्तम भाषा, उत्तम कृत्यें, योग्यप्रकारचे यत्न व विचार, आणि मनाची शांतियुक्त स्थिति अशा अष्टांगांनीं हा मार्ग अवलंबितां येतो."

बौद्ध धर्माची दीक्षा मिळालेले हे पहिले पांच भिक्षु होत.

संचार करीत करीत बुद्ध आपल्या राजधानीस आला. बुद्धाच्या

पित्यानें—शुद्धोदन राजानें—त्याला मोठ्या सन्मानानें राजवाड्यांत आणिलें. सर्व मंडळी बुद्धाच्या दर्शनास आली. शोकाविव्हल झालेली यशोधरा मात्र दीन स्थितींत आपल्या महालांत पडून राहिली होती. मग बुद्धानें तेथें जाऊन तिची समजूत घातली. पुढें कांहीं दिवसांनीं शुद्धोधन राजाचा अंत झाल्यानंतर बुद्धानें पत्नी यशोधरा, पुत्र राहुल, व सापत्न माता महाप्रजावती गौतमी या सर्वांना आपल्या धर्माची दीक्षा दिली.

हळू हळू बौद्ध धर्माचा प्रसार जारीनें होऊं लागला. आपल्या तत्त्वाचें मंडन करण्याचें कौशल्य आणि प्रतिपक्षाचा संशय विच्छिन्न करण्याचें सामर्थ्य बुद्धाचे ठिकाणीं केवळ अलौकिक होतें. पीडितांना व मुमुक्षूंना बिनतोड युक्तिवादानें तो सन्मार्गाकडे वळवी. याविषयींच्या कित्येक गोष्टी फारच बोधप्रद आहेत.

किसा गौतमी नांवाची कोणी एक स्त्री होती. तिचा एकुलता एक मुलगा सर्पदंशानें मरण पावला. ‘कोणी तरी सर्पदंशाला औषध द्या’ असें म्हणून ती दारोदार हिंडूं लागली. मृत मनुष्य औषधानें जिवंत होणें कसें शक्य आहे, एवढाहि विचार तिला करतां येईना. कारण, पुत्रशोकानें ती वेडी झाली होती. कोणी मनुष्य भेटो तिनें धाय मोकलून रडावें आणि सर्पदंशावर कांहीं औषध द्या म्हणून विनवावें. अखेर ती बुद्धाकडे आली आणि त्याच्याजवळहि तीच याचना करू लागली. बुद्ध तात्काल म्हणाला, “ठीक आहे. मला एक मूठभर मोहऱ्या आणून दे म्हणजे औषध तयार करून देतों. मात्र अट ही कीं, ज्या घरांतून मोहऱ्या आणशील त्या घरांतील माणसांपैकीं बाप, आई, मुलगा, बायको, नोकर कोणीहि पूर्वीं मेलेलें असतां कामा नये.” ही अट मान्य करून शोकमग्न गौतमी मोहऱ्या आणण्यास निघाली. पण ज्या ज्या घरीं शोध करावा तेथें पूर्वीं कोणीतरी मेलेलें असेच. अखेर तिला निराश होऊन परत यावें लागलें. तेव्हां बुद्धानें मनुष्यदेह हा कसा क्षणभंगुर आहे हें तिला समजावून देऊन तिचें सांत्वन केलें.

खेमा नांवाची एक राजकुलीन स्त्री होती. तिला आपल्या रूपाचा फार अभिमान असे. भगवान् बुद्ध असें सांगतो कीं, 'रूपावर आसक्त होऊं नका. रूप अनित्य आहे.' हें तिला कळलें. त्यामुळें ती बुद्धाचें दर्शन घेऊं इच्छित नव्हती. अखेर बिंबिसार राजानें आग्रहानें तिला बुद्धाच्या दर्शनास जाण्यास सांगितलें. नाइलाज म्हणून ती तेथें गेली. पाहते तों एक अत्यंत लावण्यखनी स्त्री बुद्धाला वारा घालीत उभी होती. खेमाचा गर्व नाहींसा झाला. ती मनांत म्हणाली, "अशा दिव्य स्त्रिया ज्या महामुनीच्या सेवेला असतात त्याच्या दर्शनाची मला लाज वाटावी ना?" पण इतक्यानेंहि संपलें नाहीं. बुद्धाची सेवा करणारी अप्सरेसारखी सुंदर स्त्री क्रमाक्रमानें बदलत गेली. तिचा वर्ण पांडुर झाला. डोळे खोल गेले, गालाला सुरकुत्या पडल्या आणि वार्धक्याचीं सर्व चिन्हें तिच्या चेहऱ्यावर दिसूं लागलीं. थोड्याच वेळानें ती मृत होऊन पडली. हें सर्व भयंकर दृश्य पाहून खेमाचा रूपाविषयींचा अभिमान पार गळाला. नंतर बुद्धदेव उद्गारला, "कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें आपल्याभोंवतीं जाळें विणून त्यांत कामासक्त मनुष्यें आपणांला गुरफटून घेतात. पण हें तोडून व कामसुखाचा त्याग करून ज्ञानी पुरुष संन्यासी होतात." ह्या उपदेशानें खेमाला उपरति झाली आणि तिनें भिक्षुणीची दीक्षा घेतली.

भारद्वाज नांवाचा एक श्रीमान् कृषिकर्म करणारा ब्राह्मण होता. त्याच्या घरीं मोठा उत्सव सुरू असतांना बुद्ध तेथें भिक्षा मागावयाला गेला. उत्सवासारख्या मंगल प्रसंगीं मुंडन केलेला संन्यासी दारांत आलेला पाहतांच ब्राह्मणाच्या मस्तकांत तिडीक उठली. तो खेकसून म्हणाला, "अरे गोसावड्या, चालता हो. आम्हीं निढळाच्या घामानें शेतांत काम करावें आणि तूं आयतें खायला मागावेंस हें तुला शोभतें काय?" बुद्धानें नम्रपणानें उत्तर दिलें, "महाराज, मीहि पण एक शेतकरी आहें." ब्राह्मणानें विचारलें, "तुझे बैल, शेत, नांगर कोठें आहेत?"

बुद्धानें उत्तर दिलें, "श्रांत झालेल्या माणसांचीं अंतःकरणें हें माझें शेत. प्रज्ञा हा माझा नांगर, वीर्य हा बैल, धर्म हा दंड, आणि श्रद्धा हें बीज आहे. मी सर्वत्र ज्ञानरूपी नांगर फिरवून अज्ञानरूपी कांटे काढून टाकतों व तेथें श्रद्धाबीजाची पेरणी करतो. या माझ्या शेत-कामाला जें पीक येतें त्याला निर्वाण असें नांव आहे." हें उत्तर ऐकून हा पुरुष महाज्ञानी आहे अशी ब्राह्मणाची खात्री पटली व तो बुद्धाला तात्काल शरण गेला.

अशा रीतीनें आपल्या प्रतिभातेजानें अव्याहत ४९ वर्षें बुद्धदेव धर्मप्रसार करीत होता. त्याच्या उत्कर्षानें संतप्त होऊन कित्येक कर्मठ ब्राह्मणांनीं त्याला प्रचंड विरोध केला. त्याच्या शीलावर शिंतोडे उड-विण्याचे नीच प्रकार करून पाहिले. पण सारेंच व्यर्थ ठरलें. बुद्धाच्या प्रखर चारित्र्यसूर्यापुढें हे अपवादाचे हिमगिरि वितळून जात. त्याच्या अनुयायांची संख्या लाखांनीं मोजतां येऊं लागली. कित्येक संपत्तिमान् पुरुषांनीं आपलें सर्वस्व बुद्धचरणीं अर्पण करून सन्यासदीक्षा घेतली, तर अनेक अहंकारी पंडित गर्वरहित होऊन बुद्धाच्या धर्मध्वजाखालीं आले.

बुद्धदेव पंचपंच उषःकालीं जागा होई. त्यावेळीं तो ध्यानस्थ होई अथवा विहाराच्या बाहेर चंक्रमण (इकडे तिकडे हिंडणें) करी. मग गांवामध्यें भिक्षेला जावयाचें. या वेळीं कोणीं कांहीं विचारलें तर त्याला समर्पक उत्तर द्यावयाचें आणि मुमुक्षूंना सन्मार्गाचा उपदेश करावयाचा. भिक्षा घेऊन मध्यान्हीस विहारांत आल्यानंतर भोजन व भोजनोत्तर थोडी विश्रांति. पुनः तो ध्यानस्थ होई. सायंकाळीं भिक्षूंना व गृहस्थांना उपदेश करण्याचा त्याचा कार्यक्रम असे. मध्यरात्रींचे सुमारास तो निद्रेस जाई. उजव्या कुशीवर पायावर पाय ठेवून व उशाला हात घेऊन झोपावयाचें यालाच सिंहशय्या म्हणतात. प्रवासास जातांना बुद्धाबरोबर शिष्यांचा मोठा समुदाय असे. ज्या गांवीं विहार नसेल तेथें झाडाखालीं किंवा बागेंत उतरावें अशी त्याची पद्धति होती.

अखेर आपला निर्वाणकाल समीप आल्याचें बुद्धानें जाणलें. पावा नांवाच्या गांवीं चुंद लोहाराकडे तो शिष्यगणांसह भोजनास गेला. चुंदानें अपक्व आणि विषारी अन्न बुद्धास वाढलें. वास्तविक त्या अन्नाचे हे हीन गुणधर्म बुद्धाला अगोदरच कळले होते. पण बुद्धानें चुंदाला वाईट वाटूं नये म्हणून मुकाट्यानें वाढलेलें अन्न खाल्लें. त्याला तात्काळ व्याधि जडली. मग आपला पट्टशिष्य आनंद याला त्यानें सालवृक्षाखालीं शय्या तयार करण्याची आज्ञा केली. आपल्या सद्-गुरूंचा अंतकाल समीप आला हें कळतांच आनंद लहान मुलासारखा ढसढसा रडूं लागला. तेव्हां बुद्धानें त्याचें सान्त्वन करीत म्हटलें, " आनंदा, मृत्यु हा वस्तूचा स्वभावधर्म आहे. वस्तु कितीहि आवडती असली तरी अखेर तिचा वियोग होणारच. " नंतर आपल्या माग बौद्ध धर्माचा प्रसार करण्याचे सर्वाधिकार त्यानें आनंदाला दिले. इतकें होतें आहे तों भिक्षूंच्या व इतर भक्तांच्या झुंडीच्या झुंडी बुद्धदेवाच्या दर्श-नाला येऊं लागल्या. हा महाविरागी, परम थोर मुनि इहलोक सोडून जाणार हें कळल्यापासून भाविक माणसांना अत्यंत शोक झाला. जो तो गर्दींतून वाट काढीत बुद्धदेवाजवळ जाण्याचा व एकदोन शब्द बोल-ण्याचा प्रयत्न करीत होता. पण आनंदानें सर्वांना विनंतिपूर्वक सांगितलें कीं, " भगवान् आतां क्षीण झाले आहेत, तेव्हां कोणीहि जवळ येऊन बोलण्याचा प्रयत्न करूं नका. " तेव्हां तो प्रचंड समुदाय सद्गदित होऊन बुद्धदेवाकडे पाहत राहिला.

शेवटीं सर्वांना उद्देशून उच्चरवानें बुद्धदेव म्हणाला, " मी उपदेशि-लेला धर्म हाच माझ्या मागें तुमचा शास्ता आहे असें समजा. सर्व वस्तु निरनिराळ्या घटकांच्या बनलेल्या असून क्षणभंगुर आहेत. यासाठीं प्रत्येकानें आपापलीं कर्तव्यें सावधान चित्तानें करावीं आणि मोक्ष मिळवावा. " हे त्याचे शेवटचे शब्द. आपल्या उज्ज्वल तत्त्व-ज्ञानाचें रहस्य अशा रीतीनें थोडक्यांत सांगून बुद्ध चिंतनमग्न झाला, आणि थोड्याच वेळांत तो निर्वाणाप्रत पोंचला.

# ३. रे

१९३३ वर्षांपूर्वीची एक र
नजीक कांहीं. मेंढपाळ शेकोट
थंडी म्हणजे मी म्हणत होती
उबदार पंखांत घुसलीं होतीं. व
प्राण्यांचे पाय आखडले जाऊन
मेंढरें देखील इकडे तिकडे न
होतीं. मेंढपाळांनीं शेकोटी मल
प्रकाशांत त्यांचे लालबुंद, राक
स्टस राजानें आपल्या रोमन
पिलें असून याच वेळीं ती ग
बोलण्यांत तो विषय निघावा

त्कार झाला! अंधारांत अंतराळीं एक तेजोवलय दिसूं लागलें आणि बगळ्याच्या रंगासारखीं शुभ्र वस्त्रें परिधान केलेला एक तेजस्वी पुरुष त्यांतून प्रकट झाला. मेंढपाळ घाबरले. एक दोघे तर मूर्च्छित पडण्याच्या बेतांत होते. तोंच तो पुरुष गंभीर वाणीनें बोलूं लागला, " भिऊं नका, मी देवदूत आहें. मी तुम्हांला शुभवर्तमान सांगण्यास आलों आहें. तुमचा उद्धारकर्ता आज जन्मास आला आहे. गांवांत जा, गोठ्यामध्यें बाळंत्यांत गुंडाळून ठेवलेलें एक बालक तुम्हांला दिसेल. तोच तुमचा उद्धारकर्ता " इतकें सांगून देवदूत अंतर्धान पावला.

देवदूताच्या सांगण्याप्रमाणें मेंढपाळ तडक गोठ्याकडे आले. पाहतांत तों मराया व योसेफ आपल्या मुलास बाळंत्यांत गुंडाळून घेऊन बसलीं होतीं. मेंढपाळांनीं परमेश्वराच्या नांवाचा जयजयकार केला आणि देवदूतानें सांगितलेलें शुभवर्तमान निवेदन केलें. मराया व योसेफ यांना धन्य धन्य वाटावें यांत नवल काय? यापूर्वीं स्वप्नांत योसेफला दृष्टान्त झाला होताच. बालकाचें दर्शन घेऊन मेंढपाळ घरोघर निघून गेले. यानंतर आठ दिवसांनीं मुलाचें नांव येशू असें ठेवण्यांत आलें.

पुढें मातापितरांनीं येशूला येरुसलेम येथील मंदिरांत आणिलें. या शहरांत सायमन नांवाचा कोणी धार्मिक मनुष्य राहत असे. त्याला असा दृष्टान्त झाला होता कीं, " परमेश्वराचा प्रेषित पाहिल्यावांचून तुला मरण येणार नाहीं. " याच वेळीं सायमनला अंतःकरणांत स्फूर्ति झाली आणि तो मंदिरांत आला. बालयेशूला पाहतांच त्याचे डोळे भरून आले. येशूला उचलून घेऊन त्यानें परमेश्वराचे धन्यवाद गाइले आणि आतां आपणास देह ठेवण्यास हरकत नाहीं असें म्हणून तो निघून गेला.

याच सुमारास कांहीं ज्योतिषी येथें आले. पूर्व दिशेला त्यांना एक तारा दिसला आणि त्यावरून येशूच्या अवताराची वार्ता त्यांना कळली होती. येशूच्या जन्मामुळें घाबरून गेलेल्या हेरोड राजानें त्यांना या नवीन अवताराचा शोध करण्यास पाठविलें होतें. पूर्वेकडील तारा नेईल

तिकडे जावयाचें अशा धोरणानें ते मार्ग काढीत आले. येशू ज्या घरांत होता त्या घराजवळ ते ज्योतिषी येतांच तारा थांबला. ज्योतिषी घरांत आले. त्यांनीं येशूपुढें लोटांगण घातलें, त्याला सुवर्ण, गंधरस इ० दानें अर्पण केलीं, आणि नंतर ते परत फिरले.

हेरोड राजाकडे परत न जातां ज्योतिषी सरळ आपल्या देशाला निघून गेले. ते परत न आल्यामुळें हेरोडला अधिकच भय वाटूं लागलें. व्यसनी व दुर्बळ राजे मोठे संशयी आणि भित्रे असतात. आपल्यां राज्यांत आपल्याहून वरचढ व लोकांवर प्रभुत्व गाजविणारा पुरुष निर्माण होणें त्यांना रुचत नाहीं. हेरोड राजाचें तसेंच झालें. येशूच्या पायांशीं उद्या सारी जनता लोटांगण घालणार ही कल्पनाच त्याला असह्य झाली. येशूला मारेकरी घालण्याच्या विचारांत तो होता. इतक्यांत येशच्या मातापित्यांना दृष्टान्त झाला कीं, " आपलें बालक घेऊन मिसर देशांत जा आणि पुनः दृष्टान्त होईपर्यंत तेथेंच रहा. " या दृष्टान्ताप्रमाणें तीं येशूला घेऊन रातोरात मिसर देशांत गेलीं. पुढें हेरोडच्या मृत्यूची वार्ता दृष्टान्तानेंच त्यांना समजली. तेव्हां येशूचा पिता योसेफ येशूला घेऊन गालिली प्रान्तांत नाझरेथ या गांवीं येऊन राहिला.

येशू मोठा होत चालला तसतसें त्याचें शारीरिक बळ व बुद्धीचें तेज विकास पावूं लागलें. एकदां योसेफ व मरिया त्याला घेऊन सणाकरितां येरुशलेमला आलीं. उत्सव आटोपल्यानंतर तीं परत जाण्यास निघालीं. पण येशू मागेंच राहिला. बाळ कोठें दिसत नाहीं हें पाहून मरिया घाबरली. तिच्या डोळ्यांना खळकन् पाणी आलें. ' माझा बाळ कोठें आहे तो शोधून आणा हो! ' म्हणून ती काकुळतीनें योसेफला विनवूं लागली. योसेफनें तिचें सान्त्वन केलें आणि तो येशूचा शोध करूं लागला. तों येरुशलेम येथील मंदिरांत येशू अध्यापकांच्या मेळ्यांत बसलेला त्याला दिसला. अध्यापकांशीं तो धार्मिक विषयावर चर्चा करीत होता. त्याचें अगाध ज्ञान व तेज पाहून अध्यापक चकित झाले. मग

१८८३१

योसेफनें येशूला मरियाकडे आणिलें. त्याला पोटाशीं धरून मरिया म्हणाली, " बाळा, आम्हांला चुकवून तूं कां मागें राहिलास ? आमचा जीव कसा उडून गेला होता ! " यावर येशू हसत हसत म्हणाला, " आई, तुम्हांला इतकें भ्यायचें कारण काय ? मी माझ्या पित्याच्या ( प्रभूच्या ) मंदिरांत होतों. " पण त्या भोळ्या भावड्या आईबापांना या उद्गाराचें रहस्य कसें कळणार ?

याच काळीं जॉर्दन नदीच्या तीरावर एक विरक्त व धर्मशील मनुष्य राहत असे. त्याचें नांव योहान. योहान उंटाच्या केसांचें वस्त्र परिधान करी आणि कमरेस कातड्याची कमरबंदी घाली. टोळ आणि रानांत सांपडणारा मध हा त्याचा आहार. उपासतापास, व्रतवैकल्यें करावीं आणि चित्तशुद्धि करून परमेश्वरास शरण जावें हा त्याचा क्रम असे. ' पश्चात्तापानें पापांचा नाश होतो, देवाला शरण जा आणि स्वर्गाची प्राप्ति करून घ्या. ' असा उपदेश करीत तो जॉर्दन नदीच्या खोऱ्यांतून हिंडे. त्यानें पवित्र जॉर्दन नदींत लाखों लोकांना बाप्तिस्मा देऊन शुद्ध केलें. सर्व लोक योहानाला फार श्रेष्ठ पुरुष मानीत. कित्येकांना तर तो ' देवाचा पुत्र ' ख्रिस्तच वाटे. पण योहाननें तत्काळ त्यांचें निराकरण करावें कीं, " अहो, तो देवाचा पुत्र मी नव्हें. तो अद्याप अवतरावयाचा आहे. "

सूर्याचा उदय होण्यापूर्वीं पूर्वदिशेला प्रथम अरुण येतो. आपला लाल ध्वजा फडकावीत जणूं काय ' निगा रखो महाराज ' असें पुकारीत तो सूर्याच्या आगमनाची इषारत साऱ्या जगाला देतो. परमेश्वराचा अवतार होण्यापूर्वीं असाच कोणी तरी प्रथम भूमीवर येऊन अवताराच्या स्वागताची तयारी करून ठेवीत असतो. साहजिकच आहे, लोकांची मनोभूमि तयार करून ठेवल्यावांचून अवताराची ओळख त्यांना कशी व्हावी ? योहान हा तसाच अग्रदूत होता. येशूच्या आधीं पंधरा वर्षें पृथ्वीवर येऊन त्यानें येशूचा मार्ग साफसूफ करून ठेविला.

इतर लोकांप्रमाणें येशूहि बाप्तिस्मा घेण्याकरितां योहानकडे आला. योहान विरक्त असल्यामुळें तो मोठमोठ्या अधिकाऱ्यांना वा सत्ताधीशांना फारसा मोजून नसे. पण येशू समोर येतांच योहान त्याच्यापुढें नम्र झाला. येशूनें बाप्तिस्मा घेण्याची इच्छा दर्शवितांच योहान म्हणाला, " श्रेष्ठ पुरुषा, तूं सर्व जगाचें तारण करणारा प्रभूचा लाडका पुत्र आहेस. तुझ्या वहाणा उचलण्याची देखील माझी पात्रता नाहीं. तूंच आम्हांला पावन करून घ्यायचें. मीं तुला कसा बाप्तिस्मा द्यावा ? " " माझें म्हणणें मान्य कर, सर्व कांहीं धर्माला अनुसरून झालें पाहिजे " असें येशूनें त्याला सांगितलें. अखेर फारसे आढेवेढे न घेतां येशूला बाप्तिस्मा देण्यास योहान तयार झाला.

विधिपूर्वक बाप्तिस्मा घेऊन येशू जॉर्दन नदींतून बाहेर आला; तोंच एक चमत्कार घडून आला. अंतराळाचे निळे दरवाजे उघडले आणि वरून एक पांढरें शुभ्र कबूतर खालीं उतरलें; तें तडक येशूकडे येऊन त्याच्यावर सावली करून उभें राहिलें. योहान सद्गदित झाला. कारण तें पांढरें शुभ्र कबूतर पवित्र आत्म्याचें रूप होतें. येशू परमेश्वराचा पुत्र आहे हें सत्य, जगास दाखविण्याकरितांच हा चमत्कार झाला. इतकेंच नव्हे, तर दशादिशांतून शब्द घुमूं लागला कीं, " हे माझ्या प्रियपुत्रा, मी तुजवर प्रसन्न झालों आहें. "

आतां येशूला मोठेंच दिव्य करावयाचें होतें. सैतानानें त्याला एका महाघोर अरण्यांत नेलें. या ठिकाणीं सर्प, वाघ इ० भयंकर प्राण्यांची वस्ती होती. सापांच्या उच्छ्वासांनीं तेथील हवा दूषित झाली असून हिंस्र पशूंच्या डरकाळ्या ऐकूं येत. चाळीस दिवस येशूला उपास करावा लागला. भुकेमुळें त्याला ग्लानि आली, पण त्याची आनंदी वृत्ति ढळली नाहीं. अखेर सैतान त्याला म्हणाला, " तूं देवाचा पुत्र असशील तर येथील दगडधोंड्यांच्या भाकरी कर. " यावर येशूनें हसत हसत उत्तर

केलें, " बाबारे, मनुष्य केवळ भाकरीवरच जगत नाहीं. परमेश्वराच्या तोंडून बाहेर पडलेला प्रत्येक शब्द त्याला संजीवन देतो. "

सैतानानें त्याला तेथून उचलून एका मंदिराच्या कळसावर बसविलें आणि म्हटलें, " तूं देवाचा पुत्र असलास तर घे येथून खालीं उडी. शास्त्रांत म्हटलें आहे ना कीं तुझ्या रक्षणासाठीं देव तत्पर राहील ? " येशूनें तत्काळ उत्तर दिलें—" अरे, पण शास्त्रांत असेंहि म्हटलें आहे कीं देवाची परीक्षा पाहूं नये. "

अशा रीतीनें निरनिराळ्या प्रकारांनीं अडवून सैतानानें येशूची परीक्षा पाहिली. पण येशू नामोहरम झाला नाहीं. तेव्हां येशूला तेथेंच सोडून सैतान तेथेंच अदृश्य झाला. इतक्यांत देवदूत आले आणि येशूचा श्रमपरिहार करण्याकरितां त्याची सेवा करूं लागले. इकडे कित्येक यहुद्यांनीं योहानकडे माणसें पाठवून त्याला येशूसंबंधीं नाना प्रश्न विचारले. त्यानें येशू हाच देवाचा पुत्र आहे हें त्यांना पटवून देण्याची शिकस्त केली. अखेर त्यानें कबूतराचा चमत्कार जेव्हां सांगितला तेव्हां कुठें त्यांची खात्री झाली.

हळूहळू येशूच्या सभोंवतीं शिष्यांचा मेळा जमूं लागला. त्यांना घेऊन तो लोकांना पावन करीत आणि उपदेश देत हिंडूं लागला. काना नांवाच्या गांवीं एक लग्नसमारंभ होता. या समारंभाकरितां येशूला निमंत्रण होतें. तेव्हां तो आपली आई व आपले शिष्य घेऊन तेथें गेला. ऐन वेळीं अशी गंमत झाली कीं पाहुण्यांना वाढतां वाढतां द्राक्षारस संपून गेला. यजमानाचें तोंड चिमणीएवढें झालें. हें येशूच्या लक्षांत येतांच त्यानें चाकरास सांगितलें कीं, ' येथें असलेल्या सहा दगडी कुंड्या पाण्यानें भरा. ' चाकरांनीं त्याप्रमाणें केलें. मग येशू म्हणाला, ' आतां हेंच पाणी नेऊन पंक्तींत वाढा. ' येशूनें आपल्या सामर्थ्यानें त्या पाण्याचा उत्तम द्राक्षारस तयार केला होता.

असेच आणखीहि अनेक चमत्कार येशूनें केले. त्या प्रांतांतील एक

महारोगी मनुष्य येशूकडे आला आणि म्हणाला, " प्रभो, तुझा प्रसाद झाला कीं मी तत्काळ रोगमुक्त होईन. " येशूनें 'तथास्तु' असें म्हणतांच तो रोगी खडखडीत बरा झाला. अशाच रीतीनें पक्षघात झालेले व पांगळे लोक येशूनें आपल्या कृपाकटाक्षानें बरे केले. हें वर्तमान त्या प्रांतांत चोहींकडे पसरून दीन, पंगु, पीडित अशा लोकांच्या झुंडीच्या झुंडी येशूच्या दर्शनाला येऊं लागल्या.

नंतर येशू समुद्रकांठीं आला. तेथें मत्तय नांवाचा एक जकातदार बसला होता. जकातदाराचें काम त्या काळीं लोक हलकें मानीत. कारण जकातदार परक्यांचे सेवक आणि शिवाय पैसे खाणारे. पण 'भेदाभेद-भ्रम अमंगळ' असें मानणाऱ्या परमेश्वरस्वरूपी येशूला त्याचें काय? त्यानें मत्तयकडे पाहिलें आणि " ऊठ, माझ्या मागें ये " असें म्हटलें. एकाद्या प्रबळ मंत्रानें भारल्याप्रमाणें मत्तय उठला आणि येशूच्या पाठोपाठ जाऊं लागला. त्यानें आपलें सर्वस्व तेथें ठेवून दिलें. पुढें मत्तयानें आपल्या गुरूला—येशूला—एक मोठी मेजवानी दिली. मत्तयसमवेत येशू हसत खेळत खाद्यपेयांचा समाचार घेऊं लागला. तेव्हां मत्सरी व कुत्सित भिक्षुकांनीं त्याच्या शिष्यांजवळ कुरकुर करण्यास सुरुवात केली कीं, " हें हो काय, तुमचा हा गुरु आपणाला परमेश्वराचा पुत्र म्हणवतो आणि खुशाल या हीन दर्जाच्या जकातदाराबरोबर जेवतो ! ! " हे उद्गार येशूला ऐकूं आले तेव्हां तो खड्या सुरानें व अधिकारवाणीनें म्हणाला, " अहो, निरोगी लोकांना वैद्याकडे धाव घ्यावी लागत नाहीं, तर रोग्यांना वैद्याची गरज असते. जे हीन, दीन, पश्चात्ताप पावलेले असतील त्यांचा उद्धार करण्यास मी आलों आहें. मला नुसता सोंवळेपणाचा टेंभा मिरवावयाचा नाहीं. " हें उत्तर ऐकून टीकाकारांचीं तोंडें बंद झालीं.

नंतर लोकांना उपदेश देत देत येशू एकान्त स्थळीं डोंगरावर निघून गेला. सारी रात्र त्यानें परमेश्वराच्या प्रार्थनेंत घालविली. दुसरे दिवशीं

आपल्या बारा शिष्यांस त्यानें बोलावून घेतलें आणि त्यांना उपदेश करण्यास आरंभ केला. तो ऐकण्यास तेथें हजारों लोक गोळा झाले. येशूचा हा उपदेश "**पर्वतावरील प्रवचन**" या नांवानें विख्यात आहे. नीति आणि धर्म यांचा उदात्त व सुबोध उपदेश या प्रवचनांत असून जगाच्या अंतापर्यंत त्याचें सौंदर्य कायम राहील. येशू म्हणाला—

"जे नम्र व लीन आहेत ते धन्य होत! कारण ते पृथ्वीचें राज्य मिळवतील. जे दयाशील आहेत ते धन्य होत! कारण त्यांच्यावरच देव दया करील. जे अंतःकरणानें शुद्ध आहेत ते धन्य होत! कारण त्यांना परमेश्वर दिसेल. धर्मासाठीं ज्यांनीं छळ सोसला ते धन्य होत! कारण त्यांना स्वर्गाचें राज्य मिळेल.

"जुनें धर्मशास्त्र रद्द करण्यास मी आलों नाहीं तर तें पुरें करण्याकरितां मी अवतरलों आहें. कारण धर्मशास्त्र हें अबाधितच रहावयाचें. शपथ वाहूं नका. स्वर्ग हें देवाचें सिंहासन आहे म्हणून त्याची शपथ वाहूं नका. पृथ्वी हें त्याचें पदासन आहे म्हणून तिचीहि शपथ वाहूं नका. इतकेंच काय पण स्वतःच्या मस्तकाचीहि शपथ वाहूं नका. कारण मस्तकावरील एक केसहि तुम्हांला काळा किंवा पांढरा करतां येणार नाहीं.

"आपल्या वैऱ्यावरहि प्रेम करा. परमेश्वर पहा, चांगल्या वाईटावर सारखाच सूर्यप्रकाश पाडतो. धार्मिक व अधार्मिक यांच्यावर सारखीच जलवृष्टि करतो. परमेश्वराचें अनुकरण करून तुम्ही सर्वांशीं समभावानें वागा.

"लोकांनीं आपले पोवाडे गावे या हेतूनें सर्वांसमक्ष दानधर्म व परोपकाराचीं कृत्यें करूं नका. तुमच्या उजव्या हातानें केलेलें सत्कृत्य डाव्या हाताला कळतां कामा नये.

"या जगांत स्वतःच्या सुखासाठीं धनसंचय करूं नका. कारण या जगांतलें धन नाशिवंत आहे. तें केव्हां नष्ट होईल याचा भरंवसा

नाहीं. उलट स्वर्गांतलें धन शाश्वतचें आहे; म्हणून सत्कृत्यें करून स्वर्गात धनसंचय करून ठेवा. आपल्या जीविताविषयीं काळजी बाळगूं नका. रानांतल्या पांखरांकडे पहा. तीं पेरणी करीत नाहींत, किंवा धान्य सांठवूनहि ठेवीत नाहींत. पण परमेश्वर त्यांचें पोषण करतो ना? रानांतल्या पांखरांप्रमाणें तुम्हीहि त्याचीं लेंकरेंच आहांत. तो तुमचीहि काळजी घेईल. उद्यांची चिंता करीत बसूं नका. कारण असें करण्यानें धर्माचरणाकडे तुमचें दुर्लक्ष होईल.

" तुम्हांला दुसऱ्याच्या डोळ्यांतलें कुसळ दिसतें पण स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ दिसत नाहीं. काय ढोंग हें ! अगोदर स्वतःच्या डोळ्यांतलें मुसळ काढा आणि मग दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळाकडे लक्ष द्या.

" प्रार्थनेंत फार मोठें सामर्थ्य आहे. म्हणून मागा म्हणजे मिळेल, शोधा म्हणजे सांपडेल आणि ठोठावा म्हणजे उघडेल. मला नुसतें 'हे गुरो' म्हणून संबोधणाऱ्या लोकांना स्वर्गप्राप्ति होणार नाहीं; तर परमेश्वराच्या राज्याचे नियम तंतोतंत पाळणाऱ्यांना तें परमपद मिळेल. "

या उपदेशानंतर येशू नित्याप्रमाणें चोहींकडे संचार करूं लागला. एकदां त्यानें खवळलेला समुद्र शांत केला; एकदां तो पाण्यावरून सरळ चालत गेला. महारोगी, पांगळे, अंधळे असे पीडित लोक आपल्या हस्तस्पर्शानें बरे करावयाचे आणि पश्चात्ताप पावलेल्यांना उपदेश करावयाचा हा तर त्याचा नेहमींचा क्रम असे. त्याची वाढती लोकप्रियता भिक्षुकांना जाचक होऊं लागली. त्यानें केलेले नवीन नवीन चमत्कार ऐकत असतां राजसत्तेला कंप सुटूं लागला.

बेथामी नांवाच्या गांवांत येशूचा एक परमभक्त लाजारस हा आजारी पडला. त्याच्या बहिणींनीं येशूला निरोप पाठविला कीं, " प्रभो, तुझा मित्र अंथरुणाशीं खिळला आहे. तूं लौकर ये. " पण येशू बेथामीला

पोंचण्याचे अगोदरच लाजारस इहलोक सोडून गेला होता. येशू बेथामींत शिरतांच शोकविव्हळ झालेल्या लाजारसच्या बहिणींनीं हंबरडा फोडला आणि लाजारसच्या मृत्यूची वार्ता त्याला सांगितली. येशूनें त्यांचें सान्त्वन केलें आणि म्हटलें, " शोक करूं नका. तुमचा भाऊ परत मिळाला म्हणजे झालें ना! " इतकें बोलून त्यानें लाजारसला हाक मारली. त्यासरशीं समाधि दुभंग होऊन तींतून सजीव झालेला लाजारस बाहेर पडला. या चमत्कारानें सारे लोक थक्क झाले; पण भिक्षुक व अधिकारी यांच्या छातींत धडकी भरली आणि येशूला कसा नष्ट करावयाचा याचा ते विचार करूं लागले.

अखेर येशू गाढवाच्या शिंगरावरून येरुशलेमकडे निघाला. वाटेनें लाखों लोक त्याला सामोरे जात. कोणीं आपल्या मौल्यवान् झग्याच्या पायघड्या त्याच्या मार्गावर घालाव्या तर कोणीं हिरव्या गार पल्लवांनीं त्याचा मार्ग आच्छादून टाकावा. शहरांत येऊन त्यानें मंदिरांत प्रवेश केला आणि तेथील साहित्य उध्वस्त करून तो आवेशानें व रागानें पुजाऱ्यांस म्हणाला, " हें मंदिर प्रभूच्या प्रार्थनेकरितां असून तुम्हीं त्याला लुटारूंचा अड्डा बनविला आहे. " आपल्या स्वार्थावर, दंभावर आणि अधर्मिकपणावर येशूनें अचूक घाव घातला, म्हणून पुजारी खवळले. येशूच्या वाढत्या यशामुळें राजसत्तेलाहि त्याच्याबद्दल मत्सर वाटूं लागला होताच. तेव्हां भिक्षुक व अधिकारी यांनीं मिळून येशूचा निःपात करण्याचें ठरविलें. आतां आपला अवतार संपत आला हें येशूलाहि कळून चुकलें.

मग त्यानें निरवानिरव करण्यास सुरुवात केली. आपल्या शिष्यांना अहंकाराची बाधा होऊं नये म्हणून त्यानें आपल्या शिष्यांचे पाय स्वतः धुतले आणि अशा रीतीनें नम्रतेचा धडा घालून दिला. सद्गदित झालेल्या शिष्यांना त्यानें आपला अंतकाळ समीप आल्याचें सांगितलें. त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. " प्रभो, आम्ही तुम्हांला कधींहि विन्मुख

होणार नाहीं, " असे भक्तियुक्त उद्गार सर्वांनीं काढले. पण त्रिकालज्ञ येशूनें श्रमी होऊन सांगितलें, " बाबांनो, माझ्या शिष्यत्त्वाचें असिधाराव्रत तुम्हांला अखेरपर्यंत झेपणार नाहीं, तुमच्यापैकीं एकजण माझा विश्वासघात करून मला शत्रूच्या हवालीं करील. " नंतर पिटरकडे वळून तो म्हणाला, " उद्या कोंबडा आरवण्याचे आंतच तूं माझें शिष्यत्व नाकबूल करशील. " यावर पिटरनें काकुळतीनें सांगितलें " प्रभो, ही गोष्ट कदापि होणार नाहीं. "

संध्याकाळ झाली. सूर्यगोल अस्तगिरीवरून अंतराळांत कोठेंतरी गरंगळून पडला. रात्रीनें आपला अंमल जगावर बसविला. येशू प्रार्थना करीतच होता. देवदूत त्याला धीर देत होते. " अहो, झोपूं नका, माझ्या सभोंवतीं बसून रहा. " असें त्यानें शिष्यांस विनविलें त्यांनीं कांहीं वेळ पहारा केला, पण अखेर त्यांनाहि झोपा लागल्या. निर्वाणकाळ समीप आला म्हणून अधिकच एकाग्र होऊन येशू प्रार्थना करूं लागला. त्याच्या अंगांतून रक्तासारखे लाल धर्मबिंदु टप्‌टप् ठिबकत होते.

मध्यरात्र उलटून गेली, तोंच नागव्या तलवारी घेतलेले शिपाई आंत घुसले आणि अरेरे! त्यांचा म्होरक्या येशूचाच एक शिष्य यहुदा होता. त्यानें येशूचें चुंबन घेतलें; त्यासरशीं शिपायांनीं येशूला पकडलें. ' मी ज्याचें चुंबन घेईन तोच येशू आहे असें समजा ' असा त्याचा संकेत पूर्वींच ठरला होता. शिपायांनीं विचारिलें, " नाझरेथकर येशू तो तूंच का ? " येशूनें धिटाईनें उत्तर केलें, " होय, पण तुम्ही असे चोरासारखे रात्रीं मला धरायला का आलांत ? मी माझा उपदेश सार्वजनिक रीतीनें करीत नसें काय ? " इतक्यांत येशूच्या बरोबरच्या लोकांनीं तलवारी काढल्या व ते शिपायांवर चालून गेले. पण येशूनें गर्जून सांगितलें, " हां थांबा, आपल्या तलवारी म्यानांत घाला. **जे तलवार चालवितात ते तलवारीनेंच मरतात.** स्वसंरक्षणाविषयीं मी असमर्थ आहें

असें का तुम्हांला वाटतें? मीं इच्छा प्रकट करण्याचा अवकाश कीं माझा पिता सशस्त्र देवदूतांचीं पथकेंच्या पथकें माझ्या संरक्षणासाठीं पाठवील. पण मला तसें करावयाचें नाहीं. हा पुढें आलेला पेला कितीहि कडू असला तरी मला तो घेतला पाहिजे."

येशूचा शिष्य पिटर तेथेंच होता. शिपायांनीं त्याला विचारिलें, 'तूं येशूचा शिष्य ना?" "छे, मी त्याचा कोणी नाहीं." पिटरनें उत्तर दिलें. इतक्यांत कोंबडा आरवला. पिटरला येशूच्या वचनाची आठवण झाली. पण आतां काय?

नंतर येशूला मुख्य उपाध्यायाकडे नेण्यांत आलें. "मानवी हातांनीं बांधलेलें हें मंदिर उध्वस्त करून टाकीन आणि त्या जागीं तीन दिवसांत नवें मंदिर उभारीन" असें येशू म्हणाल्याचें कांहीं पुजारी सांगू लागले. 'मी यहुद्यांचा राजा आहें' ही तर येशूची नेहमींचीच घोषणा होती. येशूला लाथाबुक्यांचा मार देऊन व फटके मारून राजसिंहासनापुढें नेण्यांत आलें.

येशू शांत होता. पाखंडी, राजद्रोही अशा शेलक्या विशेषणांचा त्याच्यावर वर्षाव होई. 'अहो, यहुद्यांचे राजे!' म्हणून कोणी त्याला चिडवीत. कोणी तर त्याच्या तोंडावर थुंकले देखील. पण त्याची शांति डळमळली नाहीं. झंझावातानें मेरुपर्वताला का कंप सुटणार? येशूचें एकच म्हणणें—"मी यहुद्यांचा राजा आहें. मी देवाचा पुत्र आहें."

तो दिवस सणाचा होता. त्यावेळच्या कायद्याप्रमाणें एका गुन्हेगाराला त्या दिवशीं माफी मिळत असे. येशूच्या बरोबर बारब्बा नांवाच्या दरवडेखोराची चवकशी होणार होती. न्यायाधीशानें विचारलें, "माफी कोणाला द्यावयाची?" अज्ञ व खुनशी पुजारी ओरडले, "बारब्बाला–बारब्बाला." "–आणि येशूला?" "क्रुसावर चढवा, क्रुसावर." मूढांनीं एकच गर्जना केली. दरवडेखोराला माफी मिळाली. देवाचा पुत्र सुळावर चढला.

मग येशूला किरमिजी रंगाचा झगा चढवून त्याच्या डोक्यावर कांट्यांचा मुकुट चढविण्यांत आला आणि त्याला सुळावर चढविलें. हाय ! अहंकारानें भ्रमिष्ट झालेल्या त्या लोकांनीं त्याला खिळे मारिले. असह्य वेदना होत होत्या, डोळ्यांपुढें अंधारी येत होती, तरी येशूनें कोणाला शिव्या दिल्या नाहींत वा शोक केला नाहीं. त्याची प्रार्थना चालू होती कीं, " परमेश्वरा, या लोकांना तूं क्षमा कर, कारण आपण काय करतों हें त्यांना कळत नाहीं. "

अखेर हा परमेश्वराचा प्रेषित, महान् संत आणि दयेचा सागर अंत पावला. त्यावेळीं सर्वत्र अंधार पडला, मंदिरांतील पडदा वरपासून खालपर्यंत उभा चिरला गेला, खडक दुभंग झाले व थडगीं फुटलीं. येशूची उत्तरक्रिया करण्यांत आली. पण तीन दिवसांनीं त्याची समाधि उकरून पाहतात तों त्याचा देह कोठें आहे ? दया, नीति, आणि आत्मयज्ञ यांचा संदेश मानवजातीला देऊन तो देवाचा प्रिय पुत्र केव्हांच आपल्या पित्याच्या दिव्य लोकीं निघून गेला होता !

# ४. महंमद पैगंबर.

इसवी सन ५६९ च्या एप्रिल महिन्यांत एके रात्रीं साऱ्या जगांत एकामागून एक चमत्कार घडून आले. सावा सरोवराचें पाणी हटत हटत मूळच्या जिवंत झऱ्यापर्यंत गेलें. तैग्रीस नदीला महापूर आला. पर्शियाचा मुख्य न्यायाधीश खादी याला असें स्वप्न पडलें कीं, एका अरबानें आपला भयंकर उंट जिंकून नेला. शतकानुशतकें जळत राहिलेला पारसिकांचा पवित्र अग्नि किंचित् काळ लुप्त झाला आणि जगांतील कित्येक मूर्तींना तडे गेले. या चमत्कारांतच मक्का शहरीं अमीना नांवाच्या स्त्रीनें एका पुत्ररत्नास जन्म दिला. हा मुलगा जन्माला येतांच भोंवतालच्या प्रांतांत दिव्य प्रभा फाकली आणि त्याच्या तोंडांतून शब्द बाहेर पडले, " ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे आणि मी त्याचा प्रेषित आहें. " मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद पैगंबर तो हाच.

महंमदाचा बाप अबदुल्ला महंमदाच्या जन्मापूर्वींच मृत्यु पावला होता. त्यानें महंमदाकरितां कांहीं जिंदगी अशी ठेविली नव्हतीच. थोडीं मेंढरें, पांच उंट, आणि एक गुलाम बाई ही काय ती महंमदाची वडिलोपार्जित मिळकत. महंमदाची आई अमीना पतीच्या शोकानें आणि संसाराच्या कष्टांनीं अगदीं खंगून गेली होती. आपल्या पुत्राचें संगोपन आपल्या हातून नीट तऱ्हेनें होईल अशी खात्री तिला वाटेना. म्हणून तिनें शेजारच्या डोंगरी मुलुखांतील बेदुइन अरबांच्या टोळीपैकीं हलेमा नांवाच्या एका दाईला बोलावून घेतलें आणि महमंदाला तिच्या ओटींत घातलें. हलेमा छोट्या महंमदाला घेऊन घरची वाट चालूं लागली.

वाटेंत एक चमत्कार घडून आला ! हलेमा महंमदाला घेऊन ज्या खेचरावरून जात होती त्याला अकस्मात वाचा फुटली आणि तें म्हणालें, "अहो ! देवाच्या प्रेषिताला मी माझ्या पाठीवरून नेत आहें." रानांत इतस्ततः बागडणाऱ्या कोंकरांनीं क्षणभर थांबून लहानग्या महंमदापुढें माना लवविल्या आणि आकाशांतून वेगानें जाणारा चंद्र महंमदाच्या सन्मानार्थ कांहीं काळ थांबला.

हलेमाच्या झोपडींत कसलीच ददात उरली नाहीं. महंमदाचें आगमन होतांच भोंवतालचीं कुरणें हिरवींगार दिसूं लागलीं; विहिरी व झरे पाण्यानें भरून वाहूं लागले; आणि मेंढरांचे कळप दसपट वाढले. अशा स्थितींत हलेमाच्या प्रेमळ संगोपनाखालीं महंमद वाढूं लागला. वयाच्या तिसऱ्या वर्षीं हलेमाचा मुलगा मसऊद याच्याबरोबर महंमद खेळत असतां चकचकीत पंखांचे दोन देवदूत अंतराळांतून तेथें आले. त्यांपैकीं जेब्राइलनें महंमदाला कुरणावर निजाविलें आणि हलक्या हातानें त्याचें हृदय बाहेर काढलें. मग त्या हृदयांतील पापमय आणि वाईटसाईट जें थोडेंफार होतें तें सर्व काढून टाकून त्यानें त्यांत श्रद्धा, ज्ञान, आणि तेज भरलें व नंतर तें हृदय महंमदाच्या शरीरांत जसेंच्या तसें बसवून टाकलें. इतकें होतांच ते दोघे देवदूत निघून गेले.

हा सर्व प्रकार पाहून मसऊद गोंधळून गेला. तो धावत धावत आपल्या आईकडे आला. तिला त्यानें घडलेली सर्व हकीकत सांगितली. असलें हें विलक्षण मूल आपल्या घरीं नको म्हणून हलेमानें महंमदाला परत मक्केस आणिलें आणि अमीनाच्या ( त्याच्या आईच्या ) हवालीं केलें. यापुढें महंमदाचा सांभाळ अबू तालेब नांवाच्या त्याच्या चुलत्यानें केला.

महंमद साधारण मोठा झाल्यावर उद्योगधंदा करूं लागला. त्यावेळीं मक्केहून सीरिया, येमेन वगैरे ठिकाणीं बराच मोठा व्यापार चाले. तेव्हां व्यापारी काफल्यांबरोबर महंमद हमेशा सफरी करीत असे. हा धंदा म्हणजे बराच रुक्ष आणि कष्टाचा. पण महंमदाची प्रतिभा त्यांतच प्रफुल्लित झाली. लांबलांबच्या सफरींत, खालीं विस्तीर्ण मैदान आणि वर अनंत आकाश असे कित्येक दिवस जात. रानवारे सारखे वाहत असत. अशा वेळीं महंमदाचें चिंतनशील मन स्वैर भरारी घेऊन तत्त्वज्ञानांत विहार करूं लागावें यांत आश्चर्य नाहीं. दाऊद आणि मूसा या प्राचीन प्रेषितांचें तरुणपण असेंच रानमाळावर गेलें होतें. म्हणून महंमदानें कधीं कधीं मौजेनें म्हणावें, " दाऊद, मोशा, किंवा मी यांच्याप्रमाणें खुल्या पठारावर ज्यांनीं काळ घालविला नाहीं, त्यांना कधींच देवाचा साक्षात्कार होणार नाहीं. " असो. या सफरींतच महंमदाला अरब लोकांची स्थिति सूक्ष्मपणानें पाहण्याची संधि मिळाली.

महंमदाचे वेळीं अरब अगदीं रानटी स्थितींत होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्या असंख्य टोळ्या असत. प्रत्येक टोळीचें दैवत वेगळालें. शहरबाजारांतून राहणारे अरब आणि उंटावरून भटकणारे अरब असे दोन मुख्य तट त्यांच्यांत पडले. असून हे स्थायिक आणि भटके दोनही लोक एकमेकांना तुच्छ लेखीत. देश, धर्म किंवा संस्कृति यांपैकीं कोणतेंच बंधन त्यांना एकत्र आणण्यास नव्हतें. त्यामुळें अरब म्हणजे एक विस्कळित व रानटी लोकांचा समूह होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. सिंह, घोडा, दगड, झाडें ह्या देवांच्या मूर्ति कल्पून

त्यांची पूजा करण्यांत अरबांना पुण्य वाटे. स्त्रियांना ते गुलामासारखें वागवीत. बापाच्या व नवऱ्याच्या मिळकतींवर स्त्रीचा कांहींचाहि हक्क नसे. मुलींना जिवंत पुरण्याची चाल त्यांच्यांत होती. मृत्यूनंतर माणसांचें काय होणार आहे याबद्दल अरब बेफिकीर असत. लूटमार, चैन, दारू, आणि जुगार एवढें असलें कीं स्वर्गसुख मिळालें असें त्यांना वाटे.

ही सर्व स्थिति अवलोकन केल्यावर महंमदाला दुःख झालें आणि अरब लोकांची सुधारणा केली पाहिजे अशी त्याला तळमळ लागली. याच सुमारास खादिजा नांवाची एक श्रीमंत विधवा बाई मक्का येथें राहत होती. ती महंमदाहून बरीच मोठी होती. महंमदाचें सौंदर्य, बुद्धिमत्ता आणि स्वभाव यांची खादिजावर चांगलीच मोहिनी पडली आणि त्याच्याशीं विवाह करावा असें तिला वाटूं लागलें. महंमदालाहि तिजबद्दल प्रेम वाटत होतेंच. लौकरच दोघांचें लग्न झालें. सुखाचा संसार चालू झाला. खादिजा महंमदाला देवाप्रमाणें मानी. या लग्नामुळें उद्योगधंद्याबद्दलची कटकट कायमची टळून महंमदाला चांगलें स्वास्थ्य मिळालें आणि चिंतनांत व विचारांत त्याचा काळ शांतपणें जाऊं लागला.

महंमदाच्या डोक्यावर अधांतरीं नेहमीं एक अभ्रपटल दिसे, तसेंच त्याचीं पावलें कधींहि जमिनीवर उमटत नसत. या व अशा लक्षणांवरून तो प्रेषित असावा असें भाविकांना वाटूं लागलें आणि इमानी म्हणून महंमदाची कीर्ति लौकरच चोहींकडे पसरली. एकदा काबा मंदिरांत कांहीं दुरुस्ती चालली होती. हें मंदिर म्हणजे अरबांचें तीर्थक्षेत्र. तेथील झमझम विहीर म्हणजे इस्माईलकरितां ( अरबांचा पूर्वज ) परमेश्वरानें निर्माण केलेला झरा अशी त्यांची श्रद्धा. साहजिकच धर्मभोळ्या अरब जातींत हक्काकरितां तंटे लागत. काबा मंदिरांत एक पाषाण होता. हा मूळचा पांढरा शुभ्र असून स्वर्गातून पडला, परंतु पापी मानवांच्या स्पर्शानें तो काळा झाला असें अरब मानीत. हा पाषाण एका ठिकाणाहून दुसरीकडे न्यावयाचा होता. तो कोणीं न्यावा याविषयीं चार

अरब जमातींत वाद लागला. अखेर असें ठरलें कीं, दुसरे दिवशीं सकाळीं जो कोणी इसम प्रथम काबा मंदिराकडे येईल त्यानें तो पाषाण उचलावा. सुदैवानें तो इसम महंमदच निघाला. लोकांना आनंद झाला. प्रथम महंमदानें तंट्याचें कारण ऐकून घेतलें. मग त्यानें एक मोठें चौकोनी कापड जमिनीवर आंथरलें आणि त्यावर तो पाषाण ठेवला. नंतर चारही जमातींच्या पुढाऱ्यांना बोलावून त्यांपैकीं प्रत्येकास कापडाचा एक एक कोपरा धरण्यास सांगितलें. अशा रीतीनें महंमदानें मोठ्या चातुर्यानें त्यांचें समाधान केलें.

यावेळीं महंमद एकाद्या सामान्य घरगुती वळणाच्या मनुष्याप्रमाणें आयुष्य घालवीत होता. त्याचा लौकिक चांगला होता. पाहतां क्षणींच तो लोकांवर आपली छाप पाडी. तो मध्यम उंचीचा पण मजबूत बांध्याचा होता. भव्य कपाळ, टवटवीत वर्ण, बाकदार नाक, काळेभोर तेजस्वी डोळे, लांब सडक काळी दाढी, आणि ओठ विलग होतांच हिरकण्यांप्रमाणें चमकणारे दांत यांमुळें त्याचा चेहरा फारच आकर्षक दिसे. त्याची राहणी अत्यंत साधी होती. खजूर व पाणी हें त्याचें रोजचें जेवण. जेवावयाचे वेळीं कोणी अतिथि आला तर महंमदानें आपलें ताट त्याच्यापुढें सरकवावें. जी वागणूक श्रीमंताशीं तीच गरीबाशीं. आपला झेद नांवाचा नोकर वारला तेव्हां महंमद धाय मोकलून रडला. एकदा मित्र झाला कीं त्याला जन्मभर अंतर द्यावयाचें नाहीं. आंत एक आणि बाहेर एक अशा वागण्याचा तर त्याला फार तिटकारा होता. अशा सद्गुणांमुळें महंमद अत्यंत लोकप्रिय व्हावा यांत काय नवल ?

वयाला तीस वर्षें लोटल्यानंतर महंमदानें एकांतांत जाऊन दीर्घकाळपर्यंत चिंतन करण्याचा क्रम आरंभिला. उपासतापास आणि प्रार्थना हीं तर नेहमींच चालू असत. वराका नांवाचा त्याच्या सासुरवाडचा एक नातलग होता. हा मोठा विद्वान् व ज्योतिषी म्हणून गणला जाई.

बायबलचें अरबी भाषेंत प्रथम रूपांतर केलें तें यानेंच. या गृहस्थाशीं महंमद धार्मिक विषयावर चर्चा करी. व्यापाराच्या निमित्तानें जे कित्येक यहुदी व ख्रिस्ती तेथें येत त्यांच्याशीं संभाषण करून त्यानें निरनिराळ्या लोकांच्या धर्मकल्पनांचें ज्ञान करून घेतलें. तथापि या सर्वांपेक्षां महंमदाला खरें ज्ञान झालें तें अंतःस्फूर्तीनेंच. आपण परमेश्वराचे प्रेषित आहों असा विश्वास त्याच्या मनांत अधिकाधिक बळावूं लागला. ईश्वरी संदेश त्याला सदैव ऐकूं येई. कित्येकदां तो देहभाव हरपून त्याच तंद्रेंत तासचे तास राही. हारा पर्वत हें त्याचें समाधीचें ठिकाण होतें.

अशाच तंद्रेंत महंमद एके रात्रीं असतांना त्याच्या कानांवर साद आली. त्यानें डोळे उघडून पाहिलें तों एक तेजाचा लोळ त्याच्यापुढें आला. त्या दीप्तीनें महंमदाला क्षणभर मूर्च्छाच आली. पण पुनः तो भानावर आला. पाहतो तों मनुष्यरूप धारण केलेला एक देवदूत पुढें उभा राहिला. त्याच्या हातांत एक रेशमी वस्त्र होतें. त्यावर चकचकीत अक्षरांत लिहिलेला लेख होता. तें वस्त्र महंमदापुढें धरून देवदूत म्हणाला, " वाचून पहा ! " महंमदानें उत्तर दिलें, " मला वाचतां येत नाहीं. " देवदूत पुनः म्हणाला, " अरे ! देवाचें नांव घे. त्यानेंच ही सृष्टि उत्पन्न केली. त्यानें एका रक्तबिंदूपासून मनुष्य निर्माण केला. त्या परमात्म्यानें मनुष्याला जें माहीत नव्हतें त्याची त्याला ओळख करून दिली. " एवढें ऐकतांच महंमद वाचूं लागला. त्याला वाचनाचें ज्ञान झालें. महंमदानें या रेशमी कापडावर जें वाचलें तेंच पुनः कुराणांत सांगितलें आहे. महंमदाचें वाचन संपतांच देवदूत म्हणाला, " धन्य महंमदा ! तूं खरोखरच परमेश्वराचा प्रेषित आहेस. मी त्याचा जेब्राएल नामक दूत आहें. " इतकें बोलून जेब्राएल अंतर्धान पावला.

हा साक्षात्कार होऊन गेल्यावर महंमद थरथर कांपत होता. आपली प्रेमळ गृहिणी खादिजा हिला त्यानें प्रथम हा चमत्कार सांगितला. तिचा आनंद गगनांत मावेना. ती एकदम उद्गारली, " महाराज ! देवदूतानें

सांगितलें त्यांत असत्य तें काय आहे बरें ! आपण भाऊबंदांशीं प्रेमळ-पणानें वागतां; शेजाऱ्याकडे ममतेनें पाहतां; भूतदया हा आपला धर्म आहे; अतिथिसत्कार हें आपलें ब्रीद आहे. स्वतःच्या शब्दाची आप-णाला चाड आहे. आपण सत्याचे पाठिराखे आहां. खरोखर त्या गुणां-वरूनच आपण प्रेषित आहां हें स्पष्ट दिसत नाहीं काय ?" वराकाला ही गोष्ट कळतांच तोहि आनंदानें म्हणाला, "खादिजा, तुझें म्हणणें चूक नाहीं. महंमद खरोखरच प्रेषित आहे; प्राचीन काळीं मूसाकडेदेखील असाच देवदूत परमेश्वरानें धाडिला होता." खादिजानें या नव्या प्रेषि-ताचें शिष्यत्व पत्करलें. नंतर झीड नांवाच्या एका नोकरानें महंमदी धर्माची दीक्षा घेतली. महंमदी धर्माचे हे पहिले दोन अनुयायी होत.

यानंतर महंमद उघडपणें आपल्या धर्माचा उपदेश करूं लागला. तो उच्च रवानें सांगे कीं,

"ईश्वर एकच आहे. आणि मी त्याचा प्रेषित आहें. स्वर्ग आणि पृथ्वी हीं परमेश्वराच्या मालकीचीं आहेत. त्याला भूतभविष्याचें ज्ञान आहे. पण त्याच्या ज्ञानाची कल्पना आपणांला कशी येणार ?

एक दिवस असा उजाडेल कीं, त्या वेळीं सूर्यावर आच्छादन पडेल, तारे आकाशांतून निखळून पडतील, गुराढोरांची आबाळ होईल, समुद्र उकळूं लागतील, आणि मृतदेहांत पुनः आत्मे शिरून ते संचार करूं लागतील.

त्यावेळीं आज जमिनींत जिवंत गाडलेल्या मुली जाब विचार-तील. प्रत्येक प्राण्याची पापपुण्याची नोंद तपासली जाईल.

दुसऱ्याशीं खोटेपणानें वागूं नका. सत्यावर खोटेपणाचें पांघरूण कधीं घालूं नका. नेहमीं विनम्र असा. गर्विष्ठावर परमेश्वर प्रेम करीत नाहीं.

मनुष्य मेला म्हणजे शेजारी विचारतात कीं, त्यानें संपत्ति काय ठेविली, पण देवदूत विचारतात कीं त्यानें कोणतीं सत्कृत्यें करून स्वर्गांत पुण्य संपादून ठेविलें ?

न्यायासारखा पाठीराखा नाहीं, बुद्धिसारखा शास्ता नाहीं, आणि सत्यासारखा सखा नाहीं. ''

महंमदाच्या धर्माला जसजसे अधिकाधिक लोक मिळूं लागले तसतशीं पुजाऱ्यांचीं धाबीं दणाणलीं. मक्केच्या सभोंवार असंख्य देवांच्या मूर्ति होत्या. भाविक अरबांच्या झुंडीच्या झुंडी येथें येऊन मूर्तींना नैवेद्य व दानें अर्पण करीत. साहजिकच पुजाऱ्यांना गडगंज सामुग्री आणि द्रव्य मिळत असे. पण महंमदानें मूर्तिपूजेविरुद्ध बंड पुकारतांच आपल्या वैभवावर ही मोठीच गदा आली असें त्यांना वाटूं लागलें. लोकांच्या अज्ञानावर ज्यांची चैन अखंड चाललेली असते त्यांना नवीन विचाराचा अलौकिक पुरुष म्हणजे एक मोठीच आपत्ति! पुजाऱ्यांनीं महंमदाचें मन वळविण्याचे नाना तऱ्हेचे उपाय करून पाहिले. त्याच्याशीं गोडीगुलाबीचें बोलणें केलें, त्याला पैशाची लालूच दाखविली, त्याच्या चुलत्याकडून त्याला सांगून पाहिलें; अखेर त्याला धाकदपटशाहि दिला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. महंमदानें आपला उपदेश चालूच ठेवला. हळूहळू त्याच्या अनुयायांची संख्या चोहींकडे फैलावूं लागली. हें पाहून पुजाऱ्यांनीं त्याचा छळ करण्यास सुरवात केली. मध्यंतरीं महंमदाचा चुलता आणि त्याची प्रेमळ पत्नी मरण पावली. त्यामुळें त्याला मायेचें असें कोणी राहिलें नाहीं. त्याला फार दुःख झालें. पण त्याचें धर्मोपदेशाचें व्रत मात्र मुळींच ढळलें नाहीं.

घरगुती दुःखांनीं आणि दांभिक भिक्षुकांच्या छळांनीं पीडित असतांना महंमदाला परमेश्वराचें दर्शन घडलें. तो प्रसंग फारच बहारीचा आहे. ती रात्र भयंकर काळोखाची होती. झाडाचें पान हलत नव्हतें; कीं नदीच्या खळखळणाऱ्या पाण्याचा आवाज होत नव्हता. इतक्यांत देवाचा दूत जेब्राएल आला आणि महंमदाला म्हणाला, " ऊठ, मजबरोबर चल. '' महंमदानें त्याप्रमाणें केलें. मग जेब्राएलनें महंमदाला एका शुभ्र घोड्यावर बसविलें आणि मक्केहून जेरुसलेम येथील देवळांत

नेलें. तेथें अब्राहम, मूसा, आणि येशु हे प्रेषित महंमदाला भेटले. त्यांच्या समवेत महंमदानें प्रार्थना केली. इतक्यांत एक तेजाची शिडी स्वर्गांतून खालीं सोडली गेली. तीवरून जेब्राइलनें महंमदाला पहिल्या स्वर्गाला नेलें. हा स्वर्ग रुप्याचा होता. मग दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या याप्रमाणें सहाव्या स्वर्गापर्यंत महंमद येऊन थडकला. वाटेंत त्याला अनेक चमत्कार दिसले. सहाव्या स्वर्गांत जो मुख्य देवदूत होता त्याचें निम्में अंग बर्फाचें आणि निम्में अग्नीचें होतें ! या ठिकाणीं मूसा बसला होता. महंमदाला पाहतांच त्याला प्रेमाचें भरतें आलें. आपल्या पाठी-मागें मानवजातीला सद्गति देण्यास हा आला आहे हें पाहून मूसाच्या डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. नंतर महंमद सातव्या स्वर्गांत आला. येथें त्याला अब्राहम भेटला. या स्वर्गांत सारींच आश्चर्यें होतीं. उदा-हरण म्हणून पुढील एकच सांगितलें तरी बाकीच्यांची कल्पना येईल. एक प्रचंड प्राणी तेथें बसला होता. त्याला ७० हजार डोकीं होतीं. प्रत्येक डोक्याला ७० हजार तोंडें होतीं आणि प्रत्येक तोंडाला ७० हजार जिभा होत्या आणि प्रत्येक जीभ ७० हजार भाषा बोलत होती ! आणि या साऱ्या भाषांचा अर्थ एकच; तो म्हणजे परमेश्वराचें नामसंकीर्तन.

या देखाव्याचें आश्चर्य करीत महंमद उभा आहे तोंच आपण ईश्वरी सिंहासनाच्या उजव्या बाजूला असलेल्या कमलतरूवर आलों आहों असें त्याला कळून आलें. असंख्य देवदूत प्रभूचीं स्तोत्रें आळवीत होते, नाना तऱ्हेचे पक्षी कुराणांतील वाक्यें गात होते. येथून चार नद्या निघाल्या होत्या. त्यांपैकीं दोन पृथ्वीवर आल्या होत्या. त्या म्हणजे नाईल आणि युफ्राटीस. येथून तेजोमय व अंधाऱ्या अशा २–३ प्रदेशांतून गेल्यावर महंमद जगन्नियन्त्या प्रभूपाशीं येऊन पोंचला, तोहि बऱ्याच अंतरावर. प्रभूवर २० हजार पडदे होते. कारण त्याची देदीप्यमान मूर्ति प्रत्यक्ष पाहणें महंमदाला अशक्यच झालें असतें. मग प्रभूनें महंमदाच्या हृदया-वर हात ठेविला. महंमदाला नवीन दिव्य तेज आपल्या अंगांत संचा-

रलें आहे असें वाटूं लागलें. भोंवतीं दीप्तिसुवास पसरला. प्रभूनें महंमदाला ५० प्रार्थना सांगितल्या. इतकें झाल्यावर महंमद आल्या वाटेनें पृथ्वीवर आला.

दुसरे दिवशीं उपासनेच्या वेळीं महंमदानें विश्वरूपदर्शनाची सर्व हकीकत भाविकांना सांगितली. ती ऐकून अनुयायी सद्गदित झाले. पण कुरेशी ( मक्केकर ) मात्र महंमदाला ढोंगी म्हणूं लागले. दिवसेंदिवस त्याचा असह्य छळ होऊं लागला. एकदां क्रूर कुरेशांनीं महंमदावर दगडांचा वर्षाव केला व अखेर तर त्याचे प्राण घेण्याचेंच कारस्थान त्यांनीं आरंभिलें.

आतां मात्र मक्केंत राहणें धोक्याचें आहे हें महंमदाला कळून चुकलें. त्याचे अनुयायीहि त्याला मक्का सोडून जाण्याचा आग्रह करूं लागले. अखेर अबूबकरला बरोबर घेऊन महंमदानें मक्केला रामराम ठोकला. ( या पलायनाला ‘ हिजरा ’ असें इस्लामी लोक म्हणतात. ) कुरेशांचे मारेकरी त्याच्या पाठीवर होतेच. महंमदानें मदीना शहराच्या रोखानें पळण्यास आरंभ केला. वाटेंत शत्रु फारच जवळ येऊन ठेपले म्हणून त्यांना चुकविण्याकरितां तो थोरगिरीच्या गुहेंत दडून बसला. फक्त एकटा अबूबकर त्याचेबरोबर होता. गुहेंतल्या भयाण एकांतांत किंचित् सभय होऊन अबूबकर म्हणाला, “ हजरत, आपण दोघेच येथें आहों; नाहीं ! ” यावर महंमदानें तत्काळ उत्तर दिलें, “ नाहीं. तिघे. ” “ तिसरा कोण ? ” चकित होऊन अबूबकरनें विचारलें. “ तिसरा परमेश्वर. ”

आणि खरोखरच परमेश्वर त्यांचें संरक्षण करीत होता. कारण महंमदाच्या पाठलागावर असलेले कुरेशी अगदीं गुहेजवळून गेले. एकाला तर महंमद गुहेंत असल्याचा संशयहि आला. पण काय चमत्कार ? तेवढ्यांत एक झाड तेथें विस्तार पावलें आणि त्याच्या फांद्या गुहेच्या तोंडावर पसरल्या. त्यांत एका कबूतरानें आपलें घरटें केलें आणि एक-

कोळ्यानें आपलें जाळें विणिलें. साहाजिकच कुरेशांना वाटलें महंमद आंत असता तर हें गुहेच्या प्रवेशद्वारांतच असलेलें कबूतराचें घरटें आणि कोळ्याचें जाळें शाबूद कसें राहिलें असतें? कुरेशांनीं रस्ता सुधारला. महंमदावरचें गण्डान्तर टळलें.

मादिनेच्या आश्रयाला आलेला पैगंबर थोड्याच दिवसांत तेथला अधिपति झाला. मझजीदु-न नबी ( प्रेषिताची मशीद ) या नांवानें पुढें प्रख्यात झालेलें मंदिर उभारण्यांत त्यानें जातीनें श्रम घेतले. त्याची वाग्दत्त वधू आयेषा हिचा त्याच्याशीं येथेंच विवाह झाला. आयेषा-नंतरहि महंमदानें इतर अनेक स्त्रियांशीं विवाह केले. पण हृदयानें अत्यंत प्रेमळ असल्यानें कोणत्याहि पत्नीशीं त्यानें प्रतारणा केली नाहीं. " सुशील गृहिणी ही माणसाची सर्वांत मोठी संपत्ति आहे " असें तो नेहमीं म्हणे. मादिना येथें त्याच्या राहणींत पराकाष्ठेचा साधेपणा दिसून येई. भाकरी आणि खजूर हें त्याचें अन्न. झाडणें, चूल पेटविणें असलीं कामेंदेखील महंमद स्वतःच करी. दररोज सामुदायिक प्रार्थना करा-वयाची हा त्याचा क्रम चालूच होता.

पण पाखंडी कुरेशांनीं त्याला शांतपणें नांदूंच द्यावयाचें नाहीं असा जणूं कांहीं संकल्पच केला होतासें दिसतें. त्यांनीं एकदम उचल केली. आतां मात्र महंमदानें उग्ररूप धारण केलें. शांतवृत्ति सोडून त्यानें तल-वार हातांत घेतली. साधूची भूमिका सोडून तो योद्धा बनला. रणां-गणांत उडी घेऊन त्यानें अलम् दुनियेला गर्जून सांगितलें कीं, " सत्या-करितां आणि धर्माकरितां जे तलवार हातांत धरतात त्यांना स्वर्गप्राप्ति होते. आजवर सर्वसाक्षी प्रभूनें अनेक मोठे प्रेषित जगावर धाडिले. मूसाचें दैवी सामर्थ्य, सालोमनचें शहाणपण आणि वैभव, येशूची शुचिता, सत्यप्रीति आणि त्रिकालज्ञता हे केवढे असामान्य गुण! पण अश्रद्ध मनुष्यांनीं त्यांचा अनादर केला. म्हणूनच माझ्या हातांत तलवार देऊन प्रभूनें मला जगावर पाठविलें आहे. रुक्ष तर्कवाद अथवा पांडित्य याचा दिमाख माझ्यापुढें चालणार नाहीं. "

मग कुरेशांची आणि महंमदाची जंगी लढाई सुरू झाली. तींत बऱ्याच चकमकी व लढाया होऊन अखेर महंमदाला जय मिळाला. मध्यंतरीं कांहीं दिवस एक तात्पुरता तह झाला होता; पण त्यांतल्या अटी कुरेशांनीं मोडल्या म्हणून पैगंबर मक्केवर चालून गेला. यावेळीं त्याजजवळ मातबर सैन्य होतें. मक्का काबीज करून तो विजयानंदानें शहरांत शिरला. त्यानें पाखंड्यांना कायमची जरब बसली आणि सामान्य जनतेला पैगंबराविषयीं अलौकिक आदर वाटूं लागला. दूरदूरचे लोक महंमदाच्या दर्शनास धावून आले आणि अल्पावकाशांतच सारा अरबस्तान पैगंबराचा एकनिष्ठ भक्त बनला.

शत्रूकडील कैद्यांना आणि शरणागतांना महंमद अत्यंत सौजन्यानें वागवी. पश्चात्तापानें एकाद्याचें अंतर जळूं लागलें आहे एवढी खूण महंमदाला पटली कीं त्याला महंमदानें क्षमा केलीच. एकदां डरथुर नांवाच्या त्याच्या वैऱ्यानें त्याला बेसावधपणें गांठलें आणि तलवार उपसून म्हटलें, "बोल, महंमद, आतां तुझें रक्षण कोण करणार?" महंमदानें लगेच शांतपणानें उत्तर दिलें "परमेश्वर." डरथुर पार थिजून गेला आणि त्याच्या हातचें खड्ग गळून पडलें. मग महंमदानें तें तत्काल उचलून डरथुरला खालीं पाडलें आणि त्याच्या छातीवर बसून त्याला विचारलें, "बोल, आतां तुझें रक्षण कोण करणार?" डरथुराची भीतीनें बोबडी वळली होती. तो मोठ्या कष्टानें अडखळत म्हणाला, "को–को–णी ना—हीं." महंमदानें खड्ग दूर झुगारून दिलें आणि डरथुरला जवळ घेऊन तो म्हणाला, "अरे, असें कां? मी आहें कीं तुझें रक्षण करायला." आपल्या औदार्यानें लोकांना जन्माचे मित्र करून टाकावयाचें ही हातोटी महंमदाचे ठिकाणीं अजब होती.

अरबस्तानावर हुकमत मिळाल्यानंतर इतर देशांत महंमदानें धर्मप्रसार सुरू केला. त्यानें ग्रीस, इराण इ० देशांत आपले वकील पाठविले आणि तेथील राजांना इस्लामी धर्म स्वीकारण्याची विनंति केली.

ग्रीसच्या राजानें महंमदाच्या विनंतिपत्राला नम्रतापूर्वक नकार दिला. पण इराणच्या बादशहानें मात्र त्या पत्राचे उद्दामपणानें तुकडे तुकडे केले. ही हकीकत कळतांच महंमद संतप्त झाला. " परमेश्वर इराणच्या राज्याचे असेच तुकडे तुकडे करील. " अशी शापवाणी त्याच्या तोंडून बाहेर पडली; आणि हें भविष्य महंमदाच्या हयातींतच खरें झालें.

धर्मप्रसाराकरितां नानातऱ्हेचा छळ सोसून आणि अनेक लढाया झुंजून महंमदाची तब्बेत ढासळली. आतां जीवनसंध्येंत अखेरची यात्रा करावी म्हणून तो मदिनेहून मक्केला जायला निघाला. या वेळीं त्याचे-बरोबर एक लक्ष यात्रेकरू होते. तऱ्हेतऱ्हेच्या माळा घालून सजविलेले शेकडों उंट बरोबर होते. मजल दरमजल करीत मोठ्या थाटानें महंमद मक्केला आला. त्यानें यात्रेचे धार्मिक विधि यथासांग केले. तो इतका क्षीण झाला होता, कीं काबा मंदिराच्या भोवतीं प्रदक्षिणा घालणें किंवा साफा व मरवा ह्या पवित्र टेकड्यांचे दर्शनास जाणें या गोष्टी देखील त्याला उंटावरूनच कराव्या लागल्या. अखेर असंख्य यात्रेकरूंचा मेळा त्याचे भोवतीं जमला. त्यांना त्यानें इस्लाम धर्माच्या तत्त्वाचा सुंदर उपदेश केला. इतक्यांत एक स्वर्गीत ऐकूं आलें—महंमदाच्या धर्माला आज पूर्णता आली आणि त्याच्यांत ईश्वरी तेज पूर्णांशानें प्रकटलें, असा त्या गीताचा आशय होता. हें गीत ऐकून पैगंबराच्या उंटानें गुढगे टेकले. हें गीत म्हणजे महंमदाच्या आयुष्यांतील अखेरचा साक्षात्कार होय.

मक्केहून परत मदिनेला आल्यानंतर महंमदाची तब्येत सावरली नाहींच. अखेर एके दिवशीं अत्यंत क्षीणता आली असतांहि आपल्या अनुयायांसह त्यानें एकवेळ प्रार्थना केली. नंतर त्याला भयंकर ग्लानि आली. ती दूर झालीच नाहीं. आणि ८ जून ६३२ रोजीं हा महान् परमेश्वरभक्त आणि असंस्कृत मानवी समाजाला धर्माचें संजीवन देणारा कर्तृत्वशाली पुरुष इहलोक सोडून गेला !

# ५. झरतुष्ट्र,

सत्यधर्मांचा उद्धारक इराणांत जन्मास येणार आहे याविषयींचें भविष्य प्राचीन काळापासूनच वर्तविलें जात असे. झरतुष्ट्राच्या जन्मापूर्वी सुमारें ३००० वर्षें मानवजातीचा जनक जो स्वर्गीय वृषभ त्यानें झरतुष्ट्राचें रूप धारण केलें होतें. पुढें कांहीं शतकांनीं एकदां सुवर्णयुगांतील सम्राट् जमशेद याला कोणती अंत:स्फूर्ति झाली नकळे. तो दुष्ट दानवांना उद्देशून एकदम म्हणाला, "अरे नीचांनो, कांहीं काळ थांबा. तुमचें पारिपत्य करून सत्यधर्माची स्थापना करणारा महात्मा झरतुष्ट्र जन्मास येणार आहे." त्या नंतर—म्हणजे झरतुष्ट्र जन्मास येण्यापूर्वी ३०० वर्षें—एका बैलाला अकस्मात् वाचा फुटली आणि धर्मोद्धारकाच्या आगमनाचें भविष्य त्यानें जगाला सांगितलें. अशा रीतीनें झरतुष्ट्राच्या अवताराची कल्पना लोकांना आधींच आलेली होती.

सर्वशक्तिमान् व जगन्नियंता जो आहूरमझ्द त्याचें तेज स्वर्गांतून भूमीवर आलें आणि झरतुष्ट्राची माता दुग्धोवा हिच्यांत प्रविष्ट झालें. तत्पूर्वीं एकदां 'हओम' या पवित्र पेयाचें प्राशन झरतुष्ट्राच्या मातापितरांनीं केलें होतें. त्या पेयांत देवदूतांनीं दैवी संपदेचीं बीजें मिसळून ठेविलीं होतीं. पुढें यथाकालीं दुग्धोवाचा प्रसूतिसमय येऊन ठेपला. त्या काळीं निरनिराळे चमत्कार होऊं लागले. सर्व चराचर सृष्टि आनंदोत्सव साजरा करीत आहे कीं काय असा भास झाला. दानवांचा राजा अर्हिमान् आपल्या अनुयायांना घेऊन पाताळांत दडून बसला. इतक्यांत झरतुष्ट्रानें बालकरूपानें जन्म घेतला. अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, तें बालक जन्मल्याबरोबर व्यॉंहा व्यॉंहा असें ओरडत नसून चांगलें खदखदा हंसत होतें. भोंवतालची मंडळी हें पाहून विस्मित झाली.

झरतुष्ट्राचा अवतार होतांच अधर्मी व चेटकी लोकांची पांचावर धारण बसली. त्याला जगांतून नाहींसा करण्याचे त्या नीचांनीं अनेक प्रयत्न केले. पण प्रत्येक वेळीं ईश्वरी शक्तीचें साह्य मिळून झरतुष्ट्र बचावला. एकदां दुष्टांनीं त्याला आगीच्या भट्टींत टाकून दिलें. तेथें दिव्य चमत्कार होऊन त्याच्या नखालाहि इजा झाली नाहीं. एकदां सायंकाळीं गुरांचीं खिल्लारें परत येत असतां चेटक्यांनीं त्याला रस्त्यावर असहाय स्थितींत ठेवून दिलें. गाईम्हशीच्या खुरांखालीं बिचारें पोर सहज चिरडलें जायचें ! पण खिल्लारें जवळ येतांच पुढचा बैल स्तब्ध उभा राहिला. त्यासमयीं मागलींहि गुरें थांबलीं आणि त्या स्वर्गीय बालकाला स्पर्शहि न करतां सावकाश बाजूनें निघून गेलीं. एकदां तर खवळलेल्या लांडग्याच्या तोंडीं त्या मुलाला देण्यापर्यंत राक्षसांची मजल गेली. पण तेव्हांहि त्या लांडग्यांनीं त्याला धक्का लावला नाहीं. अशा रीतीनें झरतुष्ट्राला नष्ट करण्याचे सर्व प्रयत्न फसल्यानें ते दुष्ट निराश झाले आणि दिवसेंदिवस त्याची त्यांना अधिकच भीति वाटूं लागली.

आयुष्याच्या आरंभींचीं अनेक गंडांतरें टळून झरतुष्ट्र मोठा होऊं लागला. दानवांनींहि ज्याच्या पुढील कर्तृत्वाची धास्ती बाळगिली आहे तो आपला मुलगा कोणीतरी थोर पुरुष होणार हें खास. असें जाणून पुरुशास्पनें ( झरतुष्ट्राच्या पित्यानें ) झरतुष्ट्राला एका चांगल्या गुरूकडे अध्ययनासाठीं ठेवलें. तेथें मोठमोठ्या गहन विषयांत झरतुष्ट्र असामान्य बुद्धिमत्ता प्रकट करूं लागला.

पंधरावे वर्षीं त्याचें उपनयन झालें. लहानपणापासून धर्मविषयाकडे त्याची प्रवृत्ति होती. ऐहिक गोष्टींचा मोह सोडून धर्माचरण करावें आणि जगाच्या कल्याणासाठीं आयुष्य वेंचावें हें त्यानें आपलें ध्येय ठरविलें. त्याच्या उदार हृदयांत निव्वळ मानवांविषयींच सहानुभूति होती असें नाहीं, तर मानवेतर प्राण्यांच्या दुःखाकडेहि तो कळकळीनें लक्ष पुरवी. सर्व सचेतन व अचेतन सृष्टि ही त्याला परमात्म्याचें रूप भासत असे. तसेंच धार्मिक व सामाजिक चालीरीतींत योग्य त्या सुधारणा करण्यासाठीं त्यानें अगदीं लहान वयांतच प्रयत्न चालविला. अग्निपूजा, हओमसेवन, भूतदया इ० धर्मतत्त्वांचा तो आदर करीत असे. पण त्यानें मूर्तिपूजेचा मात्र निषेध केला. योग्य कालीं त्याचा विवाह करावा म्हणून बापानें वधूसंशोधनास आरंभ केला. त्यावेळीं विवाहापूर्वीच आपल्या नियोजित वधूनें पडदा टाकून द्यावा असा आग्रह झरतुष्ट्रानें धरला व पित्यालाहि तो पुरवावा लागला. या व अशा दुसऱ्या अनेक गोष्टींवरून पुढें हा थोर धर्मसुधारक होणार असें स्पष्ट दिसूं लागलें.

झरतुष्ट्राच्या गांवानजिक एक पर्वत होता. हा पर्वत दिव्य तेजानें सदैव झगझगीत दिसे. मोठमोठे काळेभोर मेघ याच्या शिखराजवळ जमून मुसळधार वृष्टि करीत किंवा गडगडाट करून सारा भूप्रदेश हादरून सोडीत. या पर्वतावरील एका प्रशांत गुहेंत झरतुष्ट्र आपला सर्व काळ घालवीत असे. सुखदुःखाच्या वर्दळीनें स्थितप्रज्ञ पुरुषांच्या

मनाला ज्याप्रमाणें कोणतीच बाधा होत नाहीं त्याप्रमाणें बाहेरील खळ-बळाटानें ह्या गुहेच्या अंतर्भागांतील शांति यत्किंचित्‌हि ढळत नसे.

या ठिकाणीं जनसंमर्दाचा मुळींच संसर्ग नव्हता. भोंवतालचें वातावरण एकाद्या विशाल सरोवराप्रमाणें शांत असे. या ठिकाणीं विश्वाची संहारणी आणि उभारणी, देवाचें स्वरूप, सत्यधर्माचा अर्थ अशा गहन विषयांचें चिंतन झरतुष्ट्र अगदीं तद्रूप होऊन करी. दिवसेंदिवस त्याच्या अंतःकरणांतील संशयाचें धुकें वितळत जाऊन शाश्वत सत्याच्या प्रकाशाचे किरण त्याला दिसूं लागले आणि साक्षात्कार होण्याची भूमिका तयार झाली. चिंतनांत बराच काळ घालवून तो सभोंवारच्या प्रदेशांत संचार करूं लागला.

अखेर त्याची तपश्चर्या पुरी होऊन त्याला पहिला साक्षात्कार झाला. ती वेळ पहाटची होती. तार्‍यांचें तेज मंदावत चाललें होतें. पूर्वेकडे तांबडें फुटलें होतें. अशा वेळीं दैत्या नदीच्या कांठावर झरतुष्ट्र उभा असतां देवदूत वोहूमना ( सद्विचार ) तेथें अवतीर्ण झाला. साधारण माणसाच्या मानानें तो नऊ पट मोठा होता. त्याच्या चेहर्‍याभोंवतीं तेजोलवयें होतीं. त्याच्या हातांत एक चकचकित दंड होता. तो धर्माचा दंड होय. त्यानें झरतुष्ट्रावर मोहिनी टाकून त्याला जडदेहाचा विसर पाडला आणि परमात्मा जो आहूर मझद् त्याच्या दरबारांत नेलें.

मझ्दाचा दरबार अत्यंत वैभवशाली होता. तो दैत्या नदीच्या कांठावर भरला होता. तेज तर इतकें वोसंडत होतें कीं झरतुष्ट्राला आपली सावली दिसेना. देवदूतानें त्याला आहूर मझ्दापुढें नेलें. मग आहूर मझ्दानें त्याला परमश्रेष्ठ असें धर्मज्ञान निवेदन केलें.

हा साक्षात्कार एके दिवशीं तीनदां घडला.

पुढील काळांत असे साक्षात्कार आणखी सहा वेळां घडले. प्रत्येक खेपेस कोणींना ना कोणी देवता वा देवदूत प्रकट होऊन झरतुष्ट्राला एकाद्या तत्त्वाचें निरूपण करीत. अशा रीतीनें त्याच्या ज्ञानाला पूर्णता

यत गेली आणि जगाचें अधिराज्य चालविणाऱ्या शासनसंस्थेशीं त्याचा दाट परिचय झाला.

'अवेस्ता' ग्रंथांतील धर्मज्ञान या साक्षात्कारांत त्याला प्राप्त झालें. परमेश्वरी तेजानें संपन्न होऊन एक सामर्थ्यवान् पुरुष पृथ्वीवर धर्मप्रसार करणार हें कळल्यापासून राक्षसांचा संताप झाला. राक्षसांचा राजा आर्हिमान् झरतुष्ट्राला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करूं लागला. अक्राळविक्राळ स्वरूपाचे राक्षस उत्तरेच्या बाजूनें झरतुष्ट्रावर चाल करून आले. 'देवप्रणीत धर्म सोडून दे' म्हणून ते गर्जना करूं लागले. पापात्मा आन्रामन्यू ओरडून म्हणाला, "अरे पुरुषस्पपुत्रा! तुझी माता माझें पूजन करीत असे. तूं आह्रूर मझ्दाचा धर्म सोडून दे आणि माझें शिष्यत्व स्वीकार." यावर झरतुष्ट्रानें उत्तर दिलें, "मुळींच नाहीं. तो सद्धर्म मी कदापि सोडणार नाहीं." अखेर झरतुष्ट्राच्या तेजापुढें आपला निभाव लागणें कठिण असें वाटून राक्षस सैरावैरा पळूं लागले.

ईश्वरी संदेश ऐकण्यांत आणि सैतानांशीं झगडण्यांत सुमारें दहा वर्षें घालविल्यानंतर झरतुष्ट्र पूर्ण ज्ञानी व विजयी झाला. मग त्यानें धर्मप्रसार करण्यास सुरुवात केली. त्याच्या धर्माला येऊन मिळालेला पहिला अनुयायी म्हणजे त्याचा पुतण्या मेत्योमा हा होय.

प्रथम झरतुष्ट्रानें आपला मोर्चा राजा कै गुस्तास्प याचेकडे वळविला. कारण एकदा राजसत्तेला आपल्या धर्मध्वजाखालीं आणलें म्हणजे सर्व देशभर धर्मविस्तार करणें सुलभ जाईल असा त्यानें विचार केला. गुस्तास्प राजाचें वैभव थोर होतें. परंतु तत्कालीन अडाणी धर्माचा पगडा त्याच्यावर इतका विलक्षण होता कीं, त्यायोगें त्याचे हातून अनेक अन्यायी कृत्यें होत. भोंदु धर्मगुरूंचा ताफा त्याच्या भोंवतीं सदैव बसलेला असे. धर्माचे नांवाखालीं वाटेल तीं अनन्वित कृत्यें करण्यास ते मागेंपुढें पाहत नसत. या धर्मगुरूंना नामोहरम करून सत्यधर्माची दीक्षा राजाला द्यावयाची हें अवघड काम झरतुष्ट्रापुढें होतें.

असें सांगतात कीं, झरतुष्ट्र गुस्तास्पकडे यावयास निघाला तेव्हां दोघे जुनाट मताचे सरदार त्याला आडवे आले आणि म्हणाले, “ अरे दांभिका, राजाच्या हातीं आपल्या धर्माचें कंकण बांधण्याचा हा नाद सोडून दे. नाहींतर एथल्या एथेंच तुझी चटणी उडवूं. ” ते इतकें बोलण्याचा अवकाश तों तुफान वारा सुटला, भोंवतालचीं झाडें कडाकड उन्मळून पडूं लागलीं, धुळीचे लोट आकाशांत जाऊन दिशा धुंद झाल्या; ते दोघे सरदार अंतराळीं टांगले गेले. इतक्यांत गिधाडें, घारी वगैरे हिंस्र पक्ष्यांचे थवे येऊन त्यांचे लचके तोडूं लागले. अखेर त्या दोघांचे अस्थिपंजर खालीं पडले.

इकडे गुस्तास्प दरबारी थाटांत आपल्या राजवाड्यांत बसला होता, तेथें झरतुष्ट्रानें एकदम प्रवेश केला. त्यावेळीं त्याच्या हातांत धर्मदंड होता. या दंडाच्या टोकांतून अग्निशिखा दिसत होती. तेजोवलयांनीं कांतिमय दिसणारें त्याचें मुख पाहून गुस्तास्प चकित झाला. भोंवतालीं धर्मगुरूंचा तांडा होता. त्यांना वाटलें हा आतां राजावर आपला प्रभाव पाडणार. मत्सरग्रस्त होऊन त्यांनीं झरतुष्ट्राचा पाणउतारा करण्याचा क्रम आरंभिला. एकामागून एक असे तेहतीस अवघड धर्मप्रश्न त्यांनीं झरतुष्ट्राला विचारले त्यानें आपल्या बिनतोड युक्तिवादानें प्रत्येक प्रश्नाच्या चिंधड्या उडविल्या, तेव्हां मात्र ते मनांत चपापले. गुस्तास्प राजाचा झरतुष्ट्राविषयींचा आदर द्विगुणित झाला.

पहिल्याच भेटींत झरतुष्ट्रानें आपल्या तेजानें राजाला भारून टाकिलें, आतां आपली धडगत नाहीं अशी दहशत धर्मगुरूंना वाटूं लागली. कांहीं ना कांहीं उपाय योजून झरतुष्ट्राला क्षीणतेज करण्याचा कट त्यांनीं आरंभिला. त्यांनीं असा पुकारा केला कीं, झरतुष्ट्र हा चेटक्या व जादूगार आहे. तो माणसांना मंत्रमुग्ध करून ठार करतो. या आरोपाच्या समर्थनाकरितां त्यांनीं पुष्कळसे खिळे, केस, कुत्र्यामांजरांचीं डोकीं, हाडें इ० वस्तु झरतुष्ट्राच्या आश्रमांत गुप्तपणें नेऊन टाकिल्या. राज-

दरबारांत ही वर्दी गेली. खोट्या पुराव्याचे आधारें झरतुष्ट्राला बंदि-वासांत टाकण्यांत आलें ! इतकेंच नव्हे तर कांहीं खायला प्यायला न देतां त्याला उपासमारीची शिक्षा देण्यांत आली.

पण आपल्या परमभक्ताचे हे हाल परमेश्वरी शक्ति कसे सहन करणार? गुस्तास्प राजाचा एक आवडता घोडा होता. आईबाप मुलावर जसें जीवापलीकडे प्रेम करतात तसें गुस्तास्प राजा त्या घोड्यावर करीत असे. या घोड्याचे हातपाय कासवाच्या हातपायासारखे एकदम पोटाशीं आखडले गेले आणि कांहीं केल्या ते सुटेनात. त्यांचें चलन-वलन बंद पडल्यानें घोड्याला उठतां येईना. तो मरणोन्मुख स्थितींत पडून राहिला.

ही हकीकत राजाला कळतांच तो तडक अश्वशाळेकडे आला. घोड्याची करुणास्थिति पाहून राजा विव्हल झाला. त्यानें अनेक पशुवैद्य आणिले पण कोणाचा कांहीं उपाय चालेना. आतां कसें करावें या चिंतेंत राजा पडला. इतक्यांत त्याला झरतुष्ट्राला कैदेंत टाकल्याची आठवण झाली आणि हा दैवी कोप तर नसेलना अशीहि शंका त्याच्या मनांत डोकावूं लागली. मग तो झरतुष्ट्राकडे आला आणि त्यानें घोड्याची कशी दशा झाली आहे हें झरतुष्ट्राला निवेदन करून घोड्याची स्थिति पूर्ववत् करून देण्याविषयीं झरतुष्ट्राची प्रार्थना केली. धर्मकार्य साधण्याला ही संधि बरी आहे हें ओळखून झरतुष्ट्रानें राजाला चार अटी घातल्या. एकेक अट पाळण्याचें अभिवचन राजाकडून मिळालें कीं घोड्याचा एकेक पाय सुटणार होता. पहिली अट, राजानें झरतुष्ट्राचा धर्म स्वीकारावा. दुसरी, राजाचा शूर पुत्र इस्पेंदियर यानें या धर्माचे संरक्षणार्थ आपली तलवार वहावी. तिसरी, राणीनें हा धर्म स्वीकारावा. चौथ्या अटीनें आपल्या विरुद्ध कट करणारांचीं नांवें राजानें जाहीर करावीं; असें झरतुष्ट्रानें मागून घेतलें. ह्या चार अटी मान्य केल्यावर घोडा पूर्ववत् झाला. प्रेषिताचा जय झाला. झरतुष्ट्राच्या

धर्माला राजमान्यता मिळाली. त्याच्या शत्रूंना दहशत बसली. मग झरतुष्ट्रानें राजाला वर देऊन संतुष्ट केलें.

नंतर खोरासान प्रांतांतील प्रसिद्ध अग्निमंदिरापुढें झरतुष्ट्रानें एक झाडाचें कलम लावलें. त्याच्या खोडावर ‘ गुस्तास्प राजानें सत्यधर्माचा स्वीकार केला ’ अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं. हें झाड जसजसें वाढूं लागलें तसतसा झरतुष्ट्राच्या धर्माचा प्रसार होऊं लागला. राजानें झरतुष्ट्राच्या धर्माचा स्वीकार केला, तेव्हां प्रजेंत चळवळ सुरू झाली. इराण–तुराणची सरहद्द ओलांडून झरतुष्ट्राचा धर्म इतरहि देशांत संचार करूं लागला. ग्रीक तत्त्ववेत्त्यांचें चित्तहि त्याकडे आकर्षिलें गेलें. कांहीं आर्यपंडित झरतुष्ट्राची प्रत्यक्ष भेट घेऊन त्याजबरोबर तत्त्वचर्चा करण्यास आले. तो एक ईश्वरी पुरुष आहे याविषयीं त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनासुद्धां शंका राहिली नाहीं.

तथापि यशाचा मार्ग हा नेहमींच निष्कंटक असतो असें नाहीं. उलट, कार्यकर्त्या पुरुषांना आपल्या कार्यामध्यें धक्केचपेटे सोसण्याचेच प्रसंग फार येतात. झरतुष्ट्र आणि गुस्तास्प यांना धर्मप्रसाराचे कामीं अशाच अडचणी आल्या. सत्य धर्माचा सर्वत्र विजय होऊं लागल्यामुळें दानवांनीं त्याविरुद्ध उचल केली आणि आरजास्प नांवाच्या एका बलाढ्य पण दुष्ट राजाचे कानांत विष ओतलें अशी समजूत आहे. तो राजा झरतुष्ट्री धर्माचा शत्रु बनला. या आरजास्पला गुस्तास्प राजा कांहीं खंडणी देत असे. पुढें झरतुष्ट्रानें गुस्तास्पला असा सल्ला दिला कीं, सत्यधर्माच्या प्रतिस्पर्ध्यांना खंडणी देणें उचित नाहीं, तर आरजास्पला आपल्या धर्माची दीक्षा घेण्याचा आग्रह करावा. गुस्तास्पनें अशी विनंति करतांच आरजास्प खवळला. त्यानें गुस्तास्पला असा निर्वाणीचा खलिता पाठविला कीं, “दोन महिन्यांचे आंत झरतुष्ट्री धर्म सोडून दे, नाहींतर युद्धाला तयार हो.” अर्थात् हें मान्य होणें अशक्यच होतें. हा खलिता पोंचला त्यावेळीं गुस्तास्पचा शूर बंधु झरीर दरबारांत

बसला होता. खलित्यांतील उद्दाम भाषा ऐकून झरीर खवळला. त्यानें राजाच्या हातून तो खलिता घेऊन झुगारून दिला व आरजास्पच्या वकिलाला युद्धाचें आव्हान स्वीकारल्याचें सांगितलें. अशा रीतीनें गुस्तास्प आणि आरजास्प यांचें युद्ध जुंपलें.

पहिल्या लढाईंत झरतुष्ट्री पंथाचे अनेक वीर कामास आले. युद्धाची उत्सवमूर्ति जो झरीर तो मोठ्या उत्साहानें लढला. पण फितुरीनें घात केला. स्वपक्षांतील कांहीं नीचांनीं त्याला बेसावधपणें गांठून ठार केलें. गुस्तास्प व झरतुष्ट्र यांना पराकाष्ठेचें दुःख झालें. मग गुस्तास्पनें असें जाहीर केलें कीं, जो कोणी वीर फितुरी माणसें शोधून त्यांना कंठस्नान घालील त्याला मी आपली कन्या लावण्यलतिका हुमाई अर्पण करीन. हा पण जिंकण्याच्या ईर्षेनें शेकडों तरुण वीर पुढें सरसावले. त्यांत नस्तूर नांवाच्या एका तरुण वीरानें हा पण जिंकला. फितुरी माणसांची कत्तल झाली. तीमुळें इतकी जबर दहशत बसली कीं फंदफितुरीचा खेळ अजिबात बंद झाला. गुस्तास्पचा मुलगा एस्पेंदिअर यानें एवढा पराक्रम गाजविला कीं आरजास्पला पळतां भुई थोडी झाली. आरंभींचें औदासीन्य मावळून सत्यधर्माचे सैनिक विजयानें आनंदित झाले. जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला.

पण हें युद्ध येथेंच संपलें नाहीं. डवचलेल्या सर्पाप्रमाणें पराभवानें चिडलेला आरजास्प पुनः चाल करून आला. याहि खेपेस इराणचा 'अर्जुन' जो एस्पेंदिअर यानें मातबर शौर्य गाजाविलें. परंतु त्या रानटी तुर्कांनीं लांडग्याप्रमाणें सर्व देश व्यापिला होता. बाल्क शहरीं एक अग्नीचें पवित्र मंदिर होतें. त्या ठिकाणीं सुमारें ८० पुरोहितांसह झरतुष्ट्र उपासना करण्यांत तल्लीन झाला होता. इतक्यांत तुर्कांची टोळधाड तेथें आली. तेथें त्यांनीं 'झेंद-अवेस्ता' या झरतुष्ट्राच्या पवित्र ग्रंथाची होळी केली आणि ते देवळांत घुसूं लागले. झरतुष्ट्र व इतर पुरोहित यांनीं तुर्कांना थोपवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण

त्यांत त्यांना यश आलें नाहीं. त्या अडदांड व क्रूर तुर्कांनीं सर्वांची सरेहा कत्तल उडविली. रक्ताचा पूर वाहूं लागला. त्या पुरांतच पवित्र अग्नि लुप्त झाला. जगांत अंधार पडला. यमराज आपल्या महिषावर बसून चोहींकडे स्वैर हिंडत आहे असा भास झाला. इतक्यांत स्वर्गांतून पृथ्वीपर्यंत तेजाचा एक प्रचंड झोत आला. जडदेहापासून मुक्त झालेला झरतुष्ट्राचा पवित्र आत्मा त्या सर्वव्यापी परम तेजाशीं मिसळून गेला. अशा रीतीनें वयाच्या अठ्याहत्तराव्या वर्षीं या थोर धर्मोपदेशकानें आपला अवतार समाप्त केला.

# परिशिष्ट.

## १. वैदिक-प्रार्थना.

ॐ ॥ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः ॥
भद्रं पश्येमाक्षिभिर्यजत्राः ॥
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिः ॥
व्यशेम देवहितं यदायुः ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥

[ देवांनो ! आम्हीं कानांनीं मंगल श्रवण करावें; हे यजन करणाऱ्यांचें संरक्षण करणाऱ्या धर्मसंरक्षक देवांनो ! आम्हीं डोळ्यांनीं मंगल पहावें. निश्चल इंद्रियांनीं युक्त अशा शरीरांनीं (तुमचें) स्तवन (उपासना) करणारे आम्हीं जें देवांना इष्ट आयुष्य (जीवित) आहे तें उपभोगावें. (देवांच्या सेवेंतच आमच्या आयुष्याचा विनियोग व्हावा.) ]

यश्छन्दसामृषभो विश्वरूपः। छन्दोभ्योऽध्यमृतात्संबभूव।
स मेन्द्रो मेधया स्पृणोतु। अमृतस्य देवधारणो भूयासम् ॥ १ ॥
शरीरं मे विचर्षणम्। जिह्वा मे मधुमत्तमा। कर्णाभ्यां भूरि विश्रवम्।
ब्रह्मणः कोषोऽसि मेधया पिहितः। श्रुतं मे गोपाय ॥ २ ॥
आवहन्ती वितन्वाना। कुर्वाणा चीरमात्मनः।
वासांसि मम गावश्च। अन्नपाने च सर्वदा। ततो मे श्रिय मावह ॥ ३ ॥

[ जो वेदांतील श्रेष्ठ व्यापक देव, अमृतरूप वेदांमध्यें प्रकट झाला तो परमेश्वर मला बुद्धीनें (ज्ञानानें) परिपूर्ण करो. हे परमेश्वरा ! मीं अमृतरूप वेदांचें (वैदिक ज्ञानाचें) धारण करणारा व्हावें.

माझें शरीर कार्यक्षम असावें. माझी जिव्हा (वाणी) अत्यंत मधुर असावी. (आणि) कानांनीं मीं पुष्कळ श्रवण करावें. (देवा) तूं बुद्धीनें आच्छादित असा ब्रह्माचा (ज्ञानाचा) संग्रह आहेस. माझ्या विद्येचें संरक्षण कर. (तिचें विस्मरण होऊं देऊं नको.)

मला वस्त्रें नेहमीं प्राप्त करून देणारी, माझीं गायी-गुरें नेहमीं वृद्धिंगत करणारी आणि खाद्यपेय पदार्थ नेहमीं पुरविणारी लक्ष्मी हीच होय. म्हणून मला ( ती ) लक्ष्मी ( संपत्ति ) प्राप्त करून दे. ]

---

## २. बौद्ध-प्रार्थना.

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।
नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।
बुद्धं सरणं गच्छामि । धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

दुतियम्पि बुद्धं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि धम्मं सरणं गच्छामि ।
दुतियम्पि संघं सरणं गच्छामि ।
ततीयम्पि बुद्धं सरणं गच्छामि ।
ततीयम्पि धम्मं सरणं गच्छामि ।
ततीयम्पि संघं सरणं गच्छामि ।

पाणातिपाता वेरमणी सिक्खापदम् समादियामि ।
अदिन्नादाना वेरमणी सिक्खापदम् समादियामि ।
कामेसु मिच्छाचारा वेरमणी सिक्खापदम् समादियामि ;
मुसावादा वेरमणी सिक्खापदम् समादियामि ।
सुरा- मेरय- मज्जा- पमा- दट्ठाना
वेरमणी सिक्खापदम् समादियामि ।

[ भगवान् अर्हत् सम्यक्ज्ञानी बुद्धाला प्रणाम असो.
भगवान् अर्हत् सम्यक्ज्ञानी बुद्धाला प्रणाम असो.
भगवान् अर्हत् सम्यक्ज्ञानी बुद्धाला प्रणाम असो.

मी बुद्धाला शरण जातों.
मी धर्माला शरण जातों.
मी संघाला शरण जातों.
दुसऱ्यानें मी बुद्धाला शरण जातों.
दुसऱ्यानें मी धर्माला शरण जातों.
दुसऱ्यानें मी संघाला शरण जातों.
तिसऱ्यानें मी बुद्धाला शरण जातों.
तिसऱ्यानें मी धर्माला शरण जातों.
तिसऱ्यानें मी संघाला शरण जातों.
मी कोणत्याहि प्राण्याची हिंसा करणार नाहीं.
मी कोणाचा अपहार करण्याची बुद्धि बाळगणार नाहीं.
मी विकारांत रत होणार नाहीं.
मी असत्यापासून दूर राहीन.
मी मादक पेयांस शिवणार नाहीं.]

---

## ३. ख्रिस्ती प्रार्थना.

Almighty God ! unto whom all hearts be open, all desires known, and from whom no secrets are hid; cleanse the thought of our hearts by the inspiration of Thy Holy Spirit, that we may perfectly love Thee, and worthily magnify Thy Holy Name. Through Christ our Lord. Amen.

O Lord Christ ! we Thy faithful soldiers dedicate this newborn day to Thee, praying that it may shine in Thy service as a pure pearl in the chaplet of our life. O Thou Great King of Love to whom be praise and adoration for ever more. Amen.

Teach us O Lord ! to see Thy life in all men and in all the peoples of Thine earth, and guide our nation through its leaders to preserve Thy peace, that the menace of war be far from our days. Through Christ our Lord. Amen.

To the most Holy and Adorable Trinity, Father, Son, and Holy Spirit, Three persons in one God, to Christ our Lord, the only wise counseller, the Prince of Peace; to the Seven Mighty Spirits before the throne; to the glorious Assembly of just men made perfect, the Watchers, the Saints, the Holy ones, be praise unceasing from every living creature; and honour, might and glory, henceforth and for evermore. Amen.

The peace of God, which passeth all understanding, keep your hearts and minds in the knowledge and love of God, and of his son Christ our Lord; and the blessing of God, Almighty, the Father, the Son, and the Holy ghost, be amongst you, and remain with you always. Amen.

[ सर्वसमर्थ देवा ! तुझ्यापुढें हृदयें खुलीं करावीं, इच्छा बोलून दाखवाव्या, तुझ्यापासून आम्हीं कांहीं गुप्त ठेवूं नये. आपल्या पवित्र आत्म्याच्या स्फूर्तीनें आमचे हृदयविचार शुद्ध कर म्हणजे आम्हांला तुझ्यावर उत्कटतेनें प्रेम करतां येईल. तुझें नाममाहात्म्य वाढेल. आमचा प्रभु जो ख्रिस्त त्याचेतर्फे ही प्रार्थना करतों. आमेन.

हे ख्रिस्त प्रभो ! आम्ही तुझे विश्वासू सेवक आहोंत. आजचा हा दिवस तुला अर्पण असो. तो तुझ्या कारणीं लागून आमच्या जीवनांत शुद्ध मोत्याप्रमाणें झळकावा अशी इच्छा आहे. तूं प्रीतीचा राजा अहेस. तुझा सदैव जयजयकार असो. आमेन.

हे प्रभो ! सर्वांच्या अंतःकरणांत तूंच भरला आहेस हें आम्हांस शिकीव आणि आमच्या राष्ट्रनेत्यांना असें वळण लाव कीं, जेणेंकरून ते शांततेचीच कास धरतील आणि युद्धाचें संकट कायमचेंच दुरावेल. आमेन.

पिता, पुत्र, आणि पवित्रात्मा या त्रयीला, शांतिराज सुज्ञ सचिव ख्रिस्ताला, परमेश्वरी सिंहासनासमोरील सात समर्थशक्तींना, मुक्त व न्यायी आत्म्यांच्या संघाला, नेते, साधुसंत, शुद्धाचरणी लोक यांना प्रत्येक प्राण्याचें नमन असो. आमेन.

बुद्धीला अतर्क्य असलेली प्रभूची व ख्रिस्ताची शांति ज्ञान, आणि प्रीति तुमच्या हृदयांत वास करो. पिता, पुत्र, आणि पवित्रात्मा यांचा आशीर्वाद तुम्हांला सदैव असो. आमेन. ]

# ४. इस्लामी-प्रार्थना.

बिस्मिल्लाहिर्रह्मानिर्रहीम् ।
अल्हम्दुलिल्लाहि रब्बिल् आलमीन् ।
अर्रह्मानिर्रहीम् । मालिकि यौमिद्दीन् ।
ईयाक नअ्बुदु व ईयाक नस्तईन् ।
इह्दिनस् सिरातल् मुस्तकीम् । सिरातल्लधीन् अन् अम्त
अलैहिम् घैरिल् मघ्दूबि अलैहिम् वलध्धालीन् । आमीन

[ त्या दयाळु सकरुण अल्लाच्या नांवानें ( आरम्भ असो ) । सर्व लोकांचा स्वामी जो अल्ला त्याला ही स्तुति ( पावो ) । तो दयाळु व सकरुण असा 'दीन' ( धर्म ) दिवसाचा अधिपति आहे । तुलाच आम्ही सेवितों आणि तुझ्याच साहाय्याची याचना करितों ।

सरळ मार्गानें तूं आम्हांला ने । जो मार्ग, तुझी ज्यांच्यावर कृपा आहे अशांचाच आहे, जो तुझा ज्यांच्यावर कोप आहे त्यांचा नव्हे, जो उन्मार्गगामियांचा ( मार्ग ) नव्हे. ]

---

# ५. झरतुष्ट्री प्रार्थना.

यानीम मनो यानीम वचो यानीम षय ओथनेम
अषओनो जरथुश्मंहे । फ्रा अमेषा स्पेन्ता गाथा ओ गेयुर
वाइन । नेमो वे गाथा ओ अषओनीष
अहया यासा नेमङ्हा उस्तान–जस्तो रफेध्रह्या मइनयेंयुश
मज्दाओ पउरबीम स्पेंतह्या अषा विस्पेंग षय ओथना ।
वङ्हेउश खतूम मनङ्हो या षनेवीशा गेयूश्वा उर्वानेम ।
या षय ओथनाम हाइतिम यज्मइदे ।
अहुनवइतिम गाथाम अषोनिम अषहे रतुम यज्मइदे ।
अहुनवइतियाओ गाथियाओ हन्दाता यज्मइदे ।
येंगहे हाताम आअत्येस्ने पइतिवेंगहो मज्दाओ ।

अहुरो वइथा अषत ह्चा याओंग हामच्या ।
तास चा ताओसचा यज्मइदे ।
नमस्चा यआर्मेतीश जाय चा ।
नमस्चा यआर्मेतीश जाय चा ।
नमस्चा यआर्मेतीश जाय चा ।
अशेम वोहु वहेरतम् आस्ति, उस्ता आस्ति,
उस्ता अहमाइ ह्दषाइ बहेस्ताइ अषेम ।

[ पुण्यात्मा झरतुष्ट्राचें कर्म धन्य, वचन धन्य, आणि विचार धन्य होत. स्वर्गीय आत्म्यानें धर्मग्रंथ प्रकट केले. हे दिव्य धर्मग्रंथांनो, मी तुमचें स्तवन करतों.

हे मज्द देवा ! तुझी प्रार्थना करून तुझ्या कृपेची याचना करतों. तुझ्या दानशूर आत्म्याचा प्रसाद व्हावा म्हणून तुझें स्तवन करतों. सर्वांशीच माझें वागणें सत्यभावनेचें असावें. उदात्तचरिता, हात जोडून तुला प्रार्थितों कीं स्वर्गीय वृषभाच्या आत्म्यावर माझी भक्ति जडो म्हणजे तुझें स्वरूप आकळेल.

परमपावन अशा अहुनावद् गाथांचें श्रद्धापूर्वक स्मरण करतों. अहुनावद गाथांतील प्रार्थनांचें मी श्रद्धापूर्वक स्मरण करतों.

यषओथनेमची मी उपासना करतों

पावित्र्याची, अधिष्ठात्री देवता अशा अहुनावद-गाथांची मी उपासना करतों.

अहुनावद-गाथांतल्या प्रार्थनांची मी उपासना करतों.

परमेश्वरानें ज्यांना पावित्र्यांत व उपासनेंत श्रेष्ठ मानिलें त्यांचें मी स्तवन करतों.

पवित्रता ही सर्वांत उच्च गोष्ट आहे.

पावित्र्याचें ध्येय ठेवून जो पवित्र राहतो त्यालाच खरा आनंद होतो. ]

# श्रीकृष्णाचा धावा.

[ **राग**—काफी–ताल दीपचंदी ]

अबकी टेक हमारी । लाज राखो गिरिधारी ॥ ध्रु० ॥
जैसी लाज राखी अर्जुनकी भारतयुद्धमंझारी
सारथी हो के रथ को हाको चक्रसुदर्शन धारी
भक्तन की टेक न टारी ॥ १ ॥
जैसी लाज राखी द्रौपदि की हो न दीनि उधारी
खैंचत खैंचत दो भुज थाके दुःशासन पचहारी
चीर बढायो मुरारी ॥ २ ॥
**सूरदास** की लाज राखो, अब को है रखवारी ?
राधे राधे श्रीवर प्यारो श्रीवृषभानदुलारी
शरण तक आयो तुमारी ॥ ३ ॥

---

# " मंगल मंदिर खोलो....! "

[ **राग**–भैरवी तीन–ताल ]

मंगलमंदिर खोलो दयामय ! मंगलमंदिर खोलो ॥
जीवनवन अति वेगें वटाव्युं
द्वार उभो शिशु भोळो
तिमिर गयुं ने ज्योति प्रकाश्यो
शिशुनें उरमां ल्यो ल्यो ॥
नाम मधुर तम रट्यो निरंतर
शिशुसह प्रेमे बोलो
दिव्य तृषातुर आव्यो बालक
प्रेम अमीरस ढोळो ॥

---

# दाविदप्रणीत गीतें.

## ( १ )

[ अभंग ]

प्रभो। माझें मन
क्रोधें न तापलें
धुंद न जाह्ले
नेत्र कधीं.

शक्यतेची कोटी
सोडूनी न कधीं
चमत्कारामधीं
शिरलों मी.

साळसूद मूल
राही जेवीं शांत
तेवीं केलें चित्त
स्थिर देवा.

भविष्यांत तैसें
नित्य कल्पवरी
प्रभुकृपेवरी
विसंबावें.

## ( २ )

[ चाल-रक्ष रक्ष भारता-अंतरा वगळून ]

मेंढपाळ हा प्रभू कधीं ने हिरव्या कुरणीं मला
कधीं मनोहर जलाशयावर घेउन मज चालला
निष्कंटक तो राजमार्ग जरि सदा मला दावितो
मधेंच भेसुर मेघ मृत्युचा वरती डोकावतो.

परंतु माझा सखा असे प्रभु सदैव आपंगिता
या श्रद्धेनें भीति न बिलगे दरींतुनी चालतां
स्नेह शिरावर वर्षुन देसी चारा वदनांतरीं
प्रभो, शिगोशिग पेला माझा भरुनी वाहे वरी
तुझ्या कृपेची सदया, मजवर राहूं दे सावली
कल्पांतावर राहिन देवा, तुझ्याच मी राउळीं.

---

# तेजोनिधे दयाळा.

[ Lead, Kindly Light. ]

[ चाल–आनंदकंद. ]

वेढून टाकताहे औदास्य भोवतालीं
गृह दूर राहिलेलें घनघोर रात्र काळी
तेजोनिधे ! दयाळा ! दाखीव मार्ग मातें
जावोत ना पदें हीं सोडून सतपथातें
मी दूरचींच दृश्यें पाहावया न वांछीं
भूमी पुढें दिसावी एकाच पाउलाची
नव्हती तुझ्या कृपेची जाणीव आजवेरी
पथ कोणता धरावा हेंही न मी विचारीं
असतां प्रभा दिनाची चित्तास रंजवाया
होतें अहंपणाचें अधिराज्य मानसीं या
परि सर्व मागचे हे अपराध विस्मरोनी
तिमिरांत या कृपाळा ! दे मार्ग दाखवोनी
होतां तुझ्या कृपेची वृष्टी घनांधकारीं
सरिता, गिरी, वनें हीं होतील लंघ्य सारीं

व्योमीं प्रभा उषेची पसरेल आणि अंतीं—
दिसतील हासतांना स्वर्गीय आननें तीं

## सुफी गीत.

( १ )

( चाल – पाखरा येशिल कां परतून. )

दूर दे अहंभाव फेकून।
ये बाहेरीं निज हृदयाचें मंदिर तूं सोडून
स्वामीसाठीं सर्व सिद्धता तेथें ठेव करून ॥
तूं बाहेरीं आल्यावर तो येइल मग चालून
आत्मरूप तो प्रकट तुजपुढें करील आनंदून ॥

## झरतुष्ट्रप्रणीत स्तोत्रें.

( १ )

[ चाल– भारतका डंका. ]

अवनम्र पदीं तव जगदात्मन् ।
स्तुतिगीत तुझें नित मम वदनीं
हृदयांत भरे द्युति सत्याची
सुविचार सदा दे स्फूर्ति मनीं
सामर्थ्य चढे मज आत्मबलें
मी याचक मझ्द् ! तुझ्या दारीं
पडसाद पुनः मम गीताचे
येतात तुझ्या गीतागारीं

## ( २ )

[गज़ल - ऐ बहारे बाग दुनिया.]

सत्यकेतू उंच डोलो वैभवांत्
प्रार्थना ही तूजला हे लोकनाथ् ॥ ध्रु० ॥
जो दुज्यातें सौख्य द्याया कष्टतो
मझ्द देवा ! त्यास तूं ठेवी सुखांत् ॥ १
दे दयादूतीसवें तूं धाडुनी
पूर्णता सन्मार्गगामी जीवनांत् ॥ २

## ( ३ )

[ अभंग ]

साह्य सन्मनाचें मला ... सत्य पाठीराखा भला
भक्तिगीताचा हा ठेवा ... तुज वाहतों मी देवा ।
सदाचाराचें विंदान ... मिळवाया सारे यत्न
माझें भविष्यमंदिर ... मीच बांधीन साचार.

REFBK-0004835

४८३५